TIGHT BINDING

UNIVERSAL
LIBRARY
OU_192531
UNIVERSAL
LIBRARY

# कांहीं माणसें

[ स्फुट लेख ]

सदाशिव विनायक देशपांडे

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

★ ३५ ★

मूल्य सव्वा रुपया

प्रथमावृत्ति : १९४५
★
सर्वाधिकार सुरक्षित
★
प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई
★
मुद्रक
जयराम दिगंबरी देसाई
राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई

## तोंडओळख

ज्या जातींचीं माणसें येथें चित्रित केलीं आहेत त्यांची थोडी फार तोंडओळख प्रत्येकाला असतेच. जवळून सूक्ष्मपणें पाहाणारांना तीं जास्त स्पष्टपणें दिसतात, इतकेंच. ह्यांपैकीं कांहीं पूर्वींच पाहाण्यांत आलीं आहेत. त्यांच्या भरतीला कांहीं नवीन आणून त्यांचा 'संग्रह' केला आहे. त्यांचें स्वरूप प्रत्यक्षच दिसत असल्यानें त्यांचें अधिक वर्णन नको. 'संग्रह' करण्यास ज्यांनीं अमोल सहाय्य केलें त्यांचें ऋण मात्र फिटण्यासारखें नाहीं. इति शम् ।

स. वि. देशपांडे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आमचा टपालवाला | ... | १ |
| २ | वाटचा भिकारी ... | ... | ४ |
| ३ | गुन्हेगार गवळी ... | ... | ६ |
| ४ | वेडा हसन्या ... | ... | ९ |
| ५ | पार्सल क्लार्क ... | ... | १४ |
| ६ | आमचा शिंपी ... | ... | १७ |
| ७ | आंधळी ... | ... | २१ |
| ८ | दक्षिणी आणि गुजराथी | ... | २३ |
| ९ | कलाकार कोल्हटकर | ... | ३३ |
| १० | वाङ्मयांतील सावरकर | ... | ३९ |
| ११ | स्टॅलिन विरुद्ध ट्रॉट्स्की | ... | ४५ |
| १२ | मास्तर ... | ... | ५३ |
| १३ | अंबादास ... | ... | ६० |
| १४ | हे इंग्रज ... | ... | ६४ |
| १५ | संगीत रत्न ... | ... | ७५ |
| १६ | पोऱ्या ... | ... | ७९ |

## १ आमचा टपालवाला

आमच्या टपालवाल्यासंबंधीं मला अलीकडे फारच आदर वाटत चालला आहे. इतकेंच नव्हे, तर त्याला पाहातांच किंवा त्याचें स्मरण होतांच माझ्या मनांत त्याच्याविषयीं स्नेहभाव जागृत होतो. तसें म्हटलें तर टपालवाल्यासंबंधीं विशेष कांहीं वाटण्याचें कारणच काय ? सरकारनें दिलेले, आंगाच्या प्रमाणाशीं कोणतेंही प्रमाण न सांभाळणारे डगले आंगावर चढवावयाचे, तांबड्या पट्टीचें मुंडासें डोकीला बांधावयाचें व रोज सकाळीं पायपीट करीत घरोघर पत्रें टाकीत चालूं लागावयाचें. कित्येकांचीं सुखदुःखें त्या पत्रांतून तो व्यक्तीव्यक्तीला पोचवीत असेल. कोणाकोणाला कायकाय गमतीजमती पत्रांतून आढळत असतील, आपल्या हातांतील एवढ्याशा कागदाच्या कपट्याकरितां किती आसावलेलीं मनें आतुरतेनें वाट पाहात असतील, त्यांच्या परिपूर्ण झालेल्या हृदयवृत्ति अभावितपणें आपणांला कसा मूक आशीर्वाद देत असतील, किंवा पत्राच्या अभावानें नकळत [illegible] कितीकांचा उत्साहभंग होत असेल व त्या लोकांचे शिव्याशापही कदाचित अदृष्टरूपानें कसे भोवतीं वावरत असतील, कसली कसलीच दखल त्याला नसते. एखाद्या स्थितप्रज्ञ योग्याच्या निर्विकारतेनें तो बटवड्याचें काम करीत असतो. कोणी निंदा अगर कोणी वंदा, त्याचा आपला 'पोटाचा धंदा' शांतपणें अखंड चालू. त्या निंदक-वंदकांच्या यादींत केव्हां केव्हां माझेंही नांव घालण्यासारखें असणारच. कारण अनुकूल पत्र आल्यास बरें वाटावें व पत्राची अपेक्षा असून पत्र न आल्यास हिरमोड व्हावा ह्या मानवी दुर्बलतेंतून मी सुटलों आहें थोडाच !

पण आजचा माझा आदर किंवा स्नेहभाव त्याबद्दल नाहीं. कोठल्याही अनुकूल अभिप्रायांचीं पत्रें त्यानें मला अजून दिलीं नाहींत. कोठल्याही संपादकांचे प्रसंशोद्गार त्यानें मला पोचवावेत, असें झालें नाहीं. खरें म्हटलें तर 'साभार परत' मजकूरच वारंवार त्यानें आणला असेल. आपल्या हातांतील जाडजूड टपाल देतांना त्याला गंमत वाटली असेल, पण तें टपाल लांबून पाहूनच आम्हीं ओळखावें, कीं आलें कांहींतरी वाण परत ! पण आतां ह्यांतील कांहींच घडलें नाहीं; आजच्या वृत्ति आहेत त्या वेगळ्याच

कारणानें. एके दिवशीं अगदीं भर मध्यान्हींच्या वेळीं आमच्या टपालवाल्याची स्वारी आमच्या दारावरून चालली होती. हातांत अद्याप वांटावयाच्या पत्रांचा संच होता. माझें अर्थातच कांहीं टपाल नव्हतें. त्यानें हसत हसत, शून्यपणें तें केव्हांच सुचविलें होतें. परंतु मध्यान्हीची वेळ, लोकांची जेवणीखाणींही होऊन गेलेलीं व ही स्वारी अद्याप पायपीटच करते आहे ! सहजच थोडासा कळवळा आला. थोडासा कनवाळूपणा दाखवायला काय खर्च होतें ? फुकटांत चांगुलपणा कां न घ्या ? म्हटलें, " काय टपालवाले, अजून तुमचं काम संपलं नाहीं ? बारा वाजून गेले. रोज असाच का उशीर होतो ?" " होय साहेब, रोजचंच आहे हें. सकाळीं सहा वाजतां पोस्टांत जावं तें आठाला पत्रांचा गठ्ठा घेऊन बाहेर पडावं. तेव्हांपासून बटवडा करतां करतां शेवटचं पत्र वांटेपावेतों साधारण बाराचा सुमार सहज होतो. मोठा जिल्हा आहे माझा. घरीं जाऊन आंघोळ करावी, देवपूजा करावी, जेवण करावं तों एकदीड होऊन जातो. तों पुनः दोन वाजतां पोस्टांत हजेरी व दुपारचें दुसरें टपाल. पुनः एकदा सर्व जिल्हाभर फिरणं. दुसऱ्या वेळेला पत्रं असतात थोडींच पण सर्व घरीं फिरावं तर लागणारच ना ? जवळजवळ पांचाचा सुमार होतो. मग मात्र मोकळा होतों मी. बरं येतां !" सकाळीं सहापासून सायंकाळीं पांच पावेतों वणवण फिरायचें आणि तेंही उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा, सर्व ऋतूंत सारखेंच. काय मधें दोन तासांचा अवधि मिळत असेल तो. तुम्ही म्हणाल, ह्यांत विशेष तें काय आहे ? सर्वच टपालवाले फिरतात. ह्यांत ह्या एकट्याचेंच इतकें कौतुक तें काय ? ह्याच गोष्टीबद्दल का तुम्हांला आदर वाटला ?

मला आदर वाटूं लागला तो वेगळ्या कारणानें. आपल्या आयुष्याचें वर्णन करतांना कोठेंही त्यानें असमाधानाचे, त्वेषाचे, संतापाचे उद्गार काढले नाहींत. अगदीं सरळ, साध्या शब्दांत तो बोलत होता. शिवाय त्याच दिवशीं सायंकाळीं मीं त्यास पुनः पाहिलें तों त्यांत किती फरक आढळला ? सकाळचा तो गबाळ टपालवाला कोणीकडे व आतांचा हा स्वच्छ, ठाकठिकीचा पोशाख केलेला नीटनेटका पुरुष कोणीकडे ? डोकीला स्वच्छ, भगव्या रंगाचा रुमाल, आंगांत घरींच धुतलेला पांढरा सदरा, त्यावर स्वच्छ कोट, नेसतें धोतरही निर्मळ, कपाळाला गंधाची टिकली. स्वारी आपल्याशीं गुंगत स्वतःच्या नंद्रींत चालली होती. बहुधा त्या दिवशींचें सायंकालचें त्याचें तें देवदर्शन असावें. कारण

पुनः त्याला मीं पाहिला तो मंदिरांत भजन करतांना. त्यावरून त्याच्या भाविकतेचें वरील अनुमान. आमच्या जवळच्या मंदिरांत एकादशीच्या उत्सवप्रसंगीं अखंड नामसंकीर्तन चालू असतें व त्यानिमित्तानें अखंड टाळ वाजतो. एकदा सायंकाळीं देवासमोर भजन करीत आमच्या टपालवाले बुवांची स्वारी उभी. पोशाखाचा तोच स्वच्छ थाट; हातांत टाळ, मुखांत 'जयजय विठ्ठल, जयहरि विठ्ठल' असा नामघोष! बुवा एकटेच आपल्या भजनांत दंग होते, साथीला दुसरा कोणीच नव्हता. मनांत म्हटलें, 'हा खरा निष्ठावान. देवाच्या कानीं भजन जातच असलं तर तें याचंच जाईल. खरंच, पुढें व्हावं व देवाबरोबरच ह्यालाही वंदन करावं.' अर्थात हा विचार फार चांगला होता, पण माझ्या पांढरपेशेपणाचा खोटा अभिमान मला तसें करूं देईना! मनानेंच मीं त्याला नमस्कार केला. आतां सांगा, कां बरें अशा व्यक्तीविषयीं आदर वाटूं नये! पोटभरू धंद्याचा हा कष्टाळू माणूस मनानें कसा आनंदी निष्ठावान आढळला! धंद्यावर काय आहे? माणसाच्या मनाची सुसंस्कृतता ही अनेक वेळां व्यक्तिनिष्ठच असते. विचारांचा भकासपणा नाहीं, बडबडीचा कलकलाट नाहीं, मनाचा भयंकरपणा नाहीं! उलट मन प्रसन्न, चित्त शांत!

"काय टपालवाले, काल रथयात्रेला गेलां होतां का?"

"हो, गेलों होतों थोडा अर्धारात्रीं पावेतों. वाटेंतूनच परतलों. सकाळीं लवकरच कामावर जावें लागतें."

शांत उत्तर. जेवढें हातून झालें त्यांतच आनंद. वृथा सकाळच्या नोकरीवर कातावण्यापेक्षां ती शांतपणें करण्याइतकें सामर्थ्य बाकी ठेवून उरला वेळ आपल्या निष्ठेच्या सत्कारणीं लागल्याचेंच समाधान! नाहींतर आमच्यासारखा एखादा बुद्धिवादी—पण जाऊं द्या! मला आतां माझ्यासारख्या बुद्धिवाद्याचें वर्णन कोठें करावयाचें आहे? मी सांगतों आहे तें आमच्या टपालवाल्यासंबंधीं. वरच्या त्याच्या वृत्तीमुळें मला त्याच्याविषयीं खरोखरच आदर वाटतो. मग त्याबद्दल मला कोणी भाबडा म्हटलं तरी चालेल. एखाद्याबद्दल आपलें बरें मत होत असतांना जगाचा एखादा शब्द ऐकावा लागला तरी तो सोसावा. कारण वाईट मत काय? तें नेहमींच सर्वांचें होत असतें! मत चांगलें होणेंच कठीण.

★

## २ वाटचा भिकारी

कोणाला सांगितलें तर खरेंही वाटणार नाहीं असा हा भिकारी आहे. दुसऱ्या कोणाचें कशाला ? प्रत्यक्ष माझ्या दृष्टीनें जर तशी साक्ष दिली नसती तर नुसत्या ऐकीव गोष्टीवरून मींही त्याला भिकारी म्हटलें नसतें. दिसायला माणूस अगदीं भिकाऱ्यासारखा. कळकट पोशाख, दाढी वाढलेली, केसांच्या झिंज्या झालेल्या, डोकीवरच्या अपुऱ्या फाटक्या टोपींतून केस डोकावणारे, आंगाला पाण्याचा स्पर्शही न झाल्यानें शरीरावर घामटपणाचीं पुटें चढलेलीं. भिकाऱ्याचीं आणखीं कोणतीं चिन्हें हवींत ? निदान त्याच्या हातांतील काळ्या किट्ट झोळीकडे पाहून तरी त्याचा धंदा ध्यानीं यावा ना ?

पण छे, भिकाऱ्याचें मुख्य चिन्हच त्याच्या ठिकाणीं नव्हतें. तो कुणाच्याही दाराशीं, आशेनें उभा राहून, दीनवाण्या मुद्रेनें व रडक्या आवाजानें कोणालाही काल्पनिक नांवांनीं हाका मारीत नव्हता, कोणाचीं आर्जवें करीत नव्हता, आपला कंठ शिणवीत नव्हता, कोणाला त्रास देत नव्हता ! तो कोणाजवळ कसलीच याचना करीत नव्हता. उगीच कोणाची याचना करून अपेक्षाभंगाचें दुःख कां भोगा किंवा कोणाचे धिक्काराचे, अपमानास्पद शब्द कां ऐका ? तो स्वतंत्र वृत्तीचा भिकारी होता.

लोकांनीं रस्त्यावर फेकून दिलेल्या उष्ट्या खरकट्यांतून तो अन्न वेचून घेत होता ! भाताचीं डिखळें, भाकरीचे तुकडे, जें सापडेल तें नीटनेटकेपणें वेचून, झाडून झटकून तो आपल्या झोळींत भरीत होता ! गायीला सुद्धा आंबोण म्हणून चालेल कीं नाहीं अशा खरकटवाड्यांतून तो आपल्या क्षुधापूर्तीची साधनसामुग्री जमवीत होता. कोणीं सांगितलें असतें तर विश्वासही ठेवला नसता, पण प्रत्यक्ष आपल्याच डोळ्यांचा अविश्वास धरण्याचा धीर होईना ! सत्य हें केव्हां केव्हां कल्पनेपेक्षांही अधिक प्रखर असतें. त्या प्रखर सत्याचा साक्षात्कार झाला त्याच वेळेला उपनिषदांतील ‘ अन्नं ब्रह्म विजानीयात् ’ ह्या वचनाचें स्मरण झालें व मनांत एक विचार आला, कीं ‘ तो पाहा वाटचा भिकारी समोर अन्नरूपी ब्रह्माचा कसा बारकाईनें शोध करीत आहे; आम्ही ब्रह्मचिंतन करूं वा न करूं, परंतु तो मात्र अन्नरूप ब्रह्माचा ध्यास घेऊन बसला आहे.

त्या ब्रह्माचे अंशन् अंश टिपून वेचून काढून आपल्या गांठीं बांधीत आहे.'
आपलें ब्रह्मसंशोधन संथपणें उरकून, आजूबाजूच्या जगाकडे एकही दृष्टिक्षेप न करतां तो आपल्या वाटेनें चालूं लागला. त्याचा हा नित्याचाच व्यवसाय आहे. रस्त्याच्या कोपऱ्याला, भिंतीच्या आडोशाला, कोठेंही कांहीं पडलेलें असो, तें कोणींही टाकलेलें असो, मुकाट्यानें वेचून झोळींत टाकावयाचें व रस्त्याला लागावयाचें. भिकाऱ्याला जातपात नाहीं, स्पर्शास्पर्श्य नाहीं, स्वच्छास्वच्छ नाहीं, कांहीं नाहीं. त्याच्या लेखीं अन्न हें परब्रह्म. परब्रह्म नेहमींच शुद्ध, सोवळें; त्याच्या ठिकाणीं अमंगलता कोठली ?

तो कोणाकरितां अन्न गोळा करतो ? तो एकटाच आहे, कीं आणखी कोणी जीव तो पोसतो, कोणास काय ठाऊक ? ह्या जीवांची पृसतपास कोण करणार ? दूरदर्शनानें कारुण्य उमजावें इतका दरिद्री अवतारहि तो धारण करीत नाहीं. आंगावर लक्तऱ्या धारण करून, थंडींत कुडकुडत तो बाहेर पडता आणि आल्या गेल्यापाशीं तोंड वेंगाडता, तर त्याला पैपैसा मिळता व दोन बरे घासही त्याच्या मुखीं पडते. पण असला भिक्षेकऱ्याचा धंदा त्याला करावयाचा दिसत नाहीं. कोण्या आंधळ्या पांगळ्यालाही तो बरोबर वागवीत नाहीं. हो तेवढीच लोकांच्या मनांत करुणा अधिक !

मला वाटतें त्याला लोकांची करुणा नको असावी. लोक तरी रस्त्यावर टाकावयाचें अन्नच आपल्या पदरीं टाकणार ना ? दारच्या भिकाऱ्यांच्या नशिबीं उष्ट्याखरकट्याशिवाय काय येणार ? मग तेंच उष्टं खरकटं रस्त्यावरच वेचावें, त्यांत निदान मागण्याची लांछनास्पद यातायात तरी नाहीं, असा अभिमानी विचार करून त्यानें ही विलक्षण रीत आरंभिली असावी. कसेंही असो, कारणें कांहींही असोत, तो कोणीही असो, परंतु ज्या ज्या वेळीं तो मला कोठेंही दिसतो, त्या त्या वेळीं मला त्याची ही अन्न वेचण्याची रीत आठवते व आतां हा जातां जातां कोठचें काय वेंचणार म्हणून माझी दृष्टि सहज एकदा चौफेर फिरून जाते.

★

*

# ३ गुन्हेगार गवळी

आज सकाळीं आमच्या गवळ्याचा मला मनस्वीं राग आला. त्याचें कारण असें झालें: मला सकाळच्या चहाला ताजें दूध मिळालें नाहीं! डोकें शांत ठेवावयास ताज्या दुधाचा गरमगरम चहा हें एवढेंच साधन मजजवळ आणि अद्याप तर ताज्या दुधाचा कांहींच पत्ता नाहीं! कां बरें राग येऊं नये? माणसाच्या गाफिलपणाला तरी कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं? रोजच्या रोज लवकर येण्यासंबंधीं बजावून सांगून सुद्धा ह्या गवळ्याच्या ध्यानींही नाहीं. गवळ्याची जातच असली; वेळेचें भानच नाहीं; इत्यादि इत्यादि. माणसाचा राग एकदा अनिवार झाला व तो दुसऱ्यावर काढावयाचा असला, म्हणजे कोण कशाला कमी करतो? आमची धुसपुस, पुटपुटणें चालूच होतें.

एकदाची गवळीबुवांची स्वारी आली. बिचाऱ्याचा चेहरा थोडा खिन्न दिसत होता. पाहाणाराला त्याच्या तोंडावरची चिंता आढळलीही असती. पण पाहातो कोण व कशाला? शिवाय आपण रागावलों आहोंत ह्याची नको का त्याला जाणीव व्हायला? आम्ही जें दूध घेतों तें आम्हांला दूध वेळेवर मिळावें म्हणून कीं त्याचें खपावें म्हणून?

"काय रे, किती वेळां तुला सांगितलं दूध वेळेवर आणीत जा म्हणून? तुझ्या दुधाची वाट पाहात किती वेळ बसून राहूं? मला कांहीं दुसरा उद्योगधंदा आहे कीं नाहीं? तुला ठाऊक आहे ना, चहाकरतां मला ताजं दूध लागतं तें? असा उशीर करशील तर कसं काय जमणार बुवा?" मी रागारागानें म्हणालों.

"होय साहेब, झाला खरा थोडासा उशीर आज. आपण अगदीं ताटकळत बसून असाल, हें ध्यानीं येऊन कसं वाईट वाटत होतं पाहा. पण काय करणार? वाटेनें थोडीशी चुकवाचुकवी करून यावं लागलं, त्यामुळें थोडी आडवाट करून येतांना वेळ लागला. रोजच्या सरळ वाटेनें आलों असतों तर केव्हांच येऊन पोहोंचलों असतों, पाहा ना!" गवळ्यानें शांतपणें उत्तर दिलें.

"अरे, चुकवाचुकवी कुणाची? काय एखाद्या पठाणाचं कर्जबिर्ज काढलं आहेस कीं काय?" मीं जिज्ञासेनें प्रश्न केला.

"अहो कसचा पठाण? देवाच्या दयेनें अद्याप कर्ज काढण्याचा बाका प्रसंग आला नाहीं, पण सध्या सरकारचे लोकच आमच्यामागें पठाणासारखे लागतात." हें बोलतांना तो मोठ्या काकुळतीनें एकेक शब्द काढीत होता. मला त्याचें बोलणें नीटसें समजेना म्हणून मीं नुसताच 'ऑं' असा कांहींसा आश्चर्योद्गार काढून प्रश्नार्थक मुद्रेनें त्याच्याकडे पाहूं लागलों. माझी आस्था पाहून त्यालाही बोलण्याचा धीर आला व तो आपली हकीकत सांगूं लागला.

तो म्हणाला, "त्याचं आतां असं झालं आहे, सरकारनें दूध तपासण्याचं काढलं आहे यंत्र. हल्लींच्या काळांत कसलीं कसलीं यंत्रं निघतील भगवान जाणे! रस्त्यांत कुणीही दूधवाला सापडला, कीं धरतात त्याला व लावतात त्याच्या दुधाला यंत्राची तपासणी! सरकारनें दुधाचा कस स्वतःच्या मनाशीं जो ठरवला आहे, त्या कसाचं दूध दिसलं नाहीं, कीं दुधांत पाणी मिसळलं ह्या आरोपावरून लगेच त्याला गुन्हेगार धरतात व करतात दंड. काल मी सुद्धा असाच अचानक त्यांच्या हातांत सापडलों. त्यांचं यंत्र कांहीं माझ्या दुधाचा सरकारी कस दाखवीना. लगेच ठरलों गुन्हेगार व झाला दंड! आतां बघा, दंड कुठून देणार? शिवाय वर अप्रामाणिक ठरलों तें वेगळंच." तो हताश चेहरा करून थांबला.

"अरे, मग त्यापेक्षां सरकारी कस येण्याइतकं चांगलं दूध येण्याची व्यवस्था करावी. गुरांना सरक्या–पेंडीचा खुराक चालू करावा. दुधांत पाणी मिसळूं नये, म्हणजे आपोआपच दूध चांगलं निघतं..." माझ्याजवळ उपदेश काय थोडा होता! एखाद्या व्याख्यात्याच्या आवेशानें मीं भाषण सुरू केलें.

"साहेब, आपण म्हणतां तें ठीक आहे. आतां मी आपणांलाच विचारतों, इतकीं वर्षं मी आपल्या घरीं दूध घालतों आहें, कधीं एक दिवस तरी पाणी मिसळलेलं आढळलं का? पोराबाळांची शपथ घेऊन सांगतों साहेब, पाण्याचा एक थेंबही कधीं मिसळला असेल तर हराम. अहो, आपल्यासारख्यांना दूध विकायचं, पैसे घ्यायचे नि पाणी घालून पाण्याचे पैसे घेऊं? तें पाप कुठें फेडूं? आतां दुधाचा कसच कमी होत चालला, त्याला काय करणार? तुम्ही पाहातांच आहां, महागाई ही अशी. आमचं सर्वांचं पोट दुधाच्या धंद्यावर. घरीं चार कच्चींबच्चीं आहेत. त्यांच्या तोंडीं घास घालून मग गुरांचं चारापाणी

व्हायचं. गुरं सुद्धा लेकरांसारखींच. पण साहेब, पोटच्या पोरांइतकी माया! काय गुरंची येणार आहे? थोडीशी हयगय होतेच. नाहीं करायची म्हटलं तरी होते! आणि मग असा भुर्दंड भरावा लागतो. आणि समजा साहेब, मीही गुरांना भरपूर खायला घालूं लागलों व मींही स्वतःचं खाणं तसंच ठेवलं, तर मला दूधही महागच नाहीं का विकावं लागणार? आज ज्या भावानें दूध मी विकतों त्या भावानें विकणं मग मला कसं परवडेल? शिवाय गोरगरीब तरी मग महागडं दूध कुठून विकत घेणार? गोरगरीब कशाला साहेब, आपण तरी मग घ्याल कीं नाहीं कोण जाणें? घ्याल का? देतां का मला एखादा रुपाया भावांत वाढवून? तेवढाच चांगला घास माझ्या गुरांच्या तोंडीं पडेल...!"

गवळ्यानें ह्या प्रश्नाच्या उत्तराची अपेक्षा ठेवलीच नव्हती. तो आपलें भांडें उचलून चालूं लागला होता. त्याच्या गुरांच्या तोंडीं चांगला घास घालण्याची तूर्त माझी तयारी नव्हती, मला घाई होती ताज्या दुधाच्या चहाची!

पण त्या गवळ्याच्या बोलण्यांत तथ्यांश नव्हता का? दुधांत पाणी मिसळल्याची तक्रार करण्याचा प्रसंग आम्हांला कधींच आला नव्हता. आतां सर्वच गवळी इतके प्रामाणिक असतात असें नव्हे, किंवा बहुतेक गवळी नसतातही. परंतु वाइटाबरोबर चांगल्यालाही शिक्षा होते ती अशी. अधिक सकस दूध मिळण्याकरतां जो अधिक खर्च करायला हवा तो त्यानें कोठून करायचा? दूध अत्यंत महागलें तर गोरगरिबांना त्याचा एखादा थेंब तरी मिळेल का? दूध निर्भेळ, शुद्ध हवें हें खरें; पण तें विकत घ्यायला पैसे तरी हवेत ना? माझेंच पाहा ना, भावांत एखादाही रुपाया वाढवून देण्याची माझी कोठें तयारी होती? महाग दूध विकलें गेलें नाहीं तर गवळ्याचा चरितार्थ कशावर चालायचा? मग आमचीं तीं सरकारी माणसें व दूध तपासण्याचीं त्यांचीं यंत्रें, तीं काय उगीचच? मग काय, आहे तीच स्थिति चालू ठेवून लबाड गवळ्यांना दुधांत पाणी मिसळण्यास अवसर ठेवायचा? का आमच्या गवळ्याप्रमाणें निरपराधी गवळ्यांना शिक्षा करायची? नेमके गुन्हेगार कसे सापडणार? तोंपर्यंत निरपराधी लोकांनींही त्रास सोसावा! जगाचा न्यायच आहे असा!

★

# ४ वेडा हसन्या !

हसन्या ! हो हसन्याच ! आतां त्याला हसन म्हणून कोण ओळखतो ? पूर्वीची ओळख असली तरी त्याच्या वेडेपणीं कोण ती ओळख दाखविणार ? वेड्या माणसाशीं कधींकाळीं आपला संबंध होता असें शाहाण्या जगाला दाखवावेंसें कसें वाटेल ? म्हणूनच जाणतीं माणसेंही चार पावलें दूरच राहून, 'अरेरे, गरीब बिचारा !' म्हणून सहानभूति दाखवितात, फुकटचा एक सुस्कारा टाकून आपल्या मार्गाला लागतात. जगाच्या व्यवहाराबाहेर गेलेल्या हसनला त्याची दखलही नाहीं. त्याच्या लेखीं आजूबाजूचें जग असून नसल्यासारखेंच आहे. तो आपल्या स्वतःच्या तंद्रींत खुशाल रस्त्यावर येरझारा घालीत असतो, स्वतःशींच कांहींतरी पुटपुटत असतो. वेड्याचें बरळणें जगाच्या चालू भाषेंत नसल्यानें त्याचा अर्थच कांहीं लागत नाहीं, किंवा अर्थ लावण्याचा प्रयत्न करण्याचें तरी कारण काय ? नाहीं म्हणायला पूर्वपरिचित हॉटेलवाल्याची ओळख मात्र हसन विसरला नाहीं. आजही त्याच्या दाढीमिशांनीं भरलेल्या तोंडांतून 'शंकरराव शंकरराव' म्हणून हाक येऊं लागली, म्हणजे झाडाझुडपांतून चीत्कारणाऱ्या एखाद्या श्वापदाचाच भास होतो. वेडा म्हणजे पशूच तो ! पण ह्या [ नर ] पशूंना सुद्धा सौम्य करणारी भूक त्यांना भानावर आणते व मग ते खाऊं घालणाऱ्या ओळखीच्या जीवांना हुडकीत साद देऊं लागतात. तसाच प्रकार हसन्याचा. पोटांतील भुकेनें जागं केलं म्हणजे रामनामाप्रमाणें प्रथम त्याच्या तोंडून 'शंकरराव, शंकरराव' म्हणून नामोच्चार होऊं लागतो. एरव्हीं हसन्या पांघरण्याचें बुंगट घेऊन रस्त्याच्या कडेला स्वतःच्या शरिराचें मुटकुळें करून पडला, म्हणजे मग तो जिवंत आहे, कीं मेला ह्याची वासपूसही कोण करतो ? जाणारा येणारा स्वतःच्याच व्यवसायांत; त्याला तरी काय ठाऊक, कीं हें बोचकें एखाद्या जिवंत माणसाचें शरीर आहे, तो माणूस पूर्वाश्रमीं धोब्याचा धंदा करीत होता आणि आज तो धोबी वेडा होऊन असा पडला आहे. हसन्याला सकाळ संध्याकाळ खाऊं घालणारा व चहा पाजणारा शंकरराव केवळ एका हॉटेलचा मालक असून नेत्रपरिचयाशिवाय त्याची नि हसन्याची दुसरी कांहींच ओळख

नाहीं. परंतु माणुसकीची ओळख अधिक अंशानें असल्यामुळें शंकरराव आज ह्या वेड्या जीवाला पोशीत आहे! जग माणुसकीवर चाललें आहे म्हणतात तेंच खरें!

हसनचा प्रेमभंग झाला नाहीं, किंवा दारिद्र्याच्या आंचेनें इतर सर्व शक्ति करपून जाऊन हसन्या वेडा बनला नाहीं. हसन्या वेडा झाला बायकोच्या त्रासानें! सुशिक्षित जगतांत आणि स्त्रीदाक्षिण्याच्या कालांत स्त्रियांना होणारा पुरुषांचा जाच वर्णन करण्याचा आजचा संकेत आहे. पण हसन्याच्या आयुष्यांत त्यानें बायकोला छळल्याचें ऐकिवांत नाहीं; उलट त्याच्या बायकोनेंच त्याला सतावून सोडल्याचें प्रत्यक्ष पाहाण्यांत आहे. पुरुषासारखा पुरुष हसन्या, परंतु एकदा का कडाडणाऱ्या विजेप्रमाणें बायको आंगावर आली, कीं अगदीं गोगलगायीपेक्षां गरीब बनून जात असे. त्याच्या दुर्दैवाचें तें विपरीत दृश्य पाहून आंगावर काटा उभा राही व त्या वेळी कोपऱ्यांत खालीं मान घालून व केविलवाणी मुद्रा धारण करून बसलेल्या हसन्याविषयीं विशेषच अनुकंपा वाटे. पुरुषांना तर तें दृश्य लज्जास्पदच वाटे; परंतु स्त्रियांना सुद्धा हसनचीच कीव येई. स्त्रीजात म्हणून हसनच्या बायकोची कड घेणारी व्यक्ति कोणीच नव्हती. स्त्री काय किंवा पुरुष काय कोणालाही सहानुभूति वाटते ती सज्जनाविषयींच!

हसन्या आपल्या धोब्याच्या धंद्यांत वाकबगार होता. बाप असतांनाच त्याचें लग्न झालें होतें. त्याला मुलेंबाळेंही होतीं. बाप होता तोंवर त्याचा आयुष्यक्रमही व्यवस्थित चालला होता. त्याला म्हणण्यासारखें व्यसनही नव्हतें. शिवाय मर्यादशीलही असा, कीं बापासमोर विडीही पिण्यास तो कचरे. धंद्यांत प्रामाणिक तसाच. गिऱ्हाइकांच्या कपड्यांत कांहीं सापडलें तर तो जसेंच्या तसें त्यांना परत करी. एकदा तर एका गिऱ्हाइकाच्या कोटांत चुकून दहाबारा रुपये तसेच आले. बिचारा गृहस्थ धावपळ करीत शोध काढीत हसनच्या घरीं आला, तों त्यापूर्वींच हसन स्वतः त्या गिऱ्हाइकाच्या घरीं पैसे परत करावयास गेलेला, असा सच्चा व्यवहार! हसनच्या डोक्यांतही कोणतीही विकृति नव्हती. हसनचें आयुष्य जगाच्या राहाटीप्रमाणें सुखासमाधानानें चाललें होतें. हसनची बायकोही सासरा असतांना कधीं आकस्ताळीपणा करीत नव्हती. सासऱ्याच्या सेवेंत व नवऱ्याच्याबरोबर कामधंदा करीत तीही नीटपणें राहात होती. तेव्हां कोणाला वाटलें होतें, कीं ह्यांच्या ह्या संसाराची पुढें धूळधाण होणार आहे व

हसन वेडा होऊन ह्याच जागीं निराधार होऊन पडणार आहे ? पण भवितव्यता केव्हां केव्हां इतकी बलवत्तर ठरते, कीं ती कल्पनेलाही लाजवील इतक्या खऱ्या गोष्टी घडवून आणते !

हसनचा बाप वारला व संसाराचा सारा भार हसन वाहूं लागला. धंदेवाइकांच्या घरांत वरच्या माणसाच्या मृत्यूनें सारें घर एकदम अन्नाला महाग होत नाहीं. मिळविता पांढरपेशा कारकून गेला, म्हणजे सगळें कुटुंब एकदम उघडें पडतें व साऱ्यांच्याच जीविताचा उन्हाळा होतो. कामकऱ्यांच्या घरीं प्रथमपासूनच सर्वजण आपापल्या कामाला लागलेलीं असतात; तेथें एखादा गेला तर खांदेपालट होतो, इतकेंच. साराच संसाराचा गाडा पडून रहात नाहीं.

हसन्या घर चालवूं लागला, दुकानदारी करूं लागला. परंतु काय त्याचें दुर्दैव ओढवलें कोण जाणें, त्याची बायको त्याच्याशीं भांडूं लागली. घरांतल्या घरांत भांड्यास भांडें लागून थोडा आवाज व्हायचाच, पण हा तसला आवाज न होतां रोज आक्रोश होऊं लागला. प्रथम प्रथम हसन्या उत्तराला प्रत्युत्तर देई व बायकोला गप्प करण्याचा प्रयत्न करी. नवराबायकोचें भांडण सुरू झालें म्हणजे वाटचे तमासगीर साहाजिकच त्याच्या दारासमोर गोळा होत. बघ्या मंडळींची गर्दी जमली, कीं त्याच्या बायकोला चेव येई व ती तावातावानें बोलूं लागे. बायकोचा उपमर्द सहन न होऊन हसन तिला दरडावण्याचा आव आणी. पण त्याचें तें उसनें बळ फार वेळ टिकत नसे. तोंडाळ बायकोच्या गर्जनेपुढें त्याचा बिचाऱ्याचा सौम्य आवाज किती वेळ टिकणार ? लवकरच तो गप्प बसे. रस्त्यावरच्या लोकांची त्यालाच लाज वाटे व तो कोपऱ्यांत स्तब्ध बसे. बायकोपुढें हार खातांना त्याच्या पुरुषी मनाला काय यातना होत असाव्यात हें त्याच्या दीन मुद्रेवरून नीट ध्यानीं येई. मध्येंच उसळून तो म्हणे, "औरत है या कौन है ? मैं तेरा मरद हूं !" हसन्याच्या त्या डिवचण्यानें अधिकच खवळलेली त्याची बायको त्याच्या पुढें जोरजोरानें हातवारे करूं लागे व त्याला तुच्छतेनें म्हणे, "तूं औरत है, औरत तूं है ! मैं मरद हूं !" स्त्रीजातीचा तो पुरुषी आविर्भाव बाहेरच्या बघणारांना सुद्धा स्तंभित करी, तेथें बिचारा हसन हताश होऊन भकास चेहरा करून बसल्यास नवल काय ! चाललेल्या प्रकारावर कांहींच तोड नाहीं म्हणून वाटेवरचे लोक निमूटपणें आपापल्या मार्गाला लागत. हसनच्या बायकोचें तोंड वाजतच राही,

मुलें दीनवाणीं तोंडें करीत रस्त्याकडे पाहात, हसन दोन हातांच्या बेचक्यांत डोकें धरून स्वस्थ बसे, रिकामें पडलेलें हसनचें इस्त्रीयंत्र काम नसल्यानें कुशीवर स्वस्थ पहुडे, घरांत अग्निसाधनही नसल्यानें चूलखंड सदैव थंडच असे. पोरांची कीव करून कोणी शेजारीपाजारी त्यांना घास दोन घास भरवीत. हसन फक्त आंवढा व दुःख गिळीत दिवस काढी! असा दुर्दैवी क्रम कित्येक दिवस चालला होता. दिवसेंदिवस हसनचें लक्ष धंद्यांतून कमी होत चाललें. त्याचा बराचसा वेळ बायकोशीं झगडण्यांत जाऊं लागला. नेहमीं हसनलाच हार खावी लागे. पुढें पुढें रस्त्यानें जातांनाही डोकें फिरल्यागत वेडसर चाळे तो करूं लागला. आपल्याशींच हातवारे करीत चालणाऱ्या हसनकडे पाहून त्याचे स्नेही सोबती त्याची कीव करूं लागले. लवकरच हसन बिऱ्हाड बदलून दुसरीकडे चालता झाला!

परंतु काय चमत्कार? पुनः बऱ्याच दिवसांनीं हसन्या आपल्या पूर्वपरिचित जागीं आला! त्या वेळचा त्याचा अवतार काय विचारावा? वेडच लागलेलं त्याला आतां. फक्त नेसूं वस्त्र जागेवर होतें इतकेंच. बाकी त्याच्या वागण्या-बोलण्याला कांहींच ठिकाणा नव्हता. गमतीची गोष्ट अशी, कीं त्याचें डोकें फिरलें होतें, पण मनावरचा जुन्या राहात्या जागेचा संस्कार गेला नव्हता किंवा तिजवरचें त्याचें प्रेम नाहींसें झालें नव्हतें. एखाद्या जुन्या खास ओळखीच्या माणसाला भेटावयास यावें त्याप्रमाणें हसनच्या पायानें त्यास जुन्या ठिकाणीं आणलें होतें. गातगात, डुलतडुलत हसनची स्वारी पुढें चाललेली व मागाहून पोरांचा तांडा वेड्याची गंमत करीत चाललेला असा तो थाट होता. हसन वेडा खरा, परंतु आपल्याला पोरांनींही हसावें हें त्याला खपेना. त्यांच्यावर उलटून तो ओरडून म्हणतो, " हंसते क्यौं हो! क्या यहाँ कोई पागल आदमी है?" वेड्या माणसाचा तो शाहाणपणाचा प्रश्न ऐकून तर त्याच्या दुर्दैवाची अधिकच कीव आली. आपल्याच नादांत विलीन झालेल्या त्या वेड्याला स्वतःच्या वेडेपणाची तरी जाणीव कोठची?

हसन्या आतां पूर्ण वेडा झाला आहे. त्याच्या बायकोचें व पोरांबाळांचें पुढें काय झालें कोण जाणे. माणसांनीं बुजबुजलेल्या जगांत हसनची बायको व त्याचीं पोरें ह्यांचा हिशेब काय? आणि आतां खुद्द हसनच्या जिवाची तरी काय किंमत आहे? मधें मधें हसन रस्त्यावर येरझारा तरी करीत असे.

आतां तर तो तेंही करीत नाहीं. आपल्या अन्नदात्या दुकानदाराच्या दुकानासमोरच आपल्या शरीराचें गाठोडें करून हसन्या पडलेला असतो. त्याचा जीव भुकेनें कळवळूं लागला म्हणजे मग तो 'शंकरराव, शंकरराव' म्हणून विव्हळूं लागतो. पोटांत अन्नांश जातांच त्याचा थंडावलेला जीव आपल्या वेडाच्या लहरींत पुनः मग्न होतो. हसन्या जागा होईल तेव्हां त्याचा दिवस, तो निजेल तेव्हां त्याची रात्र. ह्या वेड्या, दुर्दैवी जीवाच्या नशिबीं आयुष्य तरी किती आहे, ईश्वर जाणे! कोणी प्रेमभंगानें वेडे होतात, कोणी द्रव्यनाशानें वेडे होतात, कुणी अतिविचारानें वेडे होतात; हसन्या वेडा झाला तो बायकोच्या त्रासानें! आतां एक मृत्यूच त्याचें वेड दूर करूं शकेल आणि त्याच्या मृत्यूची नोंदही नगरसभेला स्वतःचीं माणसें पाठवूनच करावी लागेल. त्यांतही त्याचा मृत्यु होऊन त्याची वार्ता नगरसभेला लागेपावेतों किती वेळ जाईल कोणीं सांगावें? रस्त्यावरच्या कुत्र्यामांजरांत आणि हसन्यांत आतां काय अंतर आहे?

★

## ५ पार्सल क्लार्क

जनूभाऊ पोस्टांत पार्सल क्लार्क म्हणून नेमले गेले आणि त्यांनीं एक सुटकेचा निःश्वास टाकला. आज इतके दिवस पायपीट करकरून नोकरी शोधण्याच्या यातायातींत जनूभाऊ अगदीं रडकुंडीला आले होते. रोज सकाळीं आशेनें उठावें, आज तरी कोठें वर्णी लागेल, कोणाचा तरी शब्द आज फळेल, ही अपेक्षा मनांत बाळगावी, खिन्न मनानें चार घास पोटांत कोंबावे, अर्जाचे कागद गुंडाळून खिशांत भरावे व दुपारपासून नोकरीकरितां सर्वत्र वणवणावें अशा कार्यक्रमांत जनूभाऊंचे कित्येक दिवस लोटले. रोज तेंन् तेंच. तसलाच दिवस, तसलीच पायपीट, तीच निराशा! नकार, नकार, सर्वत्र नकार! ह्या नित्याच्या नकारामुळें जनूभाऊ अगदीं जिवाला वैतागून गेले. पण नको असलेला जीव सुद्धा टाकून देणें कांहीं सोपें नाहीं. त्या नकोशा झालेल्या जिवाचें ओझें बाळगूनच जनूभाऊ फिरत व नित्य नव्या ठिकाणीं याचना करीत. शेवटीं एकदाचें त्यांच्या तपश्चर्येला फळ आलें व त्यांची पोस्टांत पार्सल क्लार्क म्हणून नेमणूक झाली. जनूभाऊंना सहजच मोठा आनंद झाला; नवजीवन प्राप्त झालेंसें वाटलें. रोजच्या त्यान् त्याच निराश भटकण्याला आतां आपण सुटलों, नव्या आयुष्याला आपण सुरुवात करणार ह्या सुखद विचारांत जनूभाऊ नोकरीवर दाखल झाले.

कोणत्याही गोष्टीचा नवेपणा मनुष्याला प्रथम आपणाकडे आकर्षून घेतो; मग ती गोष्ट मुळांत कितीही त्रासाची, कंटाळवाणी असो. नवें घर, नवी बायको, नवें मूल, नवा संसार, नवी नोकरी, नवेपणाच्या झगझगाटांत त्यांचें खरें स्वरूप ध्यानीं येत नाहीं. रंग उतरलेल्या नटाप्रमाणें त्यांचें खरें स्वरूप परिचयानेंच कळतें. जनूभाऊंचें तसेंच झालें. प्रथम जनूभाऊ पोस्टांत कामावर रुजू झाले ते कोण डौलांत. पार्सलांचा ढीग आजूबाजूला पडला आहे, त्या प्रत्येकावरील पत्ता चटकन् वाचून जनूभाऊ तें पोस्टाच्या शिपायाच्या हातीं बटवडा करण्याकरितां फेकताहेत; मध्येंच रजिस्टरें, पार्सल करावयास आलेल्या मंडळींच्या बंग्या जनूभाऊ झरझर घेताहेत, तोल करून तिकिटें किती पाहिजेत तें सांगताहेत, पावतीबुकांत त्यांची नोंद करून ठकून पोस्टाच्या छापानिशीं

पावती मालकाच्या स्वाधीन करताहेत, अशी जनूभाऊंच्या जिवाची एकच धांदल उडे. पण ह्या साऱ्या धांदलींतही जनूभाऊ गडबडत नसत. वजन करणें, पावत्या लिहिणें, छाप मारणें, इत्यादि गोष्टींत त्यांचें चापल्य दिसून येई व हा पार्सल क्लार्क मोठा चपळ आहे असेंच खिडकीशीं गर्दी करून उभ्या असणाऱ्या साऱ्या लोकांना वाटे. जनूभाऊंचे उपरी अंमलदारही त्यांच्या आवरशक्तीवर खूष असत. आजूबाजूची इतर नोकर मंडळी त्यांचा तो प्रारंभींचा उत्साह पाहून आपल्याशींच हसत.

पण ही कामाची नवाळी फार दिवस टिकली नाहीं. लवकरच जनूभाऊंना स्वतःचा उत्साह कमी होत चालला आहे असें वाटूं लागलें. पार्सलांच्या ढिगाचा त्यांना पुढें पुढें राग येऊं लागला. लोक एवढें एकमेकांना पाठवितात तरी काय, ह्याचाच त्यांना अचंबा वाटूं लागला. एका नंबरच्या पोस्टमनचीं पार्सलें केव्हां केव्हां दुसऱ्या नंबरांत जाऊं लागलीं. पोस्टमन् कुरकुरे व जनूभाऊ त्रासिकपणें कांहीं तरी बोलत. खिडकीशीं गर्दी करून उभ्या राहाणाऱ्या लोकांवर जनूभाऊ त्रासिकपणें एक दृष्टिक्षेप करून मग खिडकीचें दार खटकन् उघडीत. लोकांवरचा राग क्षणभर ते खिडकीच्या निर्जीव दारावरच काढीत. गर्दी करून रेटारेट करणाऱ्या लोकांवर जनूभाऊ खेकसत व त्यांचे हात मागें रेटीत. व्ही. पी.चीं पावतीबुकें, रजिस्टरचीं पावतीबुकें यांची गल्लत होऊं लागे, शिक्का चटकन् हातीं लागेना, शिक्क्याची शाई चांगली उठेना, असे एक कीं दोन अनेक प्रकार होऊं लागले. खिडकीच्या दाराशीं जमलेली झिम्मड पाहून जनूभाऊंचा धीर खचे. मान खालीं घालून ते जे कामाला लागत ते कपाळावरचा घाम टिपून टाकायला म्हणून ती बाजूला करीत. इतकें असूनही बाहेरच्या लोकांना जनूभाऊंच्या कष्टाची जाणीव व्हावी तशी होईना. त्यांना वाटे हा मास्तर बराच ढिला आहे, त्याचा हातच चालत नाहीं. जो तो आपल्यापुरतेंच पाहाणारा व जो तो अगदीं घोड्यावर आलेला. प्रत्येकाची इच्छा ही, आपण पोस्टांत पाऊल टाकतांच आपलें काम तात्काल व्हावें व आपण उलट पावलीं परतावें. प्रत्येकाची निकड स्वतःपुरती, पण जनूभाऊंना तर सर्वांचें काम उरकायचें व तेंही ठरलेल्या वेळांत. तोच कांटा, तींच वजनें, तसलींच पार्सलें, तेच हिशेब. ह्या त्याच-त्यापणाचा जनूभाऊंना कंटाळा येत चालला. बंगी घ्या, वजन करा, तिकिटें

सांगा, पावती लिहा, शिक्का मारा, ह्या साऱ्या क्रमाचा यांत्रिकपणा जनूभाऊंना जाचक होऊं लागला. बसून बसून कंबर दुखे, खालीं पाहून पाहून मान अवघडे, लिहून लिहून हात दमत, ठराविकपणामुळें डोकें जड होई, कामाच्या जबाबदारीमुळें जीव दडपून जाई. हा सारा मुका मार जनूभाऊ मुकाट्यानें सहन करीत. त्यांच्या कामांतील वाढता संथपणा अलीकडे त्यांच्या उपरी अंमलदाराच्या थोडा थोडा ध्यानीं येत चालला होता व एक दोन वेळां त्यांना त्याबद्दल समजही मिळाली होती. त्यांचे सवंगडी आतां हा आपल्या कळपांत पुरापुरा येत चालला आहे म्हणून आंतल्या आंत समाधान मानीत होते. जनूभाऊ मात्र पूर्वीची आपली तरतरी मिळविण्याचा क्षीण प्रयत्न करीत होते. पण त्यांच्या त्या प्रयत्नांना यश यावें कसें ? प्रातःकालीं थोडा वेळ ताजातवाना असलेला त्यांचा जीव कामावर जाण्याची वेळ होतांच तेथच्या कामाच्या कल्पनेनें हबकून जाई. निरुत्साही वृत्तीनें सुरू केलेलें काम दिरंगाईनें चाले, मन व डोकें दुर्बल होई व त्यामुळें शरीरावरही दुबळेपणाची कळा येई. ह्या साऱ्या गोष्टी दिसत असूनही जनूभाऊंना टाळतां येत नसत. कामाची वेळ संपली, कीं केलेल्या कामाचा ढीग पाहून जनूभाऊ एक निःश्वास टाकीत, उठायची वेळ होतांच हुशहुश करीत आंगाला आळेपिळे देत उठत व एखाद्या कैदखान्यांतून सुटल्याप्रमाणें बाहेर पडत. पायऱ्या उतरतां उतरतां एक तिरस्काराचा दृष्टिक्षेपही मागें टाकण्यास चुकत नसत. पण तेव्हांच त्यांच्या मनांत एक विचार डोकावून जाई...

उद्यां काय ? पुनः हेंच ! तीच खिडकी, तोच कांटा, तींच वजनें, तसल्याच बंग्या, त्याच पावत्या न् तोच शिक्का. हें तेंच तेंच आपल्या नशिबाचें केव्हां संपणार ? का हें तेंचतेंचपण आपलें सारें आयुष्य खाणार ?

★

६

# आमचा शिंपी

केव्हांही त्याच्याकडे जा—आज वीस वर्षें त्याचा माझा व्यवहार आहे—त्याची स्वारी दुकानाच्या तोंडाशीं अगदीं तशीच उभी. गळ्याभोंवतीं टाकलेली टेप, तोंडावर हसूं, सदा आनंदानें स्वागत करायला तयार.

"काय साहेब, कोट ना ? सर्जचा करतां का मद्रास चेकचा ?" हा त्याचा नेहमींचा प्रश्न.

नेहमीं कापडाचे हे दोनच काय ते नमुने माझ्या पसंतीला तो टाकी. गेल्या वीस वर्षांत त्यांत कांहीं फरक झाला नाहीं. आणि आतां तर कांहीं बदल करण्याची वेळच टळून गेली.

"काय सर्जच ना ? हं सर्जच ! जांभळं ?—जांभळं." जणूं काय तो मला एखादी नवी कल्पनाच सुचवीत आहे. "हं मगन, काढ तें आपल्या जांभळ्या सर्जचं ठाण. हं, हें पाहा साहेब, अगदीं कोरं करकरीत."

जसें कांहीं सहजच त्याच्या हाताला एखादें उत्कृष्ट ठाण लागलें असावें.

एक पाय उंच करून, त्यावर कापडाची घडी ठेवून जेव्हां तो हातानें त्याचें पोत दाखवूं लागे तेव्हां तर कोणीही क्षणभर त्याच्याकडे कौतुकानेंच पाही. ह्या पवित्र्यांत कापड दाखवीत असतांना गिऱ्हाईक तें पसंत करणार नाहीं म्हणजे काय बात आहे ! कापडाची खरी खुमारी कळायला तें एखाद्या शिंप्यानें आपल्या पायावरच दाखविलें पाहिजे. मला वाटे, कीं असा एक पाय वर करून, विकलांग झाल्याप्रमाणें हा हवा तेवढा वेळ उभा राहूं शकेल.

"पण हें बरं असेल का ?" मी त्यास विचारीं.

"बरं म्हणजे काय, अगदीं फक्कड." तो उत्तर करी.

त्याच्या उत्तराविषयीं संशय घेण्याचें मला कारणच नाहीं. आणि कापड तरी चांगलें कां दिसूं नये हेंच मला समजत नाहीं. परंतु हाच प्रश्न मी नेहमीं विचारीं; कारण मला ठाऊक, कीं त्याचीच तो अपेक्षा करीत असे व त्यापासून त्याला आनंदही होई. व्यवहार आहे हा, त्यांत देवघेव उभयपक्षीं सारखी हवी.

"पण त्याचा रंग जरा भडक नाहीं का ?" माझा नेहमींचाच पण त्याला आनंदविणारा प्रश्न.

"छे, छे, भडक कसचा ? तसं म्हटलं तर हा रंग अगदीं सौम्य आहे. आम्ही आमच्या गिऱ्हाइकांना भडक रंग केव्हांही सुचवीत नाहीं."

भडक रंगाचा कोट आजवर मीं कधींच केला नाहीं. परंतु आपलें विचारलेलें बरें म्हणूनच मी विचारीं इतकेंच.

नंतर माप — फक्त छातीचेंच माप. बाकीचीं मापें कित्येक वर्षांपूर्वीं घेतलीं तींच चालू. आतां छातीचें माप घ्यायचें तें केवळ मला जरा बरें वाटावें म्हणून. नाहीं तर मी कोठें प्रतिवर्षीं वाढत होतों ?

"छाती थोडी वाढली आहे, नाहीं ? समजलं का मगन, छाती थोडी — अर्धा इंच — सैल हं...!"

केवळ थाप, पण किती प्रेमळ. छाती वाढली हें ऐकून कोणाला आनंद होत नाहीं ?

"हं मग..." मग म्हणण्याची त्याला नेहमींचीच खोड. "पुढील मंगळवारच्या आठा दिवसा ! समजलं का मगन ? पुढील मंगळवारच्या आठा दिवसा."

"बरं पण पैसे..." मी बोलूं लागे.

छट्, पण आमचा शिंपी मुळीं पैशाची गोष्टच काढूं देत नाहीं. जणूं काय त्या विषयानें त्याला व मला दोघांनाही दुःखच होईल.

पैशाचा प्रश्न आम्ही असा सोडवीतच नाहीं; तो निरोपानिरोपीं पण कोणालाही राग न येईल अशा रीतीनेंच आम्ही सोडवीत असूं. त्याचा निरोप यावयाचा तो असा, कीं जणूं कांहीं मोठ्या कष्टानेंच तो हें काम करीत असावा. पैशाची ओढ, इतर गिऱ्हाइकांचा बुडवेपणा, नवीन यंत्रखरेदीची गरज, इत्यादि कारणांमुळेंच केवळ आपण शब्द पाठवीत आहों, नाहीं तर एरव्हीं पैशाचें नांवही काढलें नसतें, हें त्याचें नेहमीं म्हणणें. आतां माझे एकामागून एक दोन तीन कोट होऊन गेले तरी त्याची यंत्रखरेदी चालूच होती. हें जरा विचित्र खरें; पण केवळ योग, दुसरें काय ? असो. पण पैशाची गोष्ट आम्ही त्या वेळीं काढीत नसूं हें खरें. त्याऐवजीं आमचा शिंपी हवापाण्याच्या गोष्टी काढी. सामान्य माणसें बोलण्याचा आरंभ हवापाण्यापासून

करतात. मला वाटतें, शिंपी लोक हवापाण्याचा उल्लेख शेवट करीत असावेत. कपडे शिवावयास टाकले तरच त्या शिळोप्याच्या गोष्टी निघावयाच्या— एरव्हीं नाहीं.

" हवा सध्या छान आहे, नाहीं ? " नेहमीं हवा चांगली; कधींही तक्रार नाहीं. कदाचित गिऱ्हाइकांनीं कपडे शिवावयास टाकणें म्हणजे तेवढीच पैशाची ऊब. मग हवा बरी न वाटावयास काय झालें !

झालें, संपलें काम. नंतर मी सहजच दुकानाच्या पायऱ्यांकडे वळें.

" कांहीं खमिस वगैरे ? "

" छे, छे, कांहीं नाहीं."

हा सुद्धा एक औपचारिक व्यवहार होता. खरें म्हटलें तर मी त्याजकडून खमिस केव्हांच शिवून घेत नसें, तरी सुद्धा वर्षानुवर्ष तोच प्रश्न तितक्याच आर्जवानें तो विचारी.

" बरं, एखादी कॉलरबिलर ! "

पुन्हा निरर्थक प्रश्न. कॉलर मी वापरतोंच कधीं ? असें आमचें संभाषण आज कित्येक वर्षें अविच्छिन्नपणें चाललें. त्यांतील कांहीं गोष्टी निरर्थक खऱ्या पण त्यांची जर विचारपूस केल्याशिवाय त्या राहिल्या तर अंतःकरणांतील कोठला तरी एखादा धागा तुटला कीं काय असें मला वाटे.

नंतर आम्ही निरोप घेत असूं.

" बरं नमस्कार. पुढल्या मंगळवारच्या आठा दिवसा हं. नमस्कार."

* * *

असा आमचा हा व्यवहार चाले. चाले म्हणण्याचें कारण तो नुकताच परवां संपूर्ण झाला. नेहमींप्रमाणें कोट शिवण्याकरितां त्याच्या दुकानांत पाऊल ठेवतों तों तो मृत झाल्याचें समजलें ! इतर मंडळी आपापलीं कामें करीत होती, त्यांनींच मला त्याच्या निधनाची बातमी सांगितली. मला तर एकदम धक्काच बसला. प्रथम तर तें खरेंच वाटेना. मला वाटे, कीं त्याला मरण—छे, त्याला मरणच नसावें ! धंद्याच्या हलाखीनें तो मेला म्हणे. छे, शक्यच नाहीं. तो किती आनंदी, किती शांत दिसे. गळ्याभोवतींची त्याची ती पट्टी, तोंडावरचें तें हसूं, गिऱ्हाइकांचें माप घेण्याची त्याची ती लकब ! त्याला मरण ? कित्येक वर्षें धंद्यांत त्याचा पाय मागेंच पडत होता, त्याच्या कुटुंबाची तर

अगदीं दुर्दशाच होती म्हणे! त्याचें कुटुंब वगैरे कांहीं असेल हें आजवर माझ्या ध्यानींच आलें नाहीं. नाहीं म्हटलें तर बिचाऱ्याला बायको व एक मुलगी होती. मुलगी कोठें तरी गायनाचा अभ्यास करीत होती व स्वतः त्यालाही गाण्याचा शोक होता. त्याला कीर्तनाचीही आवड होती. परंतु गाणें, कीर्तन ह्या गोष्टी आमच्या बोलण्यांत कधीं आल्याच नाहींत. दुकानाच्या बाहेर पाऊल टाकतांना त्याचा तो ओळखीचा शब्दच कानीं पडतो आहे कीं काय असा मला भास झाला—

"आणि कांहीं खमिस वगैरे?"

आणि खरोखरच त्याच्यापासून खमिस करविले नाहींत म्हणून क्षणभर मला वाईट वाटलें.

ह्या कथेंतही तात्पर्य आहे असें मला वाटतें. परंतु जाऊं द्या, हव्यात कशाला त्या तात्पर्याच्या गोष्टी? आणि समजणाराला सांगायला कशाला पाहिजे?

★

## ७ आंधळी

गरीब बिचारी आंधळी !

—आणखी त्यांतच भिकारी !

—तिच्या आयुष्यांत तें सांगण्यासारखें, पाहाण्यासारखें काय असणार ?

—शिवाय तिला आपली जीवनकथा दुसऱ्याला सांगायला लागणारी बुद्धि कोठें होती ?

—किंवा जग पाहातां येणारी दृष्टिही तिला नव्हती !

—रस्त्याच्या कडेला बसून देवाचा धावा करीत ती भिक्षेकरितां हात पसरी.

—बिचारीला आपणासमोर कोणी आहे कीं नाहीं, हेंही ठाऊक नसे !

—कसें ठाऊक असणार ? कारण तिला मुळीं दिसतच नव्हतें. आंधळी होती ना ती !

—तिच्या आंगावरच्या लक्तरांतून तिचें दारिद्र्यच जणूं काय बाहेर पडत होतें.

—ती पोटावर थापट्या मारी, मध्येंच परमेश्वराच्या नांवानें टाहो फोडी, मध्येंच आपल्यासमोर पसरून ठेवलेल्या कळकट फटकुरावरून हात फिरवी.

—तिला वाटे, न जाणों कोणी एखाद्या दयाळू सज्जनानें आपल्याला नकळत एखादा पैसा टाकला असला तर...

—पण असा गुप्तदान करणारा सज्जन कोण असणार ?

—परंतु भोळी बिचारीची आशा.

—आशा आंधळी म्हणतात ना ? मग ही तर आंधळीचीच आशा !

—क्वचितच एखादा जाणारा येणारा तिची केविलवाणी स्थिति पाहून तिला कांहीं देईही. तसें नसतें तर ती जगते कशी ?

—क्वचित् एखादा टारगट मुलगा तिच्या हातावर दगड टाकी व दूर उभा राहून हसे—निष्ठुरपणें हसे !

—बिचारी आंधळी खेदानें दगड दूर भिरकावून देई व पुन्हा देवाचा धावा करूं लागे.

—देवाला ती आपली असहायता सांगत होती, कीं त्या मुलाला पारिपत्य करायला विनवीत होती, कीं त्यालाही क्षमा करायला ती प्रार्थीत होती ? तिला ठाऊक, कीं तिचें अंतःकरण जाणणाऱ्या देवाला ठाऊक.

—रोज रोज त्याच जागेवरून जाण्यानें माझेंही लक्ष रोज तिच्याकडे जाई.

—तीच अवस्था, तोच धावा, त्याच विनवण्या, तेंच दृश्य!

—रोजच्या पाहाण्यामुळें मलाही त्यांचा जणूं सराव झाला इतकेंच नव्हे, तर त्याविषयीं उत्सुकताही वाटूं लागे.

—त्या स्थळीं येतांच नेमकी त्या जागेकडे दृष्टि जाई. आंधळी आहे असें दिसलें, कीं एखादी वस्तु जागच्या जागीं असल्यासारखें वाटे आणि मी निश्चिंतपणें पुढें सरके.

—हा आपला रोजचा एक क्रमच होऊन बसला होता म्हणा ना!

—एके दिवशीं मी नित्याप्रमाणें त्या वाटेनें चाललों व सवयीनें माझे डोळे ती आंधळी बसे तिकडे वळले.

—परंतु आज तेथें आंधळी नव्हती, तिचें तें परिचित ओरडणेंही नव्हतें, कांहीं नव्हतें. जागा रिकामी होती.

—रोज लोक तेथून बाजूनें जात, आज लोक त्या जागेवरून चालत जात होते. त्यांना कांहींच ठाऊक नव्हतें. मला मात्र वाटलें, कीं जणूं काय ते त्या आंधळीवरूनच चालत जात आहेत.

—एखादी जागची वस्तु दूर गेल्यामुळें ती जागा रिकामी पडावी ना, तसा मला भास झाला.

—आणि मग उगीचच चुकल्यासारखें वाटलें. वेडें मन, दुसरें काय ?

—पुन्हा दुसऱ्या दिवशीं तीच गोष्ट. आजही कोणी नव्हतें. माणसांची ये जा चाललीच होती. माणसांना काय ? कोणी राहिलें काय कोणी गेलें काय ? त्यांचा व्यवहार अखंड आहे.

—मला मात्र प्रथमप्रथम उगीचच आठवण येई.

—परंतु पुढें पुढें मलाही विसर पडला.

—आणि एके दिवशीं ती जागाही दुसऱ्याच कोणी तरी पटकावली.

—जग हें असच आहे.

★

# ८ दक्षिणी आणि गुजराथी

" या रावसाहेब ! काय पाह्यजे आपणाला ? अगदीं नवीन, उमदं कापड आलं आहे. नमुना पाहा, तब्बेत नुसती खूष होऊन जाईल. मगनभाई, रावसाबने कापड बताव. "

गुजराथी व्यापाऱ्याचा लाघवीपणा काय वर्णावा ? परंतु माझा दक्षिणचा स्नेही तरी क्षणभर ह्या आतिथ्यानें गार झाल्यासारखा दिसला. त्या व्यापाऱ्याचा नम्र भाव, आमच्या स्वागताची तयारी, विशेषतः त्यानें आम्हांला दिलेली रावसाहेब ही पदवी, ह्या सर्वांचा साहजिकच त्याच्या मनावर परिणाम झाला. आम्हांला नको असतांही थोडेंसें अधिक कापड घेऊनच आम्ही बाहेर पडलों आणि मगच त्याच्या शाब्दिक आतिथ्यानें आमचे मात्र चार पैसे अधिक खर्च झाले हें आमच्या ध्यानीं आलें ! आतिथ्याचा खर्च त्याला व्हायच्या ऐवजीं आम्हांला झाला !

इतरत्र दुसराच प्रकार दृष्टीस पडला. एका गुजराथ्याचें दुसऱ्या कोणाशीं भांडण चाललें होतें. तो गृहस्थ तावातावानें बोलत होता. अगदीं हातघाईवर, वर्दळीवरच आला होता. परंतु त्या गुजराथी गृहस्थाची शांतता ढळली नाहीं. आजूबाजूचे लोकही ' जवा दो, जवा दो ' ( जाऊं द्या, जाऊं द्या ) म्हणून सोडवीत होते, कांहीं नुसताच कोलाहल करीत होते. तें दृश्य पाहून माझा दक्षिणचा पाहुणा म्हणतो,

" गृहस्थ अगदींच शामळो बुवा ! मी असतों तर समोरच्याला केव्हांच लंबा केला असता. गुजराथी म्हणजे एकंदरींत शामळोच ! "

गुजराथ्यानें आम्हां दक्षिण्यांना ' रावसाहेब ' पदवी द्यावी आणि माझ्या दक्षिणी मित्रानें त्यांना उलट ' शामळो ' म्हणावें या देवाणघेवाणाची क्षणभर तरी मला मोठी मौज वाटली.

परंतु हा प्रकार येथेंच थांबून राहिला नाहीं. येथून एक नवीन विचारचक्र सुरू झालें. दोन समाजांना एकमेकांविषयीं पुरेशी ओळख नसली म्हणजे बारीकसारीक गोष्टींचें सुद्धा एकमेकांना हसूं येतें आणि केवळ तेवढ्यावरूनच ते एकमेकांची चेष्टाच नव्हे तर उपहासही करूं लागतात. वास्तविक सारें

भरतखंड आतां एकजिनसी हिंदी जनतेनें व्यापून असावें, हिंदीत्व हाच सर्व जनतेतील सर्वसाधारण घटक असावा, दुय्यम भेद व पक्षोपपक्ष नाहींसे व्हावेत असा जोराचा प्रयत्न चालू असतांना दक्षिणी, गुजराथी असले प्रांतिक भेद बाळगणें, त्यांची जोपासना करणें, एकमेकांतील वैचित्र्याला फाजील महत्व देऊन त्याबद्दल चेष्टा किंवा उपहास करणें खरोखर अनुचितच! परंतु आज तरी सारेच प्रांतिक भेद चटकन् नष्ट होतील असें वाटत नाहीं. शिवाय सामुदायिक राजकारणांत सारेजण एकमेकांच्या मांडीला मांडी लावून बसण्याइतके एकध्येयी झाले असले तरी कौटुंबिक आणि सामाजिक भेद हे राहाणारच. तेव्हां कोणत्याही दोन समाजांत सलोखा नांदण्याचें उत्तम साधन म्हणजे दोन्ही समाजांना एकमेकांच्या आचारविचारांची सहानुभूतिपूर्वक माहिती असणें हेंच होय. शिवाय भिन्न समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचें ज्ञान होतें हा लाभ वेगळाच.

लोकमान्य टिळकांच्या काळीं चालू हिंदी इतिहासांत महाराष्ट्राला मानाचें स्थान होतें, तेव्हां सहजच महाराष्ट्रीयाकडे कोणीही चौकसपणें पाही. आज महात्मा गांधींच्या असहकारितेच्या युगांत गुजराथ्यांनीं आघाडी मारली; बुद्धिजीवि वर्गाची जागा वाणिज्यवृत्तीच्या लोकांनीं गांठली व राजकारण खेळविलें. वेगळ्याच प्रकारच्या शौर्यधैर्याचा आविष्कार—आजवर अज्ञात असा—त्यांच्या ठायीं दिसून आला. स्वाभाविकच ते कौतुकाचा विषय बनले. गुजराथी मुलुख व मराठी राज्य अशा संयोगांत राहाणाऱ्या एखाद्या चौकस दृष्टीच्या जिज्ञासूला तर नित्याच्या आयुष्यांतही विनाश्रम उभय समाजांचें जीवनवृत्त, आचारविचार पाहातां येतात व पारखतांही येतात. इंग्रजी शिक्षणानें व इंग्रजी अनुकरणानें समरस किंवा एकरंगी झालेल्या सर्व समाजांतील वरच्या थरांतून कदाचित् वैचित्र्य वा विभिन्नता कमी झाली असेल; परंतु बहुजन-समाजाचें सर्वसाधारण आयुष्य मात्र अद्याप अविचलितच आहे आणि तेणेंकरून तटस्थपणें दोन भिन्न समाज न्याहाळतांना गंमतच वाटते.

माणसाच्या ठायीं डावेउजवेपणा असतोच; परंतु एकनिष्ठपणामुळें त्याचें कांहीं वाटत नाहीं. परंतु दक्षिणी-गुजराथ्यांत मात्र डाव्याचें उजवें व उजव्याचें डावें आढळून येतें आणि त्या वेळीं वैचित्र्यापेक्षां विरोधच जास्त वाटतो. दक्षिणी माणूस धोतर नेसल्यास डाव्या बाजूला कासोटा व उजव्या बाजूला

निऱ्या करील, तर गुजराथी माणूस उजव्या बाजूला कासोट. व डाव्या बाजूला निऱ्या खोचील. दक्षिणी गृहस्थाच्या डोकीवरील पगडीच्या झिरमिळ्या किंवा कोकी उजवीकडे एका बाजूला असेल, तर गुजराथी 'पाघडी'चा जर डोकीवर मधोमध पुढें येईल. गुजराथी माणूस जोडा किंवा वहाणा क्वचितच वापरील, सदैव पायांना बुटाचीच सवय; मग बंदांचे बूटही मोज्यांशिवाय वापरतांना त्याला केव्हांही चुकल्यासारखें वाटणार नाहीं. उलट मोज्यांशिवाय बंदांचे बूट म्हणजे दक्षिण्याला रीतीचा भंग वाटेल! एकादा कोणी तसा आढळल्यास 'हा काय आज गुजराथी प्रकार' म्हणून म्हणायलाही तो सोडणार नाहीं.

दक्षिणी स्त्री सकच्छ नेसून उजवीकडे पदर काढते—हल्लीं कोणी विकच्छ नेसल्या तरी पदर उजवीकडेच कायम आहे—तर गुजरथी स्त्री विकच्छ नेसून पदर डावीकडे काढते. गुजराथी स्त्रीच्या दुपटीनें लांब लुगडें नेसूनही दक्षिणी स्त्रीचे पाय मागें अर्धे उघडेच पडतात; त्यामुळेंच 'सोळा हात साडी, अर्धी तंगडी उघडी' अशी एक उपहासात्मक म्हण गुजराथींत प्रचारांत आहे. तिचा रोख दक्षिणी स्त्रियांवर आहे हें सांगणें नकोच. परंतु आवेशानें पळावयाच्या वेळीं किंवा चारदोन पावलें झपाट्यानें टाकतांना हीच नेसण्याची पद्धति कामीं येते हा अनुभव आहे. त्या वेळीं विस्तृत घेराचें गुजराथी नेसणें अडचणीसारखेंच व्हायचें!

स्वागताचा दक्षिणी 'नमस्कार' तर गुजराथी 'जयजय'! हा जयजयकार आतां गुजराथेंत वास्तव्य करून राहाणाऱ्या दक्षिण्यांनींही उचलला आहे. सांप्रतचा भाईवाद उत्पन्न होण्यापूर्वीपासून गुजराथी सर्वांना भाई म्हणून संबोधीत आला आहे. तो नुसतें 'काय, कसं काय?' म्हणणार नाहीं, तर 'केम भाई, ठीक छे ने?' असें बंधुभावानें विचारील. आल्या अतिथीचा सत्कार कसा करावा हें शिकावें गुजराथ्याकडूनच. परंतु पुढें केलेल्या पानाच्या डब्यांतून एका वेळीं सबंध पान उचललें, तर गुजराथी हिशेबी दृष्टीला तें मानवत नाहीं. दक्षिणी रावसाहेबी रुचीला किमान दोन पानें तरी हवींत, तर गुजराथी व्यसनांतही काटकसरी, हिशेबी वृत्ति न सोडतां एका पानाचे दोन भाग करून एकाच तुकड्यावर आपली तल्लफ भागवील.

गुजराथी स्त्रीवर्गही जात्या धीटच. आल्या माणसाची 'भाई' म्हणून विचारपूस किंवा निःसंकोच आगतस्वागत करतांना त्यांना विशेष कांहीं वाटत

नाहीं. पाहुण्यांनी.ी येतांजातां ह्या घरच्या 'बेहेन'ची विचारपूस करणें अगत्याचे समजलें जातें. दक्षिणी स्त्रियांचा संकोच व त्यांची लाजरी वागणूक सर्वप्रसिद्धच आहे. अनोळखी पाहुणा त्यांच्या वाऱ्याला बेतानेंच उभा राहातो.

नित्यनैमित्तिक कृत्यांचा व हव्यकव्यांचा दक्षिणी कुटुंबांत हा रगाडा! आज अमकी पूजा, उद्यां तमकें व्रत, परवां श्राद्धपक्ष, तेरवां सणवार, अशी दक्षिणी घरीं एकच गर्दी. रिकामे दिवस किंवा उसंत कमी. शिवाय रोजच्या साध्या आयुष्यांतही सकाळ संध्याकाळ खाण्यापिण्याची व उष्ट्याखरकट्याची धांदल. दोन्ही सांज चारी ठाव स्वयंपाक व तेवढेंच आवरणें. गुजराथी कुटुंबांनीं हा कारभार साधाच आटोपशीर करून ठेवलेला. घरगुती नित्यनैमित्तिक कृत्यें जवळजवळ नाहींतच. व्रतसायासांची घरीं धांदल नाहीं; देवळांत जाऊन दिवसांतून चार वेळां दर्शन घेतलें, कीं झाली सुटका. नित्याचा जेवण्याचा बेतही खिचडी, शाक-रोटली ( भाकरी ) असा साधा. साहजिकच दक्षिणी स्त्रियांच्या मानानें गुजराथी स्त्रियांना रिकामपण अधिक. त्या वेळीं मोलानें शिवणकाम किंवा निवडणें टिपणें करून दोन पैसे मिळविण्याचा व्यवसाय करणाऱ्याही बऱ्याच असतात.

दक्षिणी स्त्रियांच्या पदराचें ओझें आतां सर्रास डोकीवरून खांद्यावर आलें आहे. मराठमोळ्यांत काय डोकीवरून पदर घेण्याची चाल असेल तीच. बाकी पांढरपेशा वर्गांत आतां पदर खांद्यावरूनच रुळत असतो. गुजराथी स्त्रिया मात्र साऱ्या डोकीवरूनच पदर काढतात. शिवाय डोकीवरच्या पदराचें टोंक तोंड झांकण्याइतकें पुढें ओढून 'लाज काढण्याचा' आणखी एक प्रकार त्यांच्यांत असतो तो निराळाच. सासूसासरा किंवा नवरा ह्यांच्याविषयींचा आदर असा 'लाज काढून' दाखवावयाचा. मग ह्या पदराआड लपलेल्या तोंडांतून अपशब्दांचा वर्षाव झाला तरी चिंता नाहीं! लग्नकार्यांत दक्षिणी स्त्रियांपैकीं एखादी तरी ठेवणीचा बुट्टेदार शालू पांघरून डौलानें मिरवेल, गुजराथी स्त्रियांना हें उत्तरीयप्रकरण वर्ज्यच आहे.

दक्षिणी माणूस जितका सुधारणाप्रिय, तितकाच बेडर. कुटुंबाच्या विचारानेंही तो अडणार नाहीं; मग ज्ञातिविचारानें त्याला कसचा पायबंद बसतो? आज गुजराथी कितीही सुधारणेच्या मार्गाला लागला असला तरी 'ज्ञातिबंधारण' त्याला सुटत नाहीं. 'ज्ञातिसंस्था' अद्यापही त्याला नाना तऱ्हेनें उपसर्ग देत

असते. बहिष्काराचें (सामाजिक) शस्त्र अद्यापही त्यांच्यांत चालतें. अगदीं गंजून जाऊन तें कधींच म्यानांत पडलें नाहीं. दक्षिण्याला आज कोणीही विचारतापुसता राहिला नाहीं.

गुजराथी माणूस एकंदरींत फाजील हिशेबीच. पैपैचा हिशेब तर तो ठेवीलच; त्यांतही तो तपशील लिहिण्यास चुकणार नाहीं. पोटच्या पोराप्रीत्यर्थ होणाऱ्या अगदीं बारीकसारीक व्ययाची नोंद त्याच्या 'चोपड्यांत' सापडेल. 'तुम्ही माझ्यासाठीं काय केलंत' म्हणून विचारलें तर मुलाच्या तोंडावर हिशेबाची वही टाकून चटकन् तो त्याला गप्प करूं शकतो. दक्षिण्याचा सगळाच बिनहिशेबी कारभार! महिन्याच्या आदिअंतालाही आयव्ययाचा पत्ता लागायचा नाहीं, तर मागले हिशेब आणि पुढचें धोरण कसचें सापडणार ?

धार्मिकतेची धागधुगी अद्याप गुजराथी समाजांत कायम आहे. यात्रेची पर्वणी साधण्याची धडपड अद्याप दिसते. 'चारी धाम' यात्रेच्या 'स्पेशल' गाड्या अजूनही गुजराथ्यांनीं भरून जातात. जैनाचार्यांच्या नेतृत्वाखालीं भाविक लोकांचा हजारोंचा समुदाय आजही पालिताण्यासारख्या पवित्र स्थलीं पायीं यात्रेनें जात असतो. ह्या यात्रांच्या पायीं लक्षावधि रुपयांचा व्यय करण्याइतकी धार्मिकता व दानशूरता अद्याप त्या संपन्न समाजांत आहे. मथुरेच्या द्वारकाधीशाच्या चरणीं एकदा तरी मस्तक ठेवावें ही इच्छा अजून दिसून येते. पौर्णिमेला डाकोरच्या यात्रेचीही झिम्मड असते. दक्षिणी समाजाची धार्मिकता आतां ओहोटीला लागली आहे. नव्या पिढीनें धर्माचरणावर हत्यार उपसलें असून आतां त्याची सुटका जरा कठीणच दिसते.

दक्षिणी वृद्धाला आपण 'आजोबा' म्हणतों, तर गुजराथी वृद्ध 'काका' होतो. दक्षिणी वृद्ध स्त्री 'आजीबाई' बनते, तर गुजराथी 'डोशी मा' होते. दक्षिणी कधीं बापाला 'बाप' म्हणणार नाहीं; गुजराथी मात्र बापाला 'बापा' म्हणूनच हाका मारतात.

दक्षिण्यांच्या अनुरोधानें गुजराथ्यांतही आतां साहित्य-परिषदा स्थापन होत असून वाङ्मय-संमेलनें भरत आहेत. वक्तृत्वसमारंभ, व्याख्यानें, साहित्यिकांचा सत्कार ह्या सर्व प्रकारांची झोड उडवून दक्षिण्यांचा बोलकेपणाचा प्रांतही ते हलवून सोडीत आहेत. वर्तमानपत्रें व नियतकालिकें आतां केवळ

बाजारभावांतील रुपये, आणे, पैची चर्चा करीत नसून कलेचा जोरानें पुरस्कार करीत आहेत. सामाजिक विचारांचे पडसाद आतां तेथेंही जोरानें उठत आहेत.

गुजराथी माणूस स्वच्छतेंत तर मूळचाच मागसलेला व आजही दक्षिण्याच्या मागेंच; शिवाय चालू काळांतही आपल्या जुन्या सवयी किंवा खोडी कायम ठेवणारा. दंतधावन करतांना आपल्या जुन्या पद्धतीनें बाभळीच्या काटक्या चावून चावूनच तो 'दांतवण' करील; बराच वेळ हा चर्वणविधी झाल्यावर तीच काटकी मध्यें दुभंगून जिभेवरून खराखरा फिरवील. हा सारा चर्वणविधी घरांत आडोशाच्या मोरींत मात्र होणार नाहीं. तो बाहेर रस्त्यावरच्या ओट्यावरच व्हावयाचा. त्यांतही स्त्री, पुरुष, मुलें ह्या सर्वांची रीत एकच. साहजिकच प्रातःकाळच्या फेरफटक्यांत गुजराथी वस्तींत रांगाच्या रांगा चर्वणमग्न आढळतात. रस्त्यावर पाणी सांडण्याचा तर विधिनिषेध नाहींच.

समाराधनेच्या वेळीं किंवा लग्नकार्यप्रसंगीं आपणाकडे पंगतीचा कोण थाटमाट व केवढी रीत! पाटरांगोळ्या, केळीचीं पानें, उदबत्त्यांचा घमघमाट, वाढण्याची रीत, वाढप करणाऱ्या स्त्रिया, संपूर्ण वाढपानंतरच जेवणाचा आरंभ, ह्या साऱ्या बारीकसारीक गोष्टी अगदीं कसोशीनें पाळल्या जातात. गुजराथी 'न्यातींत' ती कांहींच काळजी नाहीं. साऱ्या जमातीला सामुदायिक आमंत्रण; तेव्हां कोण आला किंवा कोण राहिला हें पाहाणें नाहींच. 'वाडी'त जागा मिळाली तर ठीकच, नाहींतर रस्त्यावर उघड्यावरच दुतर्फा बसण्याची तयारी. कोणी कोठेंही व कसेंही बसावें. वाढण्याला रीत नाहीं कीं क्रम नाहीं. फक्त भजीं, वाल व पक्वान्न आलें, कीं झालें. पानावर पडलें, कीं खायला सुरुवात; मग शेजारच्या पानावर तो पदार्थ जावो वा न जावो! कोणी कोणाला सुरुवात करा म्हणून म्हणायला नको, कीं कोणाकडे पाहायलाही नको! दक्षिणी माणूस प्रारंभीं वरणभात घेईल, तर गुजराथी शेवटीं वरणभात मागून त्याला 'आपोष्णी' म्हणेल. लग्नाची किंवा मर्तिकाची 'न्यात' (ज्ञातिजेवण) या गुजराथ्याला टळत नाहीं.

पाहुणा आला, कीं त्याच्या स्वागताच्या तत्परतेंत दक्षिणी कुटुंबांत यजमानापासून पोरांबाळांपावेतों सर्वांनाच गोडाधोडाचें जेवण सारखेंच मिळावयाचें; तेवढ्यापुरती तरी सर्वांची सारखीच व्यवस्था. 'झांकली मूठ सव्वा लाखाची' या न्यायानें मुख्य यजमान आपली परिस्थिति दोन दिवस झांकून ठेवून प्रसंगीं

उसनी ऐटही आणतो आणि दोन दिवस साजरे करतो. परंतु गुजराथी माणूस असा अपव्यय होऊं देणार नाहीं. तो पाहुण्यापुरतेच दोन पदार्थ अधिक करील, त्याच्याच बेताची साजुकशी भाजी आणील, त्यालाच एकट्याला जेवावयास बसवील. स्वतः आपणही त्याच्या पंक्तीला बसणार नाहीं; मग दुसऱ्या कोणाची गोष्टच कशाला ? आणि तो पाहुण्याला आग्रहही करील, पण बेताचाच. सारा बेत त्या एकट्या पाहुण्यापुरता. पाहुण्याच्या निमित्तानें घरच्यांनीं अवास्तव चैन कां करावी हा हिशेबी विचार. पाहुणाही त्याच पद्धतींत वाढला असल्यानें त्याला ह्या एकलकोंड्या भोजनाचें कांहीं वाटत नाहीं.

निरोप घेतांना आपण 'येतों हं' म्हणतों, तर गुजराथी 'आवजो' म्हणून सांगतो. हा 'आवजो' आतां गुजराथेंतील दक्षिण्यांनींही थोडाफार उचलला आहे. पाहुणा परत जातांना गुजराथी आतिथ्याचा मासला पाहावयास सापडतो तो कांहीं विचित्रच. सारें सामान व सारी मंडळी गाडींत बसल्यावर, निरोप देणेंघेणें आटोपून आतां गाडी चालू लागणार, तरीही यजमान 'रही जाव ने, रही जाव ने' असें तोंडानें म्हणतच असतो. केव्हांकेव्हां हा प्रकार आगगाडी सुटायच्या सुमारालाही दिसून येतो. साहजिकच मग तिऱ्हाइताला हसूं येतें. एवढी पाहुण्याच्या राहाण्याची इच्छा होती, तर येथवर येऊंच कां दिलें ? परंतु 'रही जाव' या शब्दांना विशेष कांहीं अर्थ नसतो. 'आपल्या आगमनानें विशेष आनंद झाला' असें म्हणण्यापैकींच एक मामुली प्रकार.

आपल्याकडे लग्नामुंजींत मुहूर्त साधण्याची कोण धांदल ! परंतु गुजराथी लग्नविधींत ही कांहीं धांदल नाहीं. सारा बडिवार काय तो मिरवणुकीचा. गुजराथेंत त्या मिरवणुकीला 'वरघोडा' म्हणतात; आणि खरोखरच अगदीं आतांआतांपावेतों त्यांच्यांतील वरराज घोड्यावर मिरवीत असे आतां मात्र मोटारीनें तो मान पटकावला आहे. पानसुपारी, चांदला ( आहेर ) इत्यादींची सारी गर्दी. लग्न आपलें सवडीनें लागतेंच आहे !

गुजराथी समाजांत प्रत्यक्ष लग्नापूर्वी वाङ्निश्चयाचें महत्त्व फार. त्याला ते 'विवाह' म्हणतात. लहानपणींच मुलांमुलींचे 'विवाह' होतात व मग पुढें मोठेपणीं 'लग्न' होतें. एखाद्या दक्षिण्याला हा विवाह आणि लग्न ह्यांतील भेद माहीत नसला म्हणजे मोठी त्रेधा उडते; कारण 'तमारूं लगन थयूं छे ?' 'नथी.' या प्रश्नोत्तरानंतर 'तमारो विवाह थयो छे ?' हा प्रश्न मोठा चमत्कारिक वाटतो.

## कांहीं माणसें

मिरवणुकींतही डावाउजवा हा प्रकार खराच. लांबच लांब मिरवणूक काढणें, ताशांचा तडतडाट, घोडागाडींची लांबलचक रांग, बँडचा थाट हा गुजराथी मिरवणुकीचा विशेष. लक्षांत येतें म्हणजे दक्षिणी मिरवणुकींत स्त्रिया पुढें व पुरुष मागें, तर गुजराथी मिरवणुकींत पुरुष पुढें व स्त्रिया मागें. मुख्य विहिणीच्या डोक्यावर भली मोठी पाटी व तींत जरीच्या वस्त्रांच्या लोंबत्या घड्या. खुद्द वरराजांचा पोषाख भाड्यानें मिळूं शकतो ही कल्पना आपल्याला तरी कशीशीच वाटणार !

खुद्द हवापाण्याच्या बाबतींतही दक्षिण्यापेक्षां गुजराथी अगदीं अधिक काटकसरी. चिंकड्या जागेंत तीन मजली घराचा डोलारा त्याला परवडतो. घराच्या तोंडाशींच स्वयंपाकघर व त्यांतूनच जा ये करतांना त्याला संकोच वाटत नाहीं. आलागेलाही तेथून यावयाचा ! सांडपाण्याचा व्यवहारही तो मोकळेपणीं करणार नाहीं. दक्षिणी माणसाला पाणी फार लागतें ही इकडे गुजराथ्यांची फार तक्रार ! त्यामुळें घरांतील दक्षिणी बिऱ्हाडकरूंचा पहिला खटका बहुतेक पाण्याच्या वापरावरून व्हावयाचा ! सुळक्यासारखे उंच, अरुंद जिने आणि माणसाला धड बसतांही येणार नाहीं अशी मोरी हा गुजराथी घराचा विशेष. दक्षिण्याला ऐसपैस जागा हवी, वापरण्याला पाणी मुबलक हवें, घरांत खेळती हवा हवी, मागेंपुढें मोकळी जागा मिळाल्यावर तर अधिकच चांगलें ! एखाद्याच बाजूच्या झरोक्यांतून येणाऱ्या हवेवर ऐन उन्हाळ्याच्या दिवसांतही स्वस्थ व्यवहार करणाऱ्या गुजराथी माणसाच्या सहनशीलतेचें मात्र आश्चर्य वाटतें.

घरांतील कचरा व घाण रस्त्यावर आणि तीही रस्त्याच्या मध्यभागीं फेकून द्यावी व आपलें घर स्वच्छ करावें, असा गुजराथी क्रम. मग त्यापायीं रस्ता खराब झाला तरी हरकत नाहीं. घरगुती स्वच्छता आपल्याशिवाय कोण करणार ? रस्ता साफ करायला नगरसभेचीं माणसें आहेतच. नगरसभेला कराच्या रूपानें पैसे देतोच कीं नाहीं ? तेव्हां रस्त्यावर घाण टाकण्याचा एक प्रकारचा हक्कच उत्पन्न होतो ! असल्या हिशेबी तर्कपद्धतीला कोण समजावूं शकणार ?

खडकी किंवा पोळ हा गुजराथी नगररचनेचा विस्मयावह विशेष होय. अर्थात् त्यांत हेतु संरक्षणाचा हें मान्य केलें पाहिजे. दुतर्फा उंचउंच घरें, मध्यें

लहानसा रस्ता, त्याला प्रवेश म्हणजे एक भला मोठा दिंडी दरवाजा, दुसरी बाजू बंद, असा हा प्रकार असतो. एकदा दरवाजा बंद केला, कीं आंत पेटीसारखी सुरक्षितता ! परंतु याच एखाद्या पोळांतून जाण्यायेण्याचा प्रसंग आला तर नाक बंद करूनच जावें लागावयाचें !

सरकारदरबारीं आतां सर्वत्र इंग्रजी तारीख चालू असली तरी कौटुंबिक व्यवहारांत अद्याप शक,संवत्‌गणना रूढ आहे. दक्षिणी माणूस शक मानतो व चैत्री प्रतिपदेला वर्षारंभ समजतो, तर गुजराथी माणूस संवत् गणतो व कार्तिकी प्रतिपदेला नवीन वर्ष सुरू करतो. नूतन वर्षारंभीं दक्षिणी माणूस गुढ्यातोरणें उभारून आनंद प्रदर्शित करील, गोडाधोडाचें जेवण करील, मुलाला शाळेंत घालील, कडुलिंबाचा पाला चाखील, इ. इ. 'Wish you a happy new year 'ही प्रथा दक्षिण्यांत नाहींच. गुजराथी मात्र आपल्या इष्टमित्रांना शुभेच्छादर्शक संदेश व आशीर्वाद पाठवावयाला विसरणार नाहीं. शिवाय 'चोपडीपूजन' करून नवें खातें चालवील. महाराष्ट्रांतील दसऱ्याचा सण मात्र गुजराथ्यांत बेताचाच. 'स्वारी शिलंगणा'चा प्रकार त्यांना ठाऊकच नाहीं. मराठ्यांचा इतिहास वेगळा, गुजराथचा इतिहास भिन्न. मराठी संस्थानांतील 'दसऱ्याची स्वारी' गुजराथ्यांना सानंद करमणुकीचा विषय होत असते. गुजराथेंतील दक्षिणी व्यापारीही चोपडीपूजनांत भाग घेतात.

दक्षिणी समाज शांकर तत्त्वज्ञान मानतो. आचारानें तो वारकरी, भक्तिमार्गी आहे. गुजराथी समाज विचारानें आणि आचारानेंही बहुतांशी वल्लभपंथी पुष्टिमार्गी आहे. माध्वमत मानणारेही पुष्कळ. गुजराथ्यांत जैनांचा भरणा विशेष. गुजराथी देवळांतून होणारे अन्नकोट त्यांच्या अंध भाविकतेइतकेच त्यांच्या उदारमनस्कतेचे द्योतक आहेत. देवळांत गेल्यावर आपली 'पाघडी' उतरून गुजराथी देवाला लवून नमस्कार करील. हळूच दोन तोंडांतही मारून घेईल. देवापुढें शिरस्त्राण काढण्याची पद्धति दाक्षिणात्यांत नाहीं. साष्टांग नमस्कार घालतांनाही पगडी घरंगळून न जाण्याची सावधानता तो ठेवतो.

सणावारांत व धार्मिक आचारांत दक्षिणी-गुजराथ्यांत भिन्नता खरीच. दक्षिणी श्रीकृष्णाची जन्माष्टमी साजरी करतो, तर गुजराथी गोकुळ अष्टमीचा उत्सव करतो. मंगळागौरीसारखे केवळ दक्षिणी उत्सव गुजराथीसमाज केवळ दुरूनच पाहाणार.

गुजराथी माणूस कपड्याला 'लुगडां' म्हणतो. 'लुगडां पेहरो' हा शब्दप्रयोग ऐकून तर दक्षिणी पुरुष क्षणभर गांगरतोच. 'लुगडें' ह्या स्त्रियांच्या वस्त्राच्या सदृश वर्णध्वनीनें त्याचा गोंधळ उडतो हें सांगणें नकोच. काटकसरी गुजराथी आठ वार धोतरजोडीवर सहज चालवितो. मागेंपुढें तो सोगे सोडील. नऊ वार धोतरजोडीही दक्षिण्याला पुरेशी वाटत नाहीं. अकरा वारांची जोडी वापरणारेही आहेतच.

गुजराथी माणूस वाणिज्यवृत्तीचा, संग्रहशील, आतिथ्यपर व दानशूर. दक्षिणी माणूस बुद्धिप्रधान, अल्पसंतोषी, किंचित् अरेरावी व थोडाफार चैनी. बुद्धिमत्तेचें पीक दक्षिण्यांत विशेष खरें, परंतु दारिद्र्याचा दोष त्यांना कायमचा चिकटलेला; शिवाय लाखांचे व्यवहार करण्याची दुर्दमनीय महत्त्वाकांक्षा त्यानें कधीं धरलीच नाहीं. सामुदायिक त्यागवृत्तीवर त्यानें मोठमोठीं कार्यें आरंभिलीं, परंतु द्रव्याकरितां त्याला इतरांकडे पाहावें लागलें व आजही लागतें. मूलतः सधन व दानशूर गुजराथी वर्गानें आजवर इतरांना लाखांनीं देणग्या दिल्या. असहकारितेच्या नव्या युगापासून त्यांच्यांतही बुद्धिमत्तेचा प्रकर्ष झाला, समाजकारणांत स्फूर्ति आली, राजकारणांत अग्रस्थान मिळालें, बौद्धिक विषयाकडे लक्ष लागलें. सामुदायिक, त्यागी, संग्राहक वृत्तीनें कामें करणारीं माणसें आतां त्याही समाजांत निर्माण होऊं लागलीं आहेत. बुद्धिप्रधान राजकारण खेळविणाऱ्या दक्षिण्यावरही आज भावनाप्रधान असहयोगी गुजराथ्यानें मात केली आहे. शिवाय आतां दोघांनींही मिळून बुद्धि व भावना यांच्या संयोगावर व तज्जन्य सामर्थ्यावर तिसऱ्याशीं झुंज खेळावयाची आहे. अशाच वेळीं 'रावसाहेब' काय किंवा 'शामळो' काय, दोघांनींही परस्परांच्या बारीकसारीक गोष्टींकडे हसून दुर्लक्ष करावें आणि मोठ्या लाभाकडे दृष्टि ठेवून एकमेकांशीं सहकार्य करावें व सप्रेम सहानुभूति बाळगावी हेंच उचित.

★

# १ कलाकार कोल्हटकर

" काय बाबुराव, काय चाललं आहे ? " शिल्पकार महादेव काशीनाथ कोल्हटकर ह्यांच्या स्टूडिओंत प्रवेश करतां करतां मीं विचारलें.

" आँ, काय ? " बाबुराव म्हणाले. त्यांचें लक्ष मात्र आपल्या हातांतील कामाकडेच लागून राहिलें होतें.

" बरेच कामांत दिसतां ? काय काम चाललं आहे ? "

" कामं कसचं हो ? रिकामपणचा उद्योग चालला आहे. रबराचे प्रयोग करून पाहातों आहें. रबराचे मिश्र..."

पण त्यांचें पुढचें बोलणें कांहीं कारणानें तसेंच राहिलें. आजूबाजूला मी पाहूं लागलों तों माझी दृष्टि स्वामी रामतीर्थांच्या पुतळयावर खिळून राहिली. त्या अध्यात्मवादी योग्याचे सर्व अंतर्भाव प्रतीत करणारी मूर्ति निर्माण करणारा हा शिल्पकार रबराचे प्रयोग कां करीत आहे हें कोडें मला उलगडेना. ह्या 'कां'चें उत्तर कोल्हटकर असें देतात, " अहो, तें एक माझं व्यसन आहे. "

आणि हातीं घेतलेल्या कामांत व्यसनासारखें रंगून जायचें, स्वतःला विसरायचें, ह्यांतच कोल्हटकरांच्या यशाचें मर्म आहे. नाहींतर अठराव्या वर्षी दरमहा फक्त चौदा रुपयांवर रेल्वेच्या सर्व्हे खात्यांत काम करणारे कोल्हटकर आज हिंदुस्थानांतील प्रमुख शिल्पकारांच्या नामावळींत बसते ना ! वर उल्लेखिलेल्या गोष्टीला आज वीसबावीस वर्षें झालीं.

पाश्चात्य देशांत शिक्षण घेतलेल्या शिल्पकारांच्या तोडीच्या म्हणून त्यांच्या कलाकृति गाजतात. " ह्या कलेचा श्रीगणेशा तुम्हीं गिरवलांत तरी कुठें ? शिकलांत कुणाजवळ आणि किती वर्षे ? " ह्या प्रश्नाचें त्यांनीं उत्तर दिलें, " हें पाहा सदुभाऊ, माझं ह्या विषयाचं शालेय शिक्षण फक्त दहा महिन्यांचं आहे. पण माझं शिक्षण कधींच थांबलं नाहीं. तें अजून चालूच आहे नि शेवटपर्यंत चालू राहील. प्रत्येक कामांत मला कांहींतरी नवीन शिकायला मिळतं. " मोठें मननीय वाटलें मला त्यांचें तें उत्तर.

कलाकार कोल्हटकरांच्या शिल्पकलेचा श्रीगणेशा केव्हां आणि कसाही झालेला असो, पण त्यांच्या कलेची आर्थिक सुरुवात मात्र शाडूमातीच्या

श्रीगणेशानेंच झाली. त्यानंतर त्यांनीं शाडूच्या, पंचधातूंच्या, चांदी वगैरेंच्या अनेक मूर्ति केल्या. बडोद्याच्या माजी महाराणीसाहेबांसाठीं सोन्याचा गणपति बनविल्यावर आतां पुनश्च शाडूची मूर्ति बनवावयाची नाहीं असा त्यांनीं संकल्प केला; परंतु लोक त्यांना सोडीनात. नाइलाज म्हणून अल्प प्राप्तीचा हा धंदा कोल्हटकरांना लोकाग्रहास्तव चालू ठेवावा लागला आहे. शिल्पकार कोल्हटकरांनीं आपली कलादृष्टि अनेक विषयांतून फिरविली आहे. पॉटरी, काचकाम, रबराचें कापड, बनावटी आरसपान अशा अनेक परस्परनिरपेक्ष विषयांत त्यांनीं आपल्या बुद्धीला गुंतविलें, हाताला खेळविलें, द्रव्याचा व्यय केला व आपल्या उलाढाली मनाचें समाधान केलें.

आज कलाकार कोल्हटकरांचें नांव सर्वांच्या तोंडीं आहे तें त्यांच्या शिल्पकलेंतील नैपुण्याइतकेंच त्यांच्या ब्राँझ धातूच्या ओतकामाबद्दल. ओतकामांत म्हात्रे आणि कोल्हटकर हे दोघेच त्या विषयाचे जुने तज्ज्ञ होत. पण श्री. म्हात्रे आपल्या कारखान्यांत आपलींच कामें ओतून तयार करतात. कोल्हटकरांच्या कारखान्यांत त्यांचीं स्वतःचीं कामें ओतलीं जातातच; पण इतरांचींही कामें ते विश्वासानें करून देतात. मोठमोठीं ओतकामें सुंदर व वेळेवर व्हावींत म्हणून तीं कोल्हटकरांकडे पाठविण्यांत येतात. ओतकामाला प्रारंभ करून परदेशांत जाणाऱ्या पैशांचा ओघ कोल्हटकरांनीं थांबविला व हिंदी शिल्पकारांना आपलीं ओतकामें करण्यास हक्काचें व विश्वासाचें स्थान निर्माण करून दिलें.

दहा वर्षांपूर्वींची गोष्ट. कै. लोकमान्य टिळकांच्या स्मारक कमिटीच्या प्रदीर्घ प्रयत्नांनीं स्मारकयोजना तयार झाली. श्री. फडके ह्यांचा नमुना मान्य झाला, पुतळ्याचें मोठें ' मॉडेल ' तयार झालें आणि नंतर झालेल्या विलंबामुळें वर्तमानपत्री टीकेचें प्रचंड वादळ उठलें. परंतु कमिटीच्या अडचणी दूर करून कोल्हटकरांनीं ओतकाम करून देण्याचें कबूल केल्याचें प्रसिद्ध होतांच वर्तमानपत्री टीकेची झोड एकदम बंद पडली ! कोल्हटकरांनीं फेब्रुवारी महिन्यांत हातीं घेतलेलें काम जुलैमध्यें म्हणजे अवघ्या सहा महिन्यांत पुरें करून दिलें. श्री. फडके व श्री. कोल्हटकर ह्या दोन महाराष्ट्रीय कारागिरांच्या सहकार्यानें निर्माण झालेली ही कृति मुंबापुरींत सागराच्या सीमारेषेवर आज उभी असून हिंदी कलेचे गुण आपल्या मूकभावानें सर्वांना पटवून देत आहे.

कठीण, साहसी गोष्टींकडेच वळणें हा कोल्हटकरांचा स्वभावविशेष आहे. ते म्हणतात, " कठीण वाटणाऱ्या गोष्टींत धडपडणं मला मानवतं. शंभरांतील

एक होण्यापेक्षां पांचांतील एक होणंच मला आवडतं." पांचांपैकीं एक होण्यासाठींच त्यांनीं चित्रकलेचा नाद सोडला. चित्रकलेच्या विषयांत अनेक माणसें वावरणारीं; त्या गर्दींतच आणखी एक होण्यापेक्षां विरल वहिवाटीच्या बिकट मार्गाकडे ते वळले. त्यांतूनच शिल्पकार निर्माण झाला व शिल्पकलेवर मात करील अशी ओतकामाची कला त्यांनीं आत्मसात् केली.

बडोद्याच्या कलाभवनांत शिल्पकलेचे अध्यापक म्हणून काम करीत असतां ओतकामाकडे त्यांचें लक्ष वेधलें. त्यांच्या समव्यवसायी कलावंतांना ह्या ओतकामाची नेहमींच अडचण भासत असे. त्यांचा धाडसी स्वभाव, शास्त्रीय विषयाकडे असलेला त्यांचा कल, त्यांना ह्या कामांत यश मिळण्यानें स्वतःची होणारी सोय हीं सर्व ध्यानीं घेऊन श्री. तालीम आणि श्री. फडके ह्या त्यांच्या शिल्पकार स्नेह्यांनीं त्यांना ह्या कामीं आग्रह केला. त्या कामाच्या प्रयोगांत पैसे घालवून ज्यांचे हात पोळले होते अशांनीं भीतीही दाखवली, परंतु कोल्हटकरांची निर्भय वृत्ति निश्चयानें ह्या प्रयोगांत जी एकदा गुंतली ती पूर्ण यश घेऊनच पार पडली. इतरांना अनेक वर्षें घालवून न मिळालेलें यश कोल्हटकरांनीं बारा महिन्यांत मिळविलें. त्या वेळीं भरलेल्या वेम्ब्ले प्रदर्शनांत जागतिक कलेचे अनेक नमुने आले होते. त्यांत हिंदुस्थानांतून आलेला ब्राँझच्या ओतकामाचा गारुड्याचा पुतळा कोल्हटकरांच्या कारखान्यांत ओतला गेला होता. हिंदुस्थानांतील तें एकमेव ओतकाम होतें. त्याची तिकडे तर वाहवा झालीच, पण तो पुतळा करणाऱ्या श्री. तालिमांना धन्यता वाटली ती त्याचें ओतकाम करणाऱ्या आपल्या स्नेह्याची—बाबुराव कोल्हटकरांची !

त्यांच्या ओतकामाचा विशेष गुण असा, कीं मूळ कामाशीं तें तंतोतंत मिळतें. शिल्पकारानें केलेला प्रत्येक स्पर्श त्यांत तसाच राहातो. त्यामुळें आपण शिल्पकाराच्या कृतीची नक्कल पाहात नसून एखादी मूळ कृतीच पाहात आहोंत असें पाहाणाराला वाटतें. ओतकामाचा अवश्य गुण जो वजनांतील हलकेपणा तो त्यांच्या ओतकामांत हटकून असतो.

कोल्हटकरांच्या शिल्पकलेचे नमुने दूरवर पसरले आहेत. हिमालयांतील हंसवाहिनी लक्ष्मीची मानससरोवराजवळची मूर्ति, दक्षिणेस विजयानगरच्या महाराजांचा संपूर्ण पुतळा, पश्चिमेस द्वारकेस स्थापलेलें शिवाजीमहाराजांचें स्मारक, उदेपूर, फलटण, औंध, बडोदें वगैरे संस्थानांत असलेल्या त्यांच्या

कृति, लाहोरचा दे. भ. लाला लजपतरायांचा संपूर्ण पुतळा, नवसारीचा कै. सयाजीराव गायकवाड ह्यांचा पुतळा, अहमदाबाद म्युनिसिपालिटीनें श्री. वल्लभभाई पटेल अध्यक्ष असतांना उभारलेलें लोकमान्य टिळकांचें स्मारक अशीं किती नांवें सांगावींत !

लाहोरच्या कै. सर गंगाराम ह्या दानशूर गृहस्थाच्या पुतळ्याची हकिगत तर विशेष उल्लेखनीय आहे. ह्या गृहस्थांचा एक अर्धपुतळा प्रथम इटलींत तयार करून आणवला गेला; पण तो पसंतच पडेना. तेव्हां कुणीं कोल्हटकरांचें नांव सुचविलें. परंतु शिल्पकलेचें आगर मानलेल्या इटली देशोत्पन्न शिल्पकाराच्या कृतीनें नाउमेद झालेल्या लोकांना ह्या हिंदी शिल्पकाराचा भरवसा वाटेना. परंतु "काम पसंत न पडलें तर दिडकीही घेणार नाहीं" असा सणसणीत करार करणाऱ्या ह्या बाणेदार शिल्पकाराबद्दल आदर उत्पन्न होऊन थोड्या साशंक मनानेंच तें काम कोल्हटकरांकडे सोपविण्यांत आलें. कोल्हटकरांना व्यर्थ मेहनत करावी लागली नाहीं हें सांगणें नकोच. त्यांचें काम इतकें पसंत पडलें, कीं पूर्वींचा पुतळा काढून त्यांनीं केलेला पुतळा स्मारकाच्या जागीं ठेवण्यांत आला.

कै. सर सयाजीराव गायकवाड ह्यांचें सान्निध्य कलेच्या निमित्तानें कोल्हटकरांना बरेंच लाभलें. पुतळा करण्याच्या वेळीं त्यांच्यासारख्या घोरणी माणसाला मनानें गुंतवून ठेवून स्थिर बसविण्यास कलाकाराजवळ बरेंच चातुर्य हवें. कोल्हटकर आपल्या बहुश्रुतपणाच्या जोरावर 'सिटिंग' करितां आलेल्या माणसाला नानाविध गोष्टींत रमत ठेवून त्याची प्रतिकृति मोठ्या सावधपणें तयार करतात. कै. सर सयाजीराव महाराज त्यांच्या ह्या गुणावर अति खूष होते. मीरत येथील माजी कलेक्टर मि. मिल्नर ह्यांनीं त्यांच्या पत्नीचा पुतळा पूर्ण झाल्यावर पाठविलेल्या अभिनंदनाच्या पत्रांत ह्या गोष्टीचा मुद्दाम उल्लेख केला आहे.

स्वतःची कला, स्वतःचा धंदा ह्यांना आनुषंगिक असलेल्या सर्व गोष्टींचें ज्ञान प्रात्यक्षिकांनीं करून घेण्याची कोल्हटकरांची हौस व कलाविषयक साधनें स्वतः तयार करण्याची तत्परता हीं विस्मयावह आहेत. फोटोग्राफीपासून पोलादाचीं हत्यारें घडविण्यापर्यंतचीं सर्व कामें त्यांनीं स्वहस्तें केलीं आहेत.

त्यांच्या शिल्पकलेंतील रहस्य साधेपणा, संयम, सूचना ह्यांत आहे. व्यक्तिमत्तेचें पूर्ण दर्शन ते घडवितात. त्यांच्या कलाकृतींत गोडव्याइतकेंच तंत्रही असतें. आपल्या प्रतिभेनें निसर्गावर संस्कार करून ते स्वतःच्या कलाकृति निर्माण करतात. कोल्हटकरांनीं कलाविषयाचा सखोल विचार केला आहे. एखाद्या शुद्ध कलेइतकाच त्यांना मिश्र ( अलाइड आर्ट ) कलेबद्दल आदर वाटतो. रस्त्यावर चाक ठेवून त्याच्या चक्राकार गतीच्या साहाय्यानें मातीच्या गोळ्यांतून सुंदर मडकीं, सुरया घडविणाऱ्या कुंभारालाही त्यांची कलादृष्टि दूर लोटीत नाहीं. विश्वप्रजापतीचा हा दरिद्री अवतारही आपल्या स्वतंत्र प्रतिभेचीं स्मारकें निर्माण करीतच असतो. केवळ निर्धनतेमुळें आणि अनास्थेमुळें त्यांच्या प्रतिभेची आज हीन स्थिति झाली ह्याबद्दल त्यांच्या कलाभिज्ञ मनाला खेद होतो. हिंदी चित्रकला, स्थापत्यकला, शिल्पकला ह्या सर्व हिंदी कलांचें प्राचीन वैभव आजच्या यंत्रसिद्धीच्या अभावींही कसें थोर होतें ह्याबद्दल ते वारंवार सद्गदितपणें बोलतात. आमच्या कलाकृति नमुन्यासाठीं पश्चिमेकडे डोळे लावून बसल्यानें त्यांचा हिंदीपणा पार पुसत चालला आहे हें त्यांना जाचतें. म्हणूनच नानाविध प्रयोग करून आपलें 'हिंदीत्व' राखण्यासाठीं ते झटतात.

बाबुराव सुस्वभावी आहेत, मोकळ्या मनाचे आहेत; त्यांना सुपारीच्या खांडाचें व्यसन आहे, पत्ते खेळण्याची हौस आहे. स्वतः ते गरिबींतून वर आले असल्यानें गरिबांच्या अडचणी ते जाणतात. स्वतःचें पहिलें ओतकाम करण्याच्या वेळीं प्राथमिक खर्चाकरितां आपल्या पत्नीकडून तिच्या मालकीची एकुलती एक सुवर्णमोहोर त्यांना उसनी घ्यावी लागली. आज ते सुस्थितीला चढले आहेत; पण त्या सुवर्णमोहोरेचें ऋण अद्याप फिटलें नाहीं असें ते म्हणतात.

त्यांचे एक चिरंजीव जे. जे. स्कूल ऑफ आर्टचा शिल्पकलेचा अभ्यास पूर्ण करून वाङ्मयकलेचा अभ्यास करण्याच्या हौसेनें कॉलेजांत शिकत आहेत. दुसरे चिरंजीव बी. एस्सी.चा अभ्यास करीत आहेत. दोघेही घरच्या प्रयोगशाळेंत वडिलांच्या सन्निध प्रात्यक्षिक ज्ञान घेत आहेत. मोठ्या कोल्हटकरांच्या प्रयोगशाळेंत दोन छोटे कोल्हटकर तयार होत आहेत.

आल्यागेल्याची खबर काढीत, प्रश्नोत्तराचा शब्दप्रतिशब्द चालला असतांना एक कान कारखान्यांतील कामाकडे देऊन, आपली दृष्टि स्वतःच्या तयार होत असलेल्या कामावर खेळवून, त्याही व्याप्त स्थितींत कोल्हटकर आपल्या आवडत्या विषयाचें चिंतन करीतच असतात, आपले बेत अस्पष्टपणें बोलूनही दाखवतात. ते मध्येंच थांबतात तें थकवा आला म्हणून नव्हे, तर आपल्या विचारांना स्वैर गति मिळावी म्हणून. अशा वेळीं त्यांच्या हातांतील आडकित्ता जोराजोरानें सुपारीचीं खांडें पाडतो ती सुपारीची निकड म्हणून नव्हे. तर आपल्या विचारांना ताशीवपणा यावा ह्या अमूर्त इच्छेनें! कलाकार कोल्हटकर मला दिसतात ते हे असे. इतरांना त्यांचा अधिक परिचय करून देण्यास त्यांच्या ठिकठिकाणीं उभ्या असलेल्या कलाकृति पूर्ण समर्थ आहेत.

★

१०

## वाङ्मयांतील सावरकर

दिली तिलाञ्जली देहसुखावरि काय अशांस अपाय ?
खुशाल घाला अशां तुरुङ्गीं, काय अशांचें जाय ?
भीती का चतुरङ्बल नृपा ? दिला मृत्युशिरिं पाय !
धन्य तुझा गे कुसवा माते ! दैन्य कां न तव जाय ?

— कविवर्य [illegible]

एका जन्मठेपेच्या काळ्यापाण्याच्या शिक्षेनें निढांवलेल्या अट्टल, बेडर बंदीजनाचेंही अंतःकरण फुटून जावयाचें, मग एकामागून एक दोन जन्मठेप काळ्यापाण्याची म्हणजे अखंड पन्नास वर्षांची शिक्षा झालेल्या एखाद्या सुविद्य, सुस्थित तरुणाची वास्तविक काय अवस्था व्हावी ! त्याचें धैर्य खचावें, त्याचा उत्साह मावळावा, असा तो प्रसंग ! कारावासांतील बंदीपालालाही त्या रसरसलेल्या तरुणाच्या छातीवरील जस्ती पत्र्यावरची ती भयानक शिक्षा वाचून क्षणभर कंप सुटला. परंतु त्या निर्भय तरुणाच्या अंतःकरणाची शांति क्षणभरही विचलित झाली नाहीं, कीं त्याचा धैर्याचा एक अंशही कमी झाला नाहीं. तो आपल्याशीं म्हणाला,

" बंदी पन्नासचि ना वर्षें ? पन्नास कल्पना ही तो :
आभास काळ केवळ, वस्तुस्थितिचा पदार्थ नाहीं तो
बंदी ? ती आंत तशी बाहेरही या शिवासि जीवाची
पगडा तुजवरि पांचा वृत्तीचा तोंवरी न केव्हांची
आनंद गवसणारा मुक्तीचा, तुज तुरुंग मानस हा
त्याचा बंदी जो तूं तो जूं हें वांकवूनि मान सहा. "

— सप्तर्षि

केवढी ही अंतराची स्फूर्ति व शक्ति ! सर्व सामर्थ्यवान् आत्म्याच्या चिरंतन मुक्ततेची आत्मप्रचीति एवढी प्रखर, कीं त्या पुढें स्थलकालाच्या कल्पनाही मानवनिर्मित मायाजन्य वाटाव्यात, तेथें पन्नास वर्षांची कथा काय किंवा चार

भिंतींच्या तुरुंगाची काय जाणीव ? असा दुर्दम्य आत्मविश्वास व अविचाल्य धैर्य गांठीं बाळगूनच सावरकरांनीं बंदीशालेंत प्रवेश केला. तेथच्या मरणालाही मारून, काळालाही काखोटीला घेऊन ते पुन्हा नव्या जीवनानें बाहेर पडले. सुखाच्या आयुष्यांतही साध्या " पन्नाशीची झुळुक " माणसाचीं गात्रें अशक्त बनविते, त्याची प्रखरता खंडिते व त्याला निःसत्व करून सोडते. बंदीवासांतील खडतर जीविताची " पन्नाशी " सावरकरांना नमवूं शकली नाहीं कीं दमवूं शकली नाहीं. त्यांचें चैतन्य तसेंच रसरसलेलें आहे.

कांहीं श्रेष्ठ व्यक्तींच्या अंतर्बाह्य आयुष्याचा एकच एक मंत्र असतो. त्याच एका मंत्राचा ते अखंड जप करतात व त्याचेंच नवें तंत्र उभें करतात. महात्मा गांधींच्या सत्य व अहिंसा मंत्राचा परिचय आतां अखिल जगाला झाला आहे. अध्यात्मविद्येचीं हीं सूक्ष्म तत्त्वें राजकारणाच्या संमिश्र, शबल वातावरणांत नांदवून त्यांनीं राजकारणालाही तेवढ्यापुरतें शुद्ध व पावन करून घेतलें. श्रीयुत सावरकरांनींही 'स्वातंत्र्य' हा एकच एक ॐ कारासारखा महामंत्र आत्मोपदेशानें स्वीकारून, त्याचें अनुष्ठान अखंड चालविलें व राजकारणाइतक्याच तीव्रतेनें वाङ्मयांतून व समाजकारणांतून स्वातंत्र्याचा घोष चालविला. मॅझिनीचें चरित्र किंवा राष्ट्रीय पोवाडे ही अचेतनालाही हलविणारी सावरकरांची वाणी सुखानें वावरूं देणें तत्कालीन राज्यपद्धतीला अगदींच रुचणारें नव्हतें हें साहजिकच आहे. तेव्हां ती बंद करण्यांत यावी ह्यांत नवल तें काय ? परंतु अद्यापही तिजवरचें पटल दूर होत नाहीं, हें आश्चर्य !

कारावासाच्या तोकड्या जागेंतही स्वातंत्र्यवीर सावरकरांचा प्रतिभाचंडोल अडकून पडेना. तो आपल्या उंच उंच भराऱ्या कल्पनेच्या अवकाशांत यथेच्छ मारीतच असे. शरीराला बद्ध करणाऱ्या शक्तीला ही भरारी थांबवितां येणें अशक्य होतें. प्रतिभाविलासांतून निर्माण झालेलीं गाणीं सुखरूपपणें व व्यवस्थित रीतीनें सांठवून ठेवण्याइतकी प्रखर बुद्धिमत्ताही देवानें त्यांना दिली होती. तिलाही हातसांड करण्याचें सामर्थ्य पाशवी शक्तींत नव्हतें. त्यांची प्रतिभा बोलूं लागली म्हणजे ती पुढीलप्रमाणें शब्द काढी —

'तें ध्येय अजी! देव ज्यासि लोभावे।
मृत कल्पतरु बहारावे !

उज्जयनीचे कळस कांचनी देखे
डुलविती नव जरीपटके ।
चिर मूक, अहो देवदुंदुभी, वाजा;
गा भाट : पर्ऩो साजा :
सिंहासनिं, गा, । चढत फिरोनी आजी
आदित्य विक्रमाचा जी ! '

— विरहोच्छ्वास

स्वातंत्र्यवीराचें सुमधुर आशास्वप्न जितकें मोहक, तितकेंच उत्तेजक. वीररसांतून शांत अद्भुतांत बागडणारी कविवाणी गाऊं लागते ती अशी —

' दिक्क्षितिजांचा दैदीप्य रथ तुझा सुटतां ।
ह्या कालपथाच्या अतुट उतरणीवरता ।
नक्षत्रकणांचा उठे धुराळा परता ।
युगक्रोश दूरी । मागुती । युगक्रोश दूरी ।
महाराज आपुली कथा ना कुठें निघे स्वारी ?

— जगन्नाथाचा रथ

इतर कविजनांच्या कल्पनेलाही ठेंगणेपणा आणणारी ही प्रतिभा अचाट नव्हे तर काय ? आणि हीच शक्ति इतक्याच तन्मयतेनें व चारुतेनें नवनीतकोमलांगीचेंही शब्दचित्र काढते व शृंगाराचीं कारंजींही उडविते ! 'नास्ति खलु धीमतां अविषयो नाम ।' हे कालिदासाचें म्हणणंच खरं ! '

एका कारावासांतून सुटून रत्नागिरीच्या परिसरांत स्थानबद्ध होण्याचा प्रसंग आला तरी मूळची अवखळ मनोवृत्ति गप्प बसूं देणार थोडीच ! अडविलेलें पाणी कुठून तरी बाहेर पडण्याचा मार्ग शोधीत असतेंच. तो सापडला मात्र, कीं तेथून तें बाहेर पडतें तें अफाट वेगानें. राजकारणांतील प्रतिबंधामुळें इतरत्र वळलेली दृष्टि समाजकारणाकडे वळली. स्वातंत्र्यवीर सावरकर हाडाचे पूर्ण हिंदु आहेत. त्यांच्याइतका हिंदुत्वाचा प्रखर अभिमानी विरळा. हिंदु जातीची पुण्यभू व कर्मभू अशा ह्या भारतवर्षात राजकारणांत, सामाजिक व धार्मिक गोष्टींत जर्जर अवस्था असावी, तिचा कोंडमारा व्हावा ही गोष्ट

त्यांच्या मनाला अतिशय लागावी, हें योग्यच आहे. ह्या अंतरींच्या व्यथेमुळेंच त्यांच्या तोंडून त्वेषाचे, क्रोधाचे उद्गार बाहेर पडूं लागले. शिवाशिवीच्या मारक कल्पना, दलितवर्गाची सामाजिक असहायता, जुन्या आदरणीय विचारांची झालेली परागति व व्युत्क्रम, विचाराचा अभाव व भोळसटपणाचा बुजबुजाट, ह्यांच्याच जोडीला कपटपटु राजनीति, परधर्मी आक्रमण, अविवेकी राष्ट्रीय कल्पना ह्या सर्वांच्या माऱ्यामुळें चौफेर खिळखिळ्या झालेल्या हिंदुसमाजाला सुसंघटित करण्याकडेच त्यांनीं आपली सारी शक्ति केंद्रित केली. विज्ञानयुगाच्या वाढत्या काळांत दिवसेंदिवस अनंत अवकाशाचाही पूर्ण ठाव घेण्यास शास्त्र प्रवृत्त व समर्थ होत असतांना त्याच्याकडे डोळेझाक करून जुन्या आप्तवाक्यांचा जीर्णोद्धार त्यांच्या विज्ञानी, विचारी मनाला मानवेना. धार्मिक श्रद्धा भौतिक अभ्युदयाला प्रतिबंधक होत असेल तर तिला लाथाडून पुढें गेलें पाहिजे, हा त्यांचा सिद्धान्त. म्हणूनच त्यांनीं सहभोजनाची चळवळ चालविली, अस्पृश्यांना धर्माचें मुक्तद्वार म्हणून पतितपावन मंदिर स्थापिलें, स्मृतिग्रंथांवर व पुराणावर हल्ला चढविला, धार्मिक भावनांचा धुव्वा उडविण्याचा चंग बांधला, गोमातेला केवळ आदरणीय अवस्थेंतून उपयुक्ततेंत आणून बसविलें. गमतीची गोष्ट अशी आहे, कीं धार्मिक संस्कारांचें पावित्र्य व त्यांचा परिणाम स्वतः सावरकरांना एके काळीं मान्य होता (कमला काव्य); अलौकिक चमत्कार, समाधि, परमेश्वरी अनुग्रह, मृतात्म्यांच्या वासना व त्यांची पूर्तता ह्या सर्व गोष्टींचा साक्षात् स्वीकार त्यांनीं एके काळीं केला होता. उत्तरक्रिया, उःशाप ह्या नाटकांतून त्यांचा स्पष्ट खेळ दिसतो. परंतु त्यांच्या विज्ञानप्रचुर लेखणीला मात्र आतां तो धर्म मानवत नाहीं. त्यावर ती अशा कांहीं आवेशानें तुटून पडते, कीं प्रत्यक्ष एखाद्या परधर्मीयाचें खड्गही इतक्या आवेशानें यावयाचें नाहीं. त्याचें कारणही तसेंच आहे. अभ्युदयाच्या आड येणाऱ्या ह्या गोष्टींचा त्यांचा संताप अनावर आहे. "कृण्वन्तो विश्वमार्यम्" ह्या भावनेनें सर्व जग पादाक्रान्त करूं इच्छिणारी दुर्दम मनीषा जाऊन जुन्या विचार-विकारांच्या डबक्यांत हिंदुजातीची कर्तृत्वशक्ति बुचकळत राहावी हें त्यांच्या स्वातंत्र्यवादी बुद्धीला पटत नाहीं, आणि पटावें तरी कसें ? त्यांची मनोव्यथा पुढील शब्दांत प्रकट होते. "लाखों लोक बाटत आहेत. आततायी मुसलमानांचे दंगे, कन्याहरणें, मंदिरोध्वंसप्रभृति अत्याचार साऱ्या देशभर चालू आहेत, हिंदुस्थानचें पाकस्थान बनविण्याचें घाटत आहे, मिशनें घरें

पोखरून राहिलीं आहेत, अस्पृश्य आमच्या छळानें नि त्यांच्या पिसाळण्यानें कोटि कोटि फुटून जात आहेत ! न राष्ट्र, न राज्य, न अन्न, न वस्त्र " अशा विपन्न अवस्थेंत असणाऱ्या हिंदु जातीकरितां तिळतिळ तुटणारें ह्या हिंदवी स्वातंत्र्यवीराचें अंतःकरण सात्त्विक क्रोधानें अग्निपूजा, यज्ञविधि, गोपूजन, आप्तग्रंथ, संस्कारक्रिया, सनातनधर्म, ईश्वराधिष्ठान ह्या साऱ्या आप्तभावनांविरुद्ध बोलूं लागतें आणि त्याची सात्त्विक ऊर्मि पाहून लोकही तेवढ्यापुरते गप्प ऐकतात. हेतूची शुद्धता व अकृत्रिम त्याग ह्या गुणांमुळें त्यांच्या वाणीची वचनीयता कोणी सूक्ष्म पारखीत बसत नाहीं. नव्या विज्ञानयुगांतील सारी यंत्रशक्ति आत्मसात् करून साऱ्या प्रतिबंधक व आक्रमक शस्त्राचा पुरा समाचार घेण्यास सरसावलेला " नव्या दमाचा शूर शिपाई " आज सावरकरांना हवा आहे.

सावरकरांची बुद्धि हिंदवी, परंतु मन मराठ्याचें आहे. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतील गूढता, त्याच्या शिखरांची उत्तुंगता, त्याच्या अरण्याची गहनता आणि स्वतः त्याचीच अविकंपता त्यांचे ठायीं आहे. शिवप्रभूचा स्वातंत्र्य–इतिहास त्यांच्या रोमरोमांतून निनादत असतो. नेपाळच्या एकमेव हिंदु राज्याचें विजयांकित ध्वजचिन्ह त्यांना आनंदवितें. मराठ्यांचा भगवा झेंडा त्यांचें मस्तक सादर नमवितो.

सावकरांची हिंदुत्वाची कल्पना जितकी स्पष्ट, तितकीच विशाल आहे. भारतवर्षाला पुण्यभू व कर्मभू मानणारे सारेच त्यांच्या हिंदुत्वांत येतात. शिखांचा रोमहर्षक इतिहास सावरकरांच्या हिंदु मनाला विशेषच मानवतो, त्याचें कारणही तसेंच. मोंगली सत्तेला सशस्त्र प्रतिकार करणाऱ्या त्या ध्येयनिष्ठ, वीर्यशाली, युद्धप्रवण समाजाचा उत्तरेंतील इतिहास दक्षिणेंत मोंगली सत्तेला विरोध करणाऱ्या व हिंदवी स्वराज्य स्थापणाऱ्या श्रीशिवप्रभूच्या मराठी अभिमान्याला कां बरें विशेष अभ्यसनीय वाटूं नये ? त्यांच्या तोंडून शीख गुरूंचा इतिहास बाहेर पडूं लागला, कीं प्रत्यक्ष दगडालाही पाझर फुटावा !

यावनी किंवा इंग्रजी शब्दांचें मराठीवरील आक्रमणही त्यांच्या मराठीच्या अभिमानी मनाला सहन होत नाहीं आणि म्हणूनच त्यांनीं भाषाशुद्धीची चळवळ आरंभली व स्वजातीयांचा उपहास सहन करूनही ती चालविली. गणवृत्तांचें नियमन असह्य होणारी अशी त्यांची फोफावलेली काव्यप्रतिभा

मोकळेपणीं वैनायक वृत्तांत धावूं लागली. लिपीचीं सांकेतिक बंधनें तोडून नवीनच वळण त्यांच्या अक्षरांनीं गिरविण्याचें ठरविलें. सारांश, त्यांच्या स्वातंत्र्यप्रेमी मनाला कोठेंही सांकेतिक बंधन मानवेनासें झालें. सर्वत्र बंधनें तडातड तोडून त्यांचा जीव सारखा मोकळेपणानें वावरावयास झटूं लागला.

रत्नागिरीच्या कारवासांतून हा 'सिंह' सुटला आणि महासभांच्या अधिवेशनांतून त्याच्या गर्जना ऐकूं येऊं लागल्या. त्यांची महासभेच्या नेत्याची भूमिका न पटणाऱ्या त्यांच्या विरोधकांनाही त्यांचें अकुतोभयत्व व त्यांचें सामर्थ्य मान्य करावें लागलें.

स्वातंत्र्यप्रेमी सावरकरांचें हौतात्म्य केव्हांच सर्वांच्या स्पष्ट निदर्शनास आलें आणि जनतेनें ह्या वीराची यथोचित पूजा केली. त्या वीराच्या अंतःकरणांत सध्या एकच विचार आहे तो म्हणजे —

"तो शकला श्रीबंदा हिंदु हुतात्मा
सहण्यासी जरि असह्य छळ तसे तरी
कां शकेन मीहि न हे छळ सहूं अहा
मीहि हिंदुची असता ? हे सहेनची
याहुनिही भयद असे छळ सहेनची
परि झटेन, जीवनांतिही झटेनची
करण्यासी ही विमुक्त मातृभू पुन्हां!
मुक्त पुन्हां, शुक्त पुन्हां, मनुजमंगला
पुण्यभूमि पुनरुत्थित पतितपावना!

— विरहोच्छ्वास

आपल्या मातृभूमीला पुनरुत्थित करण्याचा ध्यास घेतलेल्या स्वातंत्र्यवीराची इच्छा पूर्ण व्हावी आणि त्याच्या त्या तन्मयतेचा एखादा अंश तरी आपल्या ठायीं यावा असें कोणता मायभूमीचा सुपुत्र म्हणणार नाहीं ? वीरांची इच्छा व त्याग हीच सामान्य जनतेची प्रेरकशक्ति असते. "ईश्वराचें अधिष्ठान" तें हेंच आणि त्यावर उभारलेली "चळवळ" समर्थ व सुफलित होणार ह्याविषयीं संशय कशाला ?

★

# ११ स्टॅलिन विरुद्ध ट्रॉट्स्की

रशियाचा सर्वाधिकारी स्टॅलिन आज साऱ्या जगाच्या कौतुकाचा विषय आहे. हिटलरच्या साऱ्या सुखस्वप्नांचा भंग करून व त्याला रशियांतून पळतां भुई थोडी करून त्यानें रशियाला तर जर्मनीच्या तडाक्यांतून वांचविलेंच, परंतु दोस्त राष्ट्रांवरचेंही जिवावरचें संकट दूर केलें. प्रे. रुझवेल्ट किंवा मि. चर्चिल ह्यांनाही स्टॅलिनशीं मैत्री जोडतांना अनेक वेळां त्याची मनधरणीही करावी लागते ती ह्याच कारणामुळें. जर्मनांच्या चढाईच्या धोरणाला पूर्णपणें प्रतिबंध घालून त्यांची युद्धाची सारी खुमखुमी स्टॅलिननें जिरविली, हाच त्याचा अपूर्व विजय! अशा तऱ्हेनें आजच्या महायुद्धाच्या इतिहासांत स्टॅलिन हा अग्रभागीं आला आहे.

खुद्द रशियांत तर स्टॅलिन हा जीव कीं प्राण समजला जात असेल, ह्यांत नवल नाहीं. त्यालाही प्रतिस्पर्धि नव्हते – किंवा आजही नसतील असें नाहीं. परंतु आपल्या धोरणानें व शौर्यानें साऱ्या प्रतिस्पर्ध्यांना दूर सारून स्टॅलिननें कर्तृत्त्वाचें व अधिकाराचें उच्च शिखर गांठलें. त्याचा मोठ्यांतला मोठा प्रतिस्पर्धि म्हणजे ट्रॉट्स्की. ह्याची व त्याची अधिकाराकरितां जवळ जवळ दहा वर्षें सारखी झटापट चालली. ह्या दोघांच्या झुंजींत रशियनक्रान्तीलाही थोडा मार बसला व तिची थोडी पिछेहाट झाली. रशियन जनतेची तर बरीच हिसकाहिसकी झाली. परंतु ट्रॉट्स्की परागंदा झाला व विजयाची माळ स्टॅलिनच्या गळ्यांत पडली.

वस्तुतः स्टॅलिन व ट्रॉट्स्की दोघेही लेनिनचे निकटचे अनुयायी. लेनिनच्या कर्तृत्त्वानें निर्माण झालेल्या क्रान्तीचीं सूत्रें त्या दोघांपैकीं कोणाच्या हातीं येतात, हा प्रश्न लेनिननें आपल्या हयातींत दोघांच्याही स्वभावधर्मांचें नीट निरीक्षण करून आपल्यामागें आपलें कार्य कोणाच्या हातीं जावें ह्याविषयीं इच्छा प्रदर्शित केली होती म्हणतात! लेनिन अगदीं मरण्यास टेकला तेव्हां त्यानें एक मृत्युपत्र केलें. लेनिनजवळ देण्याकरितां संपत्ति वगैरे कांहीं नव्हतीच. फक्त रशियन क्रान्तीचीं सूत्रें त्याला आपल्या अनुयायांच्या हातीं द्यावयाचीं होतीं. स्टॅलिन व ट्रॉट्स्की ह्या दोघांमधील विरोध व स्पर्धा दिसत होती.

मार्गदर्शक वचन म्हणून त्यानें पुढीलप्रमाणें लिहून ठेवलें म्हणतात. "Comrade Stalin, having become general secretary of the party, has concentrated tremendous power in his hands, and I am not sure he always knows how to use that power with sufficient caution." "भाई स्टॅलिनच्या हातीं अपरंपार सत्ता असून तिचा सावधगिरीनें उपयोग कसा करावा हें त्यास समजत नाहीं," इतकेंच म्हणून लेनिन थांबला नाहीं; तर तो पुढेंही म्हणतो, "Stalin is too rude. I propose to the comrades to find a way of removing Stalin. This circumstance may seem an insignificant trifle. But I think that from the point of view of preventing a split in the party, and from the point of view of the relations between Stalin and Trotzky it is not a trifle, or it is a trifle that may require decisive significance." "स्टॅलिन हा अतिशय उद्धट आहे. कसेंही करून त्याला सर्वाधिकारीपदावरून दूर केलें पाहिजे. ही गोष्ट कुणाला कदाचित् क्षुल्लक वाटेल; परंतु तशी ती नाहीं. विशेषतः आपल्या पक्षांत दुफळी होऊं नये म्हणून व स्टॅलिन आणि ट्रॉट्स्की ह्यांचे परस्पर संबंध पाहातां तर ती आवश्यकच ठरेल. किंवा कदाचित् ती क्षुल्लक असली तरी तीच पुढें उग्र रूप धारण करील." लेनिनचें हें भविष्य एक दोनदा वाचून दाखविण्यांत आलें होतें. एकदा तर खुद्द स्टॅलिननेंच तें वाचलें. पुढें मात्र ह्या मृत्युपत्राचा मागमूस नाहींसा झाला.

पण, लेनिनच्या शंका मात्र खऱ्या ठरल्या. स्वतः लेनिन हा रशियन राज्यक्रान्तीचा निर्माता व महापुरुष असल्यानें त्याच्या हयातींत त्याचे हे दोन अनुयायी त्याच्या अंकितच राहिले. पण त्याच्या मृत्यूनंतर मात्र जवळ जवळ दहा वर्षें त्या दोघांमध्यें अधिकाराकरितां झगडा चालत राहिला. त्याचें स्वरूप किती उग्र होतें, त्याची सामान्य माणसाला कल्पना नाहीं. ह्या दोन हत्तींच्या झुंजींत कितीतरी माणसें चेंगरलीं. ट्रॉट्स्कीचे संबंधी, अनुयायी, हितचिंतक, साहाय्यक म्हणून शेकडों लोकांना मृत्युमुखीं पडावें लागलें, अनेकांना बंदिवास

सोसावा लागला, नानातऱ्हेच्या हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. खुद्द ट्रॉट्स्कीच्या जिवाची परवड तर विचारूंच नका! प्रथम त्याला मध्य आशियांत डांबून ठेविलें. तेथून त्याला हद्दपार केलें म्हणून तो तुर्कस्थानला गेला. लगेच स्टॅलिननें तुर्की सरकारवर दाब आणून तेथून त्याची हकालपट्टी करविली. नंतर बिचारा ट्रॉट्स्की सारखा ह्या देशांतून त्या देशांत आश्रयाकरितां सैरावैरा पळत होता. कोठेंही त्याला निश्चितपणें राहातां येईना. नाहीं म्हणावयास नॉर्वेनें मात्र मोठ्या धैर्यानें कांहीं दिवस त्याला थारा दिला. परंतु सोव्हिएट सरकार नॉर्वेला जंपूं देईना. त्याचा सारखा लकडा लागला. शेवटीं नॉर्वेनेंही ट्रॉट्स्कीला घालवून दिलें. सबंध युरोपांत ट्रॉट्स्कीला निवाऱ्याची जागा सापडेना. शेवटीं जिवाच्या आशेनें ट्रॉट्स्की दक्षिण अमेरिकेंत मेक्सिकोंत वसतीला गेला. परिणाम असा झाला, कीं रशियन सरकार मेक्सिकोशीं कोणतेही सलोख्याचे संबंध ठेवावयाला तयार होईना. इकडे मॉस्कोमध्यें ट्रॉट्स्कीची चवकशी सुरू झाली. सर्व पुरावा (अर्थात त्याच्या पश्चातच) तपासला गेला. अशा चवकशीचा निकाल काय लागला असेल हें सांगणें नकोच! संशयावरून अनेकांचा अनेक तऱ्हेनें छळ झाला. शेवटीं मेक्सिकोमध्येंच ट्रॉट्स्कीचा करुण शेवट झाला. स्टॅलिनचा प्रतिस्पर्धि दूर होऊन स्टॅलिनच्या एकट्याच्या हातीं सारी रशियन सत्ता आली.

स्टॅलिन व ट्रॉट्स्की ह्या दोघांत व्यक्तिविरोधही होता व थोडाफार तत्त्वविरोधही होता. ट्रॉट्स्की हा युक्रेनियन ज्यू, तर स्टॅलिन निरक्षर, जॉर्जिअन चांभाराचा मुलगा! कसेंही असलें तरी ट्रॉट्स्कीला स्टॅलिन आवडत नसे. त्याचा त्याला नेहमीं तिटकाराच वाटे. ट्रॉट्स्कीला स्टॅलिन हा संकुचित मनोवृत्तीचा, प्रादेशिक कुटिल मनोवृत्तीचा वाटे. जागतिक क्रान्ति, चीनमधील क्रान्ति व खुद्द रशियन राज्यक्रान्ति व तिची प्रगति ह्यांसंबंधीं त्या उभयतांमध्यें बराच मतभेद असे. स्टॅलिनच्या मनांत प्रथमपासूनच ट्रॉट्स्कीविषयीं मत्सर होता. खुद्द लेनिन असतांनाच त्याचा मत्सर वारंवार प्रकट होई. उलट स्टॅलिनला वरच्या पदावरून दूर करावा म्हणून एकदा ट्रॉट्स्कीनेंच लेनिनला निक्षून सांगितलें. ट्रॉट्स्की हा उत्कृष्ट सेनापति होता. लाल सैन्याचा नायक म्हणून त्यानें अनेक वेळां महत्त्वाची कामगिरी केली होती. स्वतः लेनिननें त्याचा त्या कामगिरीबद्दल गौरव केला होता. त्याला रशियन भाषा उत्कृष्ट

अवगत होतीच, शिवाय जर्मन, फ्रेंच ह्याही भाषा नांवाजण्यासारख्या येत होत्या. एकदा तर एका प्रतिनिधींच्या सभेंत प्रथम अडीच तास जर्मन भाषेंत, नंतर अडीच तास फ्रेंच भाषेंत व शेवटीं अडीच तास स्वतःच्या रशियन भाषेंत त्यानें वक्तव्य केलें आणि अगदीं थोड्या विश्रांतीच्या, पण सरळ साडेसात तासांच्या भाषणानें व भाषानैपुण्यानें त्यानें सर्वांना चकित केलें. परंतु ट्रॉट्स्की अतिशय सडेतोड व टीकेच्या कामीं अतिशय निर्दय होता. त्याला मनुष्य-स्वभावाचें, विशेषतः त्याच्या नाजूकपणाचें, म्हणण्यासारखें ज्ञान नव्हतें, किंवा असलें तरी त्यांकडे तो दुर्लक्ष करी. आपल्या मार्गांत येणारांना तो खुशाल तुडवून जाई आणि ज्यांना ज्यांना तो तुडवून जाई त्यांना त्यांनाच नेमकें उचलून स्टॅलिन हाताशीं धरी. ट्रॉट्स्की कोणाच्याही हाताखालीं काम करण्यास तयार नसे. खुद्द लेनिनचा दुय्यम म्हणून नांदणेंही त्याला कसेंसेंच वाटे. लेनिनचा उजवा हात म्हणवून घेणेंही त्याला रुचत नसे. कोठल्याही कार्यक्षेत्रांत अग्रस्थानीं असल्याखेरीज त्याच्या जिवाला चैनच पडत नसे. ट्रॉट्स्की लहरी, संतापी होता. त्याच्या भाषणांनीं सभा हादरून जात, पण वैयक्तिक व्यवहारांत तो अगदींच रुक्ष होता. लोकही त्याच्याशीं बेतास बेतच वागत. स्वतः सर्वांशीं अगदीं प्रेमळपणें वागणारा लेनिनही ट्रॉट्स्कीशीं बोलतां वागतांना थंडपणाच धरी. स्वतः ट्रॉट्स्की टापटिपीचा व व्यवस्थेचा भोक्ता होता. पोषाखांत तो नीटनेटका असे. त्याचें 'ऑफीस' अत्यंत सुसज्जित असे. सर्व कामांत अनियमितपणें वागणाऱ्या व दिरंगाई करणाऱ्या रशियन लोकांना नियमितपणा व वेळेचें महत्त्व शिकविण्याचा तो कसोशीनें प्रयत्न करी. त्याच्या ह्या गुणांमुळें तो शिपाईगिरींत सरसावला, पण मुत्सद्देगिरींत मागें पडला. स्वतः ट्रॉट्स्कीनें आपल्या पक्षांत आपलें महत्त्व वाढविण्याचा म्हणण्यासारखा प्रयत्न केलाच नाहीं. तो स्वतःला सर्वांहून वरचाच समजे. ह्याच त्याच्या श्रेष्ठगंडामुळें त्याचा नाश झाला.

सन १९२१ च्या मे महिन्यांत प्रथम लेनिन आजारी पडला; तेव्हां मॉस्कोच्या बाहेरच, जवळच्या खेड्यांत, ट्रॉट्स्की विश्रांति घेत होता. लेनिनच्या ह्या दुखण्यांत कदाचित त्याचा अंतही झाला असता. लेनिनच्या खालोखाल ट्रॉट्स्कीच रशियांत मान्यतेला चढलेला होता. परंतु इतकें असूनही, पहिले तीन दिवस लेनिनच्या आजाराची ट्रॉट्स्कीला कांहींच माहिती नव्हती.

ट्रॉट्स्कीचें गाऱ्हाणें असें, कीं आपला प्रतिस्पर्धि स्टॅलिन व त्याचे साहाय्यक ह्यांनीं ही बातमी मुद्दामच आपणास कळविली नाहीं. परंतु, प्रश्न असा, कीं ह्या महत्त्वाच्या वेळीं ट्रॉट्स्कीचे सेक्रेटरी काय करीत होते? त्याच्या पक्षांतील त्याच्या हस्तकांनीं मनांत आणलें असतें तर सहज अगदीं थोड्या वेळांत त्यांना ट्रॉट्स्कीची गांठ घेतां आली असती व त्याला मोटारींत घालून मॉस्कोला आणतां आलें असतें. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही, कीं ट्रॉट्स्की स्वतःला इतका थोर समजे. स्वतःचे दुय्यम किंवा हस्तक वागविण्याकडे त्याचें लक्षच नसे. त्यामुळें त्याचे शत्रु सहज त्याला घेरीत व त्यावर मारा करीत. स्टॅलिन स्वतः ट्रॉट्स्कीप्रमाणें लेखक किंवा वक्ता नाहीं. शिवाय शिक्षण, संस्कार इत्यादि गोष्टींत तो थोडा कमीच भरेल. परंतु स्वपक्षाचे सेक्रेटरी स्वतःचे साहाय्यक म्हणून जवळ बाळगण्यास स्टॅलिन कधींही चुकला नाहीं. अनेक मोठमोठ्या भाषणांपेक्षां त्यांचाच त्याला अधिक उपयोग झाला.

१९२४ च्या जानेवारींत लेनिन वारला तेव्हां प्रकृतिस्वास्थ्यासाठीं ट्रॉट्स्की कॉकेशस पर्वतावर गेला होता. तेव्हां हा प्रवास मॉस्कोहून चार दिवसांचा होता. लेनिनच्या प्रेतयात्रेला ट्रॉट्स्की अर्थातच नव्हता. परंतु ही गोष्ट फारशी महत्त्वाची नव्हती. ट्रॉट्स्कीच्या गैरहजेरींत स्टॅलिन आणि मंडळींनीं त्याचा कसा धुव्वा उडवावयाचा हें निश्चितच केलें होतें व ट्रॉट्स्कीला केवळ विरोधकाच्या भूमिकेवर आणून ठेविलें होतें. अशा रीतीनें स्टॅलिन हा पक्षाधिकारी व ट्रॉट्स्की हा विरोधक बनला. तथापि, त्याचा विरोध मात्र फारच जोराचा होता. सरकारी नोकरींतील त्याचे सारे अनुयायी निवडून काढून टाकण्यांत आले. विश्वविद्यालयांतील विद्यार्थीवर्ग मात्र त्याच्या अनुयायांत मोडत असे.

स्टॅलिन व ट्रॉट्स्की ह्यांच्या राजकीय विचारसरणींत बराच भेद होता. दोघांतील मत्सर व स्पर्धा हीं तर पराकोटीला गेलीं होतीं. वस्तुतः दोघांचेंही साध्य एकच व दोघेही आपल्या साध्याकरितां प्राणही अर्पण करण्यास तयार; परंतु वैयक्तिक विरोधामुळें दोघेही एकमेकांना वारंवार पायबंद घालीत. लेनिनच काय तो दोघांना थोपवून धरूं शके.

रशियन क्रान्तिकारकांत दोघांत पहिला कोण हा वादाचा प्रश्न आहे. परंतु पुष्कळशा तात्त्विक गोष्टींत दोघांच्या विचारसरणींत अंतर प्रमाणाचें व वेळाचेंच असे. चीनमध्यें कामगारांची क्रान्ति व्हावी असें दोघांनाही वाटे. ट्रॉट्स्की

म्हणे ती तात्काल व्हावी, स्टॅलिनला ती थोड्या अवधीनें झाली तरी चालण्यासारखी होती. रशियन संपन्न शेतकऱ्यांचा – कुलाक (Kulak) – प्रथम बींमोड करावा, असा ट्रॉट्स्कीचा आग्रह. स्टॅलिननें प्रथम ट्रॉट्स्कीचा १९२८ त बींमोड केला व नंतर शेतकऱ्यांचा समाचार घेतला. जगांतील सर्व कामगारांचें एकीकरण व्हावें व सर्व देशांत कामगारांच्या क्रान्त्या व्हाव्यात, अशी ट्रॉट्स्कीची इच्छा; परंतु रशियन कामगारांच्या क्रान्तीनंतर स्टॅलिनचें लक्ष इतर देशांतील कामगारांकडे म्हणण्यासारखें वेधेना. स्टॅलिन अधिकारावर आला व थर्ड इन्टर नॅशनलचें (कोमिन्टर्न) महत्त्व संपुष्टांत आलें आणि क्रेमलिनचें वर्चस्व सुरू झालें. स्टॅलिनच नवें अर्थशास्त्रीय धोरण (New Economic Policy–NEP) ट्रॉट्स्कीला मान्य नव्हतें. त्याच्यामतें त्या धोरणामुळें रशियांत हळूहळू नव्या भांडवलशाहीचाच लहानशा प्रमाणावर प्रारंभ होत होता. इतरत्र कोठेंही क्रान्तीचा प्रयत्न फसला, तर ट्रॉट्स्की त्याचा दोष स्टॅलिनवर लादी. स्टॅलिनच्या कारभारानें रशियांत सुबत्ता निर्माण झाली नसली तरी निदान स्वास्थ्य निर्माण झालें होतें; परंतु नेमकें ह्याचेंच ट्रॉट्स्कीला वैषम्य वाटे.

ट्रॉट्स्की आवेशानें, तावातावानें भयंकर क्रान्तीच्या गोष्टी बोले. स्टॅलिन भयंकर कृति करी. स्टॅलिनचें वागणें व ट्रॉट्स्कीचें विरोधी गरजणें ह्या कैचींत त्यांच्या अनुयायांची तारांबळ उडे. असें म्हणतात, कीं खुद्द लेनिनलाही आपल्या मागें स्टॅलिन रशियाचा उत्तराधिकारी व्हावा असें वाटत नव्हतें. त्याला स्टॅलिनचीं अर्थशास्त्रीय मतें किंवा सामाजिक तत्त्वज्ञान मान्य नव्हतें, असें नाहीं. परंतु, त्याच्या मतें स्टॅलिन अत्यंत उद्धट व अधिकाराचा फाजील लोभी होता. स्टॅलिन–ट्रॉट्स्की विरोधानें खुद्द रशियन क्रान्तीलाही थोडेफार हादरे बसलेच. ट्रॉट्स्की वारंवार कामगारांना चेतवी व त्यांना भावी संकटाचा इषारा देई; पण, हाच त्याचा सोव्हिअट यूनिअनवर उपकार झाला. जसजसा तो प्रहार करी, तशीतशी स्टॅलिनची बाजू बळकट होत जाई. स्टॅलिन जें जें करी, त्याला त्याला ट्रॉट्स्की चूक म्हणे; परिणाम असा होई, कीं स्टॅलिनचे चहाते त्याच्या कोणत्याही कृत्याला त्यामुळें उचलून धरीत. ट्रॉट्स्की म्हणे, कीं स्टॅलिन हा माझ्यापेक्षां कमी व सामान्य बुद्धीचा आहे. स्टॅलिनचे अनुयायी म्हणत, कीं स्टॅलिन हा अत्यंत थोर व अत्यंत बुद्धिमान आहे. शेवटीं शेवटीं तर स्टॅलिनच्या हातून केव्हांही कांहींही चुकीचें होणार नाहीं, असें लोकमत तयार झालें. स्टॅलिन वरवरच चढत गेला व

मिळत गेलेला अधिकार खंबीरपणें आत्मसात करीत गेला. ह्या भयंकर चढाओढींत पराजित होऊन ट्रॉट्स्कीला कारावास, हद्दपारी, भोगावी लागली. जिवाच्या आशेनें देशोदेशीं पळावें लागलें. शेवटीं अज्ञात माणसाच्या हातून मृत्युमुखीं पडावें लागलें !

सर्वस्वाचा नाश होण्यापूर्वी पुनःश्च सत्ता मिळविण्याचा ट्रॉट्स्कीनें एक निकराचा प्रयत्न केला. आपले अनुयायी व विशेषतः लाल सैनिक आपल्या बाजूनें बंड करतील अशी त्यास आशा होती; परंतु ती फसली. बंडाचा प्रयत्न हुकला. मोठ्या कष्टानें ट्रॉट्स्की त्यांतून निभावला. शेवटीं रशियांतून त्याची हकालपट्टी झाली. १९२८ च्या जानेवारी महिन्याच्या सोळाव्या तारखेला स्टेशनवर लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या. त्या गाडीनें ट्रॉट्स्कीला मध्य आशियांत बंदिवासांत पाठवावयाचें ठरलें होतें. स्टेशनवर माणसांची बेसुमार गर्दी जमली. सारी आगगाडी माणसांनीं वेढून टाकली. लोकांना रीघ मिळेना. शेवटीं गाडी सुटण्याची वेळ झाली तरी गाडी जागची हालण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. लोकांनीं ट्रॉट्स्कीच्या नांवानें घोष सुरू केला; पण ट्रॉट्स्की कोठेंच दिसेना. शेवटीं एकदाची गाडी हलली; पण त्या गाडींत ट्रॉट्स्की नव्हताच ! लोकांचा हा प्रचंड जमाव पाहून ट्रॉट्स्कीला त्या दिवशीं नेण्याचें रद्द करण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं त्याची रवानगी करण्यांत आली. ट्रॉट्स्की आपल्या पायांनीं चालेना म्हणून त्याला माडीवरून उचलून आणून मोटारींत ठेवण्यांत आलें व मोटारींतून आगगाडींत बसविण्यांत आलें.

स्टॅलिन अतिशय धिमा, धोरणी, निश्चयी, कठोर आहे. बोलतांना तो शांतपणें, सावधगिरीनें बोलतो. त्याचें बोलणें सामान्य दर्जाचें असतें. ऐकणाराला थक्क करून सोडील असें त्यांत कांहींच नसतें. एखाद्या अर्थशास्त्रज्ञाला कदाचित त्याच्या सांगण्यांत कांहीं तथ्य वाटावयाचें नाहीं. त्याच्या भाषणांत बुद्धिमत्ता, विनोदी कोटिक्रम एकंदरींत कमीच ! परंतु, त्याचा थंडपणा, काम करण्याची धमक, शांत स्वर ह्या सर्वांवरून त्याच्या अंतःसामर्थ्याची व विशेषतः त्या सामर्थ्याच्या जाणीवेची चांगलीच प्रचीति येते. हा माणूस नांवाप्रमाणेंच खरोखर कणखर मनोवृत्तीचा असला पाहिजे ह्याची सहज साक्ष पटते.

ट्रॉट्स्कीच्या मागें त्याच्या नांवावर जें जें कांहीं नांवाजण्यासारखें होतें, तें तें पद्धतशीरपणें पुसून टाकण्यांत आलें. लेनिन आणि ट्रॉट्स्की अशी जोडी

लोकांच्या ध्यानींही येऊं नये, तर लेनिन व स्टॅलिन हीच दुक्कल लोकांच्या सदैव स्मरणांत असावी अशी स्टॅलिनची प्रबळ इच्छा! स्टॅलिन हा थोर माणूस आहे ह्यांत शंकाच नाहीं; नाहींतर तो इतक्या मोठ्या पदवीला पोचताच ना! परंतु कित्येक वेळां थोर माणसांच्या आंगींही सामान्य माणसाचे दोष आढळतात. मत्सर, दुखावलेला अहंकार, अधिकारलालसा, अनेक बरेवाईट विकार थोरामोठ्यांनाही नाडतातच. त्याच विकारांनीं स्टॅलिनलाही झपाटलें. रशियांत ट्रॉट्स्कीचें नांवही उरूं न देण्याचा स्टॅलिननें चंग बांधला. ट्रॉट्स्कीचे ग्रंथ रशियन वाचनालयांत संदर्भाकरितांही मिळत नाहींत. त्याचे ग्रंथ, त्याचें सर्व लिखाण, त्याचीं चित्रें, ह्यांचा नाश करण्यांत आला. ट्रॉट्स्कीचें चित्र बाळगणें म्हणजे रशियांत मृत्यूला आमंत्रण आहे. सर्व इतिहास, ज्ञानकोश पुनःश्च लिहिण्यांत येऊन त्यांतून ट्रॉट्स्की व त्याचें कार्य वगळण्यांत आलें किंवा विपरीत करून दाखविण्यांत आलें. लालसैनिकांचा पराक्रम सांगतांना ट्रॉट्स्कीचें नांव घेण्याची सोय नाहीं. इतकेंच नव्हे, तर वादाकरितांही ट्रॉट्स्की किंवा त्याचें मत ह्यांचा उच्चार करतां येत नाहीं. न जाणों त्यांच्या केवळ नामोच्चारानें किंवा विरोधी मतप्रदर्शनानेंही लोकमत तिकडे झुकलें तर! प्रत्यक्ष रशियन क्रान्तीच्या इतिहासांत ट्रॉट्स्कीचें नांवही नाहीं. उलट एक हुकुमशहा कामगार–क्रान्ति–विरोधक, अशा तऱ्हेनेंच ट्रॉट्स्कीचा उल्लेख शक्य आहे. स्टॅलिननें ट्रॉट्स्कीचे सारे अनुयायी तर दूर केलेच, पण त्याबरोबरच स्वतःचे सारे विरोधकही बाजूस सारले!

आज रशियांत स्टॅलिन सर्व कल्पनांचा जनक समजला जातो. जें जें चांगलें, तें तें स्टॅलिनमुळें, असें मानण्यांत येतें. कोठल्याही ग्रंथाला स्टॅलिनच्या वचनाशिवाय शोभा येत नाहीं. विषय पुराणाचा असो किंवा अध्यात्माचा असो, स्टॅलिनचें नांव व त्याचें एकाद दुसरें अवतरण तेथें आढळतेंच. रशियांत स्टॅलिन नांव धारण करणारीं नऊ गांवांचीं नांवें आहेत. पोस्टाला तें एक घोटाळ्याचें कामच! स्टॅलिन कामगार लोकांत फारच प्रिय आहे. स्त्री कामगार त्याला नेहमीं आशीर्वाद देत असतात. रशियन मुलें त्याच्या नांवानें वारंवार जयजयकार करतात. स्टॅलिनचें युद्ध–कर्तृत्व साऱ्या जगाला ठाऊकच आहे.

★

# १२ मास्तर

मास्तरांमध्यें त्यांची बरोबरी करूं शकेल असा दुसरा कोणी नव्हता. कोणालाही आदर वाटावा अशीच त्यांची योग्यता होती. कुशाग्रबुद्धि, विलक्षण स्मरणशक्ति, गाढ विद्वत्ता, अखंड व्यासंग, विद्यार्थ्यांवर अकृत्रिम प्रेम, विद्यादानाची अपरंपार आवड, स्वतःच्या व्यवसायाविषयीं आदरबुद्धि, स्वजातीयांशीं निर्मत्सर वर्तणूक, विद्यार्थ्यांच्या उत्कर्षाची कळकळ, उत्कृष्ट शिक्षकाचे हे सर्व गुण त्यांच्या ठिकाणीं होते. मागच्या परंपरेंत अभ्यासक्रम पुरा केला असल्यानें भरपूर पाठान्तर झालेलें. कोठचाही विषय निघो, अवतरणांचा व सुभाषितांचा नुसता ओघ वाहूं लागावयाचा.

'अमुष्य विद्या रसनाग्रनर्तकी' ह्या कालिदासाच्या वचनाप्रमाणें सारी विद्या त्यांच्या जिव्हाग्रीं सारखी नाचत असावयाची. ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी गमत वाटावयाची—आश्चर्यही वाटावयाचें. एखाद्या श्लोकाचे चार चरणही ध्यानीं न राहाणाऱ्या विद्यार्थ्यांना तर मोठाच अचंबा वाटावयाचा. बुद्धिमान विद्यार्थ्यांना विद्येविषयीं विशेष प्रेम वाटूं लागावयाचें. सकाळच्या समयाला थंड पाण्याचें स्नान करून धार्मिक आन्हिक कर्म उरकावयाचें, कपाळावर दुबोटी आडवें गंध लावावयाचें व नंतर आवडीच्या विद्यार्थ्यांना संथा देण्यास प्रारंभ करावयाचा. प्राचीन काळच्या गुरुगृहीं आचार्यांच्या समोर पोथीवरून किंवा तोंडानेंच अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परंपरेचेंच चित्र तेवढ्या-वेळापुरतें उभें राहावयाचें. सकाळचें विद्यापठण झालें नाहीं तर मास्तरांना चैनच पडावयाचें नाहीं. घरीं आवडीनें शिकविण्याचें व्यसनच. शिकवण्या कराव्यात, पैसे मिळावेत, धावपळ करावी, लोकांच्या घरीं आर्जवानें द्रव्यसंपादनावर दृष्टि ठेवावी असला विचारही मास्तरांच्या मनाला कधीं शिवत नसे. विद्येचे ते अव्यभिचारी निष्ठावान उपासक होते. विद्येचा उपयोग पोटभरूपणानें, बाजारीपद्धतीनें विकण्यांत करणें, हें त्यांना लांछन वाटे.

जी विद्यादानाची हौस घरीं तीच शाळेंत. आपला साधाच पोशाख चढवून मास्तरांची स्वारी एकदा शाळेंत गेली, कीं वर्गाच्या व्यवसायाशीं तन्मय व्हावयाची. अवांतर गोष्टींकडे त्यांचें लक्षच जावयाचें नाहीं. वरिष्ठांची

मनधरणी, इतर शिक्षकांशीं वायफळ गप्पागोष्टी, गांवगोष्टींची निरर्थक चौकशी, इतरेजनांचा बाष्कळ कोटिक्रम, अवांतर पंचायती–भानगडी–असल्या विद्येला बाधक गोष्टींकडे ते ढुंकूनही पाहात नसत. स्वतः ते त्यापासून अलिप्त राहात परंतु त्यांचा अलिप्तपणा उग्र नसे, तर सौम्य असे. सामान्य प्रकृतीचीं माणसें अशींच असणार, असेंही त्यांना वाटे. त्या कारणांनीं असल्या प्रकारांचा ते निषेध करीत. परंतु कोणाही व्यक्तीशीं विरोध करीत नसत, कीं कोणालाही ते टाकून बोलत नसत किंवा कोणाशीं संबंधही ते तोडून टाकीत नसत. ह्याच त्यांच्या सौजन्यामुळें सर्वांना ते हवेहवेसे व आपलेच वाटत. वर्गात शिकवितांना स्वतःच्या विषयाशीं ते अगदीं तद्रूप होऊन जात. केव्हां केव्हां ते आपल्याशींच रंगत, त्यामुळें त्यांची रसवंती विशेपच वाढे, त्या प्रवाहांत डुंबण्याची शक्ति असलले विद्यार्थी आनंदित होत, बाकीचे नुसते कांठावरूनच तटस्थपणें गंमत पाहात. असा प्रकार रोजचाच असे. शिकविण्याच्या भरांत मास्तर वेळेचेंही भान विसरत. घंटा होऊन गेली तरी त्यांचें शिकविणें चालूच राही. क्वचित विद्यार्थ्यांनाही भान राहात नसे. इतर शिक्षकांनीं वर्गाच्या समाधीचा भंग करावा, तेव्हां सर्वांच्या ध्यानीं ही गोष्ट येई. राहिलेला विषय निरुपायानें तसाच अर्धवट टाकून, स्वतःशींच गुणगुणत मास्तर वर्गाचे बाहेर पाऊल टाकीत. विद्यार्थीही आपल्या पुढच्या उद्योगाला लागत.

मास्तरांच्या जुन्या बुद्धीला शिक्षणशास्त्राचें वळण लागलेलें नव्हतें, लागणें शक्यही नव्हतें. छडी वाजे छम्‌छम्, विद्या येई घम्‌घम्, असें मानणाऱ्या गुरूंच्या तालमींत अध्ययन झालेलें, स्वतः भरपूर पाठान्तर करून विद्या जिवंत ठेवलेली, स्वतःच्या विद्यार्थ्यांना विद्यादान करतांना तीच पद्धति पाळलेली, अशा स्थितींत पाठान्तराच्या मुळावर आलेली, शिष्याला शिक्षेचें बोटही न लावणारी, असली अभिनव पद्धति त्यांना मुळीं चमत्कारिक वाटे. मुलांचें मानसशास्त्र, अभ्यासाची पूर्वतयारी, विषयाचा प्रारंभ, मध्य, शेवट, तपासनीसांचे शेरे इत्यादि गोष्टी त्यांना बेचैन करीत. शिक्षक हा जन्मजात असावा लागतो, शिक्षणशास्त्राचा अभ्यास करून शिक्षक बनतां येत नाहीं, असा त्यांचा अनुभव होता. त्यामुळें अलीकडे शाळांतून जारीनें अमलांत येत चाललेली नवी शिक्षणपद्धति त्यांच्या आंगीं उतरत नसे. मास्तर आपल्या विषयांत पूर्ण पारंगत खरे पण नव्या पद्धतीनें शिकविणें त्यांना कसें जमणार ?

े एकदा शिकवूं लागले, कीं स्वतःचेंही देहभान विसरणार तेथें त्यांना वेळेचीही द्ध कशी राहाणार ? पण हा त्यांचा गुण असला तरी तो नव्या शिक्षणपद्धतींत सा बसणार ? तेथें घंटा होतांच वर्गांत पाऊल टाकलें पाहिजे, वर्गावर थम चौफेर नजर फिरवून मुलांच्या रांगा नीट आखीव ओळींत बसविल्या गहिजेत, विषयाचा प्रारंभ, मध्य सांभाळला पाहिजे व तास संपण्याच्या ंटेच्या नादांत शेवटचें वाक्य संपविलें पाहिजे ! दोन मिनिटें अगोदर शिकविणें संपलें तर काय करावयाचें ? दोन मिनिटें स्वस्थ बसून कसें ाहाणार ? किंवा घंटा झाली व दोन वाक्यें राहिलीं तर सांगायला वेळ कोठून आणणार ? बरोबर वेळेवर धडा न संपवील तो मास्तर कसचा ; इतका ांत्रिक कांटेकोरपणा जिवंत माणसाच्या आंगीं येणार तरी कसा ? एखादा विषय रंगला तर शिकविणें त्या तासाला अर्धेंही राहील, किंवा कांहीं कारणानें मास्तराचें चित्त स्थिर नसेल तर अर्ध्याच वेळांत सगळाच धडा संपेल. परंतु ठराविक चाकोरींतूनच जाणाऱ्या पद्धतीला ह्या गोष्टी कशा मान्य व्हाव्यात ? िचें लक्ष अंतरंगापेक्षां बाह्यरंगाकडेच विशेष.

बाह्यरंग सजविणें मास्तरांना कधींच जमत नसे; त्या कारणानें शाळा तपासनीसांच्या शेऱ्यांत मास्तरांच्या संबंधानें नेहमीं कांहींना कांहीं उणीवच नमूद असे. कोठें वेळेचें अनुसंधान सांभाळलें नाहीं म्हणून, कोठें पाठान्तरावर अधिक भर दिला म्हणून, कोठें सबंध तासांत वाजवीहून अधिक सुभाषितें आलीं म्हणून, कोठें विषयाचा विस्तारच फार झाला म्हणून, असे अनेक खुळचट आक्षेप घेतले जात. एवढे गाढ व्यासंगी, परंतु एका विशिष्ट पद्धतीला पारखा झाल्यानें हव्या त्या पोरसवद्या, अननुभवी व्यक्तीनें केवळ विलायती विद्येच्या अल्पकालीन परिचयाच्या जोरावर झाडलेले अनेक ताशेरे त्यांना मुकाट ऐकून घ्यावे लागत ! केवळ कालचें पोर म्हणून ज्याचा उल्लेख करतां येईल अशा कोणींही उठावें, विलायतची वारी करून कोठच्या तरी तिकडच्या विद्यापीठांत वर्षभर बसावें, येतांना एखादें सर्टिफिकिट मिळवून यावें व तेवढ्या आधारावर शिक्षणशास्त्री म्हणून मिरवावें ! विलायती प्रतिष्ठापत्रांची भुरळ आमच्या बुद्धीवर इतकी पडली आहे, कीं त्यांच्या योग्यायोग्यतेची किंवा खरेखोटेपणाची शंकाही कधीं आमच्या मनाला शिवत नाहीं. विद्येचे हे हाल मास्तरांच्या मनाला फार जाचत. आंतल्या आंत त्यांचा कोंडमारा होई.

 M3465

अंतर्यामींची विद्यादानाची तळमळ त्यांना गप्प बसूं देत नसे, उलट नव्या पद्धतीचा फोलपणा पाहून त्यांचा उबग फारच वाढे. त्यांची ही तगमग त्यांच्या स्नेह्यासोबत्यांना फारच जाणवे. परंतु करणार काय ? पोटाचे दास व पद्धतीचे गुलाम बनलेली मंडळी मुकाटपणें तें अवजड जूं मानेवर टाकून घेत असत. त्यांच्या मुक्या मनाचा कोंडमारा उष्ण निश्वासांच्या रूपानें बाहेर पडे.

एकदा तर कडेलोटच झाला. मास्तरांच्या तासाला शाळा–तपासनीसाची स्वारी आली असतां ज्या विषयाचें अध्ययन चाललें होतें तो विषय कोठें पुसट पुसट त्या तपासनीसाच्या कानांवरून गेला होता. परंतु झकपक पोशाख व विलायती डौल ह्यांच्या भपक्यांत विद्येचें दारिद्र्य झाकण्याची कला साधलेल्या त्या पद्धति–तपासनीसाला स्थळाचें व माणसाचें भान राहिलें नाहीं व त्यानें मास्तरांच्या शिकविण्यांत चुका काढायला प्रारंभ केला. बिचारे मास्तर तर क्षणभर थक्कच झाले. जो विषय आत्मसात करण्यांत आपण इतकीं हाडाचीं काडें केलीं तोच आपणाला येत नाहीं का ? काय आश्चर्य आहे म्हणावयाचें ! मूळ ग्रंथाच्या चार ओळीही एकदम लावण्याची ज्यांची पंचाईत त्यांनीं विलायती ग्रंथांच्या आधारें त्या ग्रंथाचें बाह्यांग, शब्दांग सांगत सुटावींत आणि विद्वान म्हणून मिरवावें, हें त्यांना कसें सहन व्हावें ? एरव्हींचे सौम्य पण आतां अगदीं मर्मीच घाव पडल्यानें थोडे चिडीस आलेले मास्तरही अगदीं एकेरीस आले. तपासनीसांनीं त्यांचा तो आविर्भाव पाहून शाहाणपणानें आवरतें घेतलें व आपला मोर्चा इतरत्र वळविला. परत जातांना मात्र शेरेबुकांत मास्तरांच्या वागण्याविरुद्ध व शिकविण्याविरुद्ध त्यांना समज देण्यास ते विसरले नाहींत. बिचारे मास्तर ! दुर्दैव म्हणून कर्माला हात लावण्यापलीकडे काय करणार ?

श्रीमंतांना आपल्या मुलांना शिकविण्याकरितां एखादा विशेष हुशार मास्तर ठेवण्याची फार हौस. त्यांत थोडा प्रौढीचाही अंश असतो. मुलगा शाहाणा व्हावा त्याबरोबरच आपल्या पदरीं एकादा विद्वानही असावा ही भावना थोडीफार ह्या प्रवृत्तीच्या मुळाशीं असतेही. मास्तरांच्या विद्येचा लौकिक सर्वत्र पसरला होता, तो एका धनाढ्य शेठजींच्याही कानीं गेला. शेठजींना वाटलें, कीं आपल्या चिरंजीवांना शिकवावयास हे शिक्षक ठीक

आहेत. मोठ्या अगत्यानें शेठजींनीं मास्तरांना बोलावूं पाठविलें, त्यांचें आगतस्वागत केलें, त्यांच्यापुढें पानाचें तबक सरकविलें, चिरंजीवांच्या शिकण्याचा विषय काढला. मास्तरांच्या विद्वत्तेची अमूप स्तुति केली, त्यांच्या शिकवणीचें अगत्य दर्शविलें, तें काम पत्करण्याविषयीं त्यांना गळ घातली. व्यवहारी डावपेच माहीत नसलेल्या मास्तरांनीं शेठजींचें म्हणणें मान्य केलें. देण्याघेण्याच्या पांचपेंचाच्या गोष्टी मास्तरांना बोलतां येतच नव्हत्या. त्यांच्या त्या भोळेपणाचा फायदा घेऊन व त्यांची अघळपघळ स्तुति करून, शेठजींनीं हा सौदा कितीतरी स्वस्तांतच पटविला. तथापि मास्तरांना त्याची कांहींच दखल नव्हती. ते आपले शांतपणें काम स्वीकारून उठून आले.

दुसऱ्या दिवशीं ठरलेल्या वेळीं शिकविण्याकरितां स्वारी शेठजींच्या बंगल्यावर दाखल झाली, तों शेठजींच्या मुनीमांनीं त्यांना बाहेरच बसविलें. बराच वेळ वाट पाहूनही विद्यार्थी येण्याचें कांहीं चिन्ह दिसेना तेव्हां त्यांनीं चौकशी केली. तों कळलें, कीं धाकटे शेठसाहेब अद्याप निजूनच उठले नाहींत ! ते निजून उठल्यावर त्यांचा प्रातःकालीन चहा फराळ उरकेल, मग त्यांचें स्नान होईल व नंतर ते अभ्यासास येतील ! तोंवर बिचाऱ्या मास्तराना मात्र ताटकळत बसावयास हवें ! आपली ही लाजिरवाणी स्थिति ध्यानीं येऊन मास्तर खजील झाले, परंतु पहिलाच दिवस म्हणून त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. बऱ्याच वेळानें धाकटे शेठसाहेब आज अभ्यासाला बसणार नाहींत तेव्हां तुम्हीं परत गेलांत तरी चालेल, असा निरोप आला व मास्तर बिचारे त्या दिवशीं तोंडही उघडल्याशिवाय जड मनानें परत आले !

धाकट्या शेठसाहेबांचा असा क्रम मास्तरांच्या मधून मधून वारंवार अनुभवास येई. कधीं कधीं शेठसाहेबांच्या मातुःश्री अभ्यासाच्या वेळेला तेथेंच बसत, कधीं वेळ पुरा झाला तरी कांहीं तरी निमित्तानें मास्तरांना बसवून घेण्यांत येई, कधीं एखादे दिवशीं मास्तर कांहीं अपरिहार्य कारणानें जाऊं शकले नाहीं, कीं दुसऱ्या दिवशीं प्रथम "काल कां आलां नाहीं ? धाकटे शेठसाहेब वाट पाहून कंटाळून गेले. शिवाय त्यांचा कालचा अभ्यास राहुला," असे उद्गार ऐकावे लागत. विद्यार्थी अभ्यासाला बसला नाहीं व मास्तर बिचारे ताटकळत बसून, फुकट वेळ गमावून परत जात त्याचें कोणालाच कांहीं वाटत नसे. पुढें पुढें मास्तरांच्या वाटेवरची बारीकसारीक

कामेंही त्यांच्या वाट्याला येऊं लागलीं. पोस्टांत पत्रें टाकणें, कार्डेपाकिटें आणणें, एखादा निरोप सांगणें, असल्या गोष्टी क्षुल्लक खऱ्या पण मास्तरांच्या मानी मनाला त्या जाचत. सरळ स्वभावाच्या मास्तरांना त्या प्रथम समजत नसत, परंतु अतिपरिचयानें त्यांच्याही ध्यानीं ह्या क्लृप्त्या येऊं लागल्या. एखाद्या हरकाम्याप्रमाणें आपला उपयोग हीं माणसें करून घेऊं पाहातात, हें समजतांच त्यांना संताप आला. शिवाय अभ्यासाविषयीं फारशी आस्था नाहीं, परंतु मास्तरांच्या रोजच्या येण्याजाण्याच्या वेळा मात्र कांटेकोरपणें नियमितपणें संभाळण्यावर कटाक्ष फार ह्याची त्यांना चीड येई. विद्यार्थ्याला वाटे, आपल्या वडिलांनीं दरमहा पैसे मोजून मास्तरांना विकत घेतलें आहे. शेठजींना वाटे, कीं आपल्या वैभवाला साजेशीं इतर माणसें जशीं आपण पदरीं बाळगिलीं आहेत तसाच एक मास्तरही आपण ठेवला आहे. इतर नोकरचाकरांना वाटे, कीं जसे आपण इतके सर्व तसाच हाही आपल्यांतील एक. त्याचा वेगळा तो दिमाख काय? विद्येची म्हणजे कांहीं स्वतंत्र तेजस्विता असते आणि विद्यादान करणारा गुरु हा विशेष पूज्य, वंदनीय पुरुष असतो, असें मानावयास तेथें बिचाऱ्या एकट्या मास्तराशिवाय दुसरें कोणीच नव्हतें. बैठकीवर आसन ठोकून, लोडाला टेकून बसणाऱ्या मुनिमाजवळून इतर मंडळीबरोबरच स्वतःच्या शिकवणीचाही तनखा सही शिक्क्यानिशीं घेणें मास्तरांना कमीपणाचें वाटे.

मास्तरांनीं हा त्रास फारच थोडे दिवस सहन केला. एका महिन्यानंतर आपले शिकवणीचे पैसे घेत असतांनाच आपण आतां शिकवणीस येण्याचें बंद केलें, असें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. मुनिमाला तर आश्चर्यच वाटलें. मास्तर वेडे तर नाहींत? इतक्या मोठ्या शेठजींची शिकवणी सोडून द्यावयाची म्हणजे काय? त्यानें मास्तरांना मोलाचा, व्यावहारिक उपदेश करण्यास सुरुवात केली. परंतु त्याचे ते बहुमोल शब्द ऐकण्यास मास्तर होतेच कोठें, ते केव्हांच तेथून उठून गेले होते! मोठ्या शेठजींनींही मास्तरांना बोलावणें पाठविलें, परंतु मास्तरांनीं आपला नकार त्यांना लेखीच कळविला. शेठजींनीं दुसरा मास्तर ठेवला. धाकट्या शेठजींचा पूर्वींचा क्रम तसाच चालू होता. एक शिक्षक जाऊन दुसरा आला, ह्याचें त्यांना काय? घरांत एक नोकर जाऊन दुसरा येणें हें त्यांच्या नेहमींच आंगवळणीं पडलें होतें. आमच्या मास्तरांना दोष देणारे व्यवहारी शाहाणे लोक नव्हते, असें नाहीं. त्यांचें

म्हणणें, कीं ह्या गोष्टींकडे लक्ष द्याच कशाला, महिन्याच्या महिन्याला पगार मिळाल्याशीं कारण! तिकडे कांहीं कां होईना! परंतु विद्येच्या एकनिष्ठ उपासकाला असें वागणें कसें शक्य आहे ? द्रव्यापेक्षां विद्या व स्वाभिमान ही अधिक प्रिय असणाऱ्या मास्तरांनीं क्षुद्र लोकांच्या कलकलाटाकडे लक्षच दिलें नाहीं. ते आपले आवडते विद्यार्थी जमवून त्यांना संथा देण्यांतच आनंद मानीत. जग त्यांना हसे; ते जगाला हसत! दोघांच्या हसण्यांत मात्र किती फरक!

आजही मास्तर आपल्या विद्येची अखंड उपासना चालवीत आहेत. त्यांची विद्यार्थ्यांना विद्यादान करण्याची हौस तशीच सदैव ताजी आहे. त्यांचा व्यावसायिक नित्यक्रम तसाच अखंड चालू आहे. त्यांच्या वाणीचा ओघ अजूनही तसाच वाहातो. अजूनही नव्या पद्धतीचे लेप त्यांच्या आंगावर बसू शकत नाहींत. जुन्या, प्रचंड वटवृक्षाच्या छायेचा आश्रय घेणाऱ्या छायाप्रेमी लोकांप्रमाणें विद्याव्यासंगी विद्यार्थी अजूनही त्यांच्या आश्रयास धावतात. त्यांच्या सहवासांत त्यांना आनंदोर्मि येतात. मास्तर व त्यांचे विद्यार्थी ह्यांचे ते प्रेमळ संबंध पाहिले म्हणजे आजच्या शाळांच्या व्यवहारांत कांहींतरी चुकत तर नाहीं ना, अशी रुखरुख वाटावयास लागते. एखाद्या ध्यानयोग्याप्रमाणें मास्तर आपल्या विद्येच्या तंद्रींत असतात. त्यांच्या त्या योगाचा भंग करण्याचें सामर्थ्य जगाच्या खडखडाटांत नाहीं, हेंच योग्य.

★

# १३ अंबादास

अंबादास त्याचें नांव. जन्मानें तो गुजराती परंतु व्यवसायनिमित्तानें अनेक दक्षिणी लोकांशीं वारंवार संबंध येत गेल्यामुळें मराठी भाषाही तो चांगली बोले. मराठी शब्द किंवा मराठी आघात हीं दोन्हीही त्याला नीट साधत. त्यामुळें त्याच्या मराठी बोलण्यांत एखाद्या परप्रांतीय बोलणाराचा घाबरटपणा किंवा स्वरांचा विचित्रपणा नसे. ‘ अंबादास, तुम्हांला मराठी छानच येतं हो,’ असें म्हटलें, कीं लगेच त्यानें म्हणावें, ‘ वा ! त्यांत काय आहे ? आपल्यासारख्या अनेक लोकांशीं रोज संबंध येत असल्यानें मराठी बोलण्याची आतां अगदीं सवय होऊन गेली. तेव्हां कां नाहीं येणार थोडंसं तरी मराठी ? ’ आमचा अप्रत्यक्ष उपयोग त्याला मराठी शिकण्याला होतो ह्या अभिमानांतच आम्हीही होकारानें मान डोलवावी. पण खरा प्रकार असा होता, कीं अंबादास स्वतःच फार हुशार आणि ज्ञानप्रिय होता. त्याचा धंदा म्हणाल तर न्हाव्याचा. सकाळपासून तों संध्याकाळपावेतों लोकांचे केस कापावेत व त्यांच्या डोक्यावरचा बाहेरचा भार हलका करून तेवढ्यापुरतें तरी त्यांच्या डोक्यावरचें ओझें उतरवावें ! अंबादासाचा हा व्यवसाय खरें म्हटलें तर परोपकाराचा ! कारण आजकाल डोक्यावरचा भार उतरविणाराच मोठा उपकारकर्ता वाटतो आणि तेवढ्यापुरतें हलकें व मोकळें कोणाला वाटत नाहीं ? अर्धा तास न्हाव्याच्या कचाटींत व चौकटींत बसून खालीं वर माना करकरून दमलेला माणूस मोकळा झाल्यावर कर्तनक्रिया संपतांच आंगाला आळोखेपिळोखे देऊन सुटकेचा अभिनय करतो त्याचें कारण तरी हेंच. त्याला त्या वेळीं केवढें मोकळें झाल्यासारखें वाटतें ! क्षणभराची कां होईना पण ही मुक्तता अनेक लोकांना अंबादास रोज रोज देत असे आणि त्या त्या वेळीं त्या सर्व लोकांचा तो दुवा घेई. न्हाव्याच्या दुकानांत वेळ साधून जाणें, क्रमांक लावणें, ताटकळत बसणें, क्रमांक साधणें, कर्तन प्रयोगांतून सविस्तर पार पडणें आणि पुनश्च मार्गाला लागणें ह्या लांबलचक विधीचा वारंवार अनुभव आलेल्या कोणाही जिवाला अंबादास ह्या वेळीं आपला साहाय्यक व संरक्षक वाटायचा. कातरी, वस्तरा, यंत्रें, ह्यांची झपाझप उलथापालथ अंबादास करी, तेव्हां त्याच्या त्या शीघ्र

गतीचें आणि कुशल कृतीचें मोठें कौतुक वाटे. किती गिऱ्हाइकांचीं डोकीं अंबादासच्या हातून परीक्षून बाहेर पडलीं असतील कोण जाणे !

अंबादास हा धंद्यानें न्हावी खरा पण वृत्तीनें हजाम नव्हता. तो लोकांचीं डोकीं भादरी किंवा त्यांचे केस कापी परंतु तो गांवच्या वृथा हजामती करीत नसे. गिऱ्हाइकें आपलें डोकें निर्मळ करून घेण्याकरितां त्याच्याकडे येत. परंतु अंबादासचें स्वतःचें डोकें मूळचेंच निर्मळ असे. सामान्य गिऱ्हाईक ह्या मुंडनक्रियेला योग्य असा कळकट पोषाख करून आलेला आढळे तर अंबादास स्नान, उपासना उरकून, धुवट स्वच्छ कपडे घालून आलेला असे. दुकानांत येतांच अंबादास प्रथम आपल्या आराध्य देवतेला नमस्कार करी व तिच्यापुढें निरांजन लावी. आपल्या हत्यारांवर एकदा सफाईचा हात फिरवी, एकदा गिऱ्हाइकांकडे नजर टाकी आणि ऐटींत खुर्चीचा खटका दाबून ती जरा पुढें ओढी व "चला साहेब" म्हणून तो आलेल्यांना पुकारी. ज्याचा क्रमांक असे तो चटकन त्या उच्चासनावर विराजमान होई व आपलें डोकें त्याच्या स्वाधीन करून आपल्या विचारांच्या तंद्रीस लागे. अंबादासच्या हाताखालीं त्याचे सेवक होतेच. परंतु स्वतः अंबादास हा कुशल कर्तनकार असल्यानें आणि त्याहीपेक्षां जास्त म्हणजे तो मोठा बहुश्रुत असल्यानें त्याचा हात आपल्या डोक्यावरून फिरावा अशीच इच्छा पुष्कळ जणांची असे. म्हणून कांहीं कांहीं मंडळी तर दुसऱ्या ओळींतील आपला क्रमांक सोडून अंबादासच्या ओळींत स्वतःची पाळी येण्याकरितां खोळंबूनही बसत.

आणि अंबादासचा गुणच तसा होता. न्हाव्याची जात नुसती बोलकीच नव्हे तर वाचाळही असते. परंतु अंबादास वाचाळ नव्हता, बोलकाही नव्हता, मितभाषी होता. स्वतः तो आपण होऊन कोणाशीं कांहींही बोलत नसे. एरव्हीं न्हावी आणि गप्प बसलेला असें जरी सापडावयाचें नाहीं तरी माणसांनीं भरलेल्या अंबादासच्या दुकानांत त्याच्या हत्यारांच्या कचकच ह्या आवाजाशिवाय किंवा क्वचित एखाद्या लहान मुलाच्या रडण्याशिवाय दुसरा ध्वनि ऐकूं यावयाचा नाहीं. परंतु एखादा ओळखीचा माणूस आला, कीं अंबादास बोलूं लागे आणि मग अंबादासचें खरें रूप प्रगट होई. "अंबादास, तुम्ही मुकाट्यानें सर्व क्रिया चालवली आहे हें कांहीं बरं नव्हे; तुमच्या जातीचीं माणसं तर आपल्या गिऱ्हाइकांचं मनही डोक्याबरोबर गुंतवून ठेवतात, नि तुम्ही...?"

"साहेब, पण आतां काळ बदलला ना? कुणाला बोलणं आवडतं, कुणाला आवडत नाहीं. सर्वांची मर्जी राखायची! पूर्वीच्या काळीं आम्हां न्हावी लोकांना समाजांत एक वेगळा दर्जा होता. त्यांची कामगिरी मोठी मानली जात असे.

"कौटिलीय अर्थशास्त्रांत तर साहेब, न्हाव्याकडे फारच महत्त्वाच्या कामगिऱ्या सोपविल्या होत्या!..." कातरी किंवा वस्तरा चालविणारा हा आपल्या शेजारीं उभा असलेला न्हावी कौटिलीय अर्थशास्त्राच्या किंवा समाजव्यवस्थेच्या गोष्टी बोलतो हें पाहून कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं? थोरामोठ्यांनीं आपल्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्याकरितां ज्या गोष्टी सभा व्याख्यानांतून सांगण्याचा आव आणावा त्या गोष्टी हा साधा माणूस सहज सफाईनें बोलतो हें पाहून अर्थातच त्याच्याविषयीं आदर व कौतुक वाटूं लागे आणि असें वाटे, कीं ह्या गृहस्थाला आणखी काय काय ठाऊक आहे व कायकाय वाटतें हें तरी पाहावें. ह्या जिज्ञासेनें वारंवार अधिकाधिक प्रश्नोत्तरेंही होत. "अंबादास, सध्या तुमच्या धंद्याचा मालमसाला मिळायला तुम्हांला फार त्रास पडत असेल नाहीं? तुमच्या आवतींभोवतींचें सामानसुमान पाहा—त्यांत देशीपेक्षां विलायती वस्तूंचाच भरणा आहे. कानडा, अमेरिका ह्या दोन देशांनीं आमच्या न्हाव्यांचीं दुकानं काबीज केलेलीं दिसतात. आमचे पूर्वींचे वस्तरे, ते करणारे शिकलगार......" गिऱ्हाइकाचें बोलणें पुरें होण्याच्या पूर्वींच अंबादास म्हणे, "साहेब, कशाला हव्यात आतां त्या गोष्टी? आतां तो 'जमाना' बदलला! आतां आमच्या लोकांना सारं कांहीं विलायती हवं. त्या जुन्या हत्यारांनीं जर आम्ही आमचा धंदा चालवला तर आमच्याकडे कुणीही येणार नाहीं. आतां प्रत्येकाला विलायती फॅशन नि विलायती थाट हवा ना? म्हणून आम्हांलाही तें सोंग उभं करावं लागतं. मग त्याच्यापायीं कितीही खर्च झाला तरी चालेल. हा खर्च तरी आम्ही चोपून गिऱ्हाइकांकडूनच वसूल करून घेतों. दोन पैशाच्या कामाला आम्ही आतां दोन आणे घेतों. वरच्या डौलाला भाळणारं आमचं गिऱ्हाईक आपण व्यर्थ चौपट पैसे देतों इकडे पाहातच नाहीं. बरें ह्या वस्तु देशांत तयार होण्याची गोष्टच नको. आमच्या लोकांचं लक्ष सध्यां Capital Industries तयार करण्याकडे आहे. "Consumers' Goods कडे पाहातोच कोण?" त्याच्या तोंडचे ते अर्थशास्त्राचे विचार मला मोठे विचारप्रवर्तक व अद्‌भुत वाटले. बदलत्या तऱ्हा व अर्थशास्त्रीय योजना ह्या विषयांवरील एकाद्या न्हाव्याचे विचार कोणी

प्रमाण मानीत नाहीं, हें खरें. परंतु अंबादासचें डोकें व मन रिकामें नसून तें सारखें विचार करीत असतें हें पाहून विचारी माणसाला विस्मय वाटल्यास नवल काय ! ज्ञानाची किंवा विचारांची कोणाला मिरासदारी दिलेली नाहीं हें खरें. परंतु ज्या ठिकाणीं त्यांची अपेक्षा संभवनीयही नाहीं, त्या ठिकाणीं तीं दिसल्यास त्यांचें कौतुक कां करूं नये ? अंबादासच्या दुकानांत येणारीं अशीं अनेक माणसें असतील, कीं ज्यांच्या डोक्यावरचे केस मात्र वाढावेत, परंतु ज्यांच्या डोक्यांत विचारांची मात्र कांहींच वाढ होऊं नये! खरेंच, बाहेर केस वाढतात त्याच्या निम्यानेंही आंत शाहाणपण वाढलें असतें तर...! परंतु तें व्हावें कसें ? म्हणूनच अंबादासच्या विचारांचें आश्चर्य व कौतुक वाटे. रिकाम्या वेळीं अंबादास सामान्य वर्तमानपत्री वाङ्मयाचें अध्ययन न करतां खरोखरीच ग्रंथपठण करी. त्याची ज्ञानलालसा तीव्र होती, वृत्ति विचारी होती, वागणूक निर्मळ होती. व्यवसायाला प्रारंभ अंबादास स्नान करून शुचिर्भूतपणें करी, दिवसाचा उद्योग संपल्यावर तो स्नान करून आपल्या आंगावरील गिऱ्हाइकांचें मलसिंचन नाहींसें करी. ह्या स्वच्छतेवर त्याचा फार कटाक्ष असे. माणसांना निर्मल करणाऱ्या ह्या नापिताची अंतर्बाह्य निर्मळ वृत्ति प्रशंसेला पात्र झाली तर नवल काय ? म्हणून तर इतर कोठेंही न जातां अंबादासच्या दुकानाकडेच जाणत्यांचे पाय वळतात व त्याचे हात चालू असतांना त्याचें तोंडही चालू राहावें म्हणून उगीचच प्रश्न विचारून त्याला बोलावयाला लावावेंसें वाटतें. तेथून बाहेर पडतांना डोकें तर हलकें झाल्याचें पटतेंच परंतु मनालाही थोडासा मोकळेपणा आला असा अनुभव येतो. अंबादास हा न्हावी खरा परंतु तो म्हणतो त्याप्रमाणें समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे ह्यांत संशय नाहीं.

★

## हे इंग्रज !

असें म्हणतात, कीं सुप्रसिद्ध चौकस मुत्सद्दी नाना फडणवीस ह्यांना सुद्धा एकदा एक असा पेंच पडला, कीं " हे इंग्रज आहेत तरी कोण ? किती ? हे येतात तरी कोठून ? ह्यांचा देश कोणता ? " नानांच्या काळांत युरोपिअन लोकांना जातीनें ओळखणारे थोडेच. आज इंग्रज राज्यकर्त्यांची वहिवाट होऊन शंभर वर्षें होऊन गेलीं; त्यांची सार्वभौम सत्ता जवळ जवळ आमच्या आंगीं मुरली ! परंतु खरोखर ' हे इंग्रज ' आहेत तरी कसे ह्याविषयीं किती लोकांना कितीसें स्पष्ट ( प्रत्यक्ष ) ज्ञान आहे ? सातासमुद्रांपलीकडून हिंदुस्थानांत येऊन राज्यकारभार चालविणारा इंग्रज आपल्या मायभूमीशीं कधींही निमकहरामी करीत नाहीं. येथच्या कोठल्याही मोठमोठ्या बिकट प्रसंगीं गांगरून जात नाहीं. येथच्या राज्यकारभाराच्या चौकटींत चपखलपणें सहज बसतो. मूळ स्वभावानें कसाही उदारमतवादी असला तरी एकदा अधिकारावर चढला, कीं इंग्रजी हिताला कधींही विसंबत नाहीं. एतद्देशीयांशीं म्हणण्यासारखा मिसळत नाहीं. आमचीं सारीं बिंगं त्याला ठाऊक असतात, पण आम्हांला मात्र त्याचें एखादेंही टसठशीत न्यून माहीत नसतें. साहेब म्हटला, कीं आम्हांला नेहमीं तो वरचढच वाटतो. ह्यापेक्षां आम्हांला तरी इंग्रजांचें काय अधिक ज्ञान आहे ? नाहीं म्हणावयाला आमच्यापैकीं कांहीं लोक विद्येच्या निमित्तानें, प्रवासाच्या हेतूनें विलायतची यात्रा करून आले, त्यांना त्या ठिकाणीं जें इंग्रजांचें आयुष्य दिसलें असेल, तें खरें. पण तेंही ज्ञान अपुरेंच. कारण एकतर बाह्य देखावाच त्यांच्या दृष्टीला पडणार. समाजाच्या अगदीं अंतरंगांत त्यांचा प्रवेश व्हावयाचा कसा व इतकी अंतर्भेदी दृष्टि कितीकांची असणार ? प्रसिद्ध झालेल्या निरनिराळ्या प्रवास वर्णनांत बाहेरच्या गोष्टींचा फापटपसाराच पुष्कळ. येथच्या विषयीं तर बोलावयाला नकोच. साहेबाचें सान्निध्य लाभणेंही दुर्मिळ. सारांश, कसेंही पाहिलें तरी इंग्रज माणूस हा अद्यापही एक न सुटलेलें कोडेंच आहे.

ही स्थिति आमचीच आहे असें नाहीं, तर खुद्द युरोपांतील जर्मन लोकांनाही इंग्रज माणसांविषयीं सम्यग्ज्ञान नाहीं अशा समजुतीनें जर्मन लेखक

Kurt Von Stutterheim ह्यानें Those English * नांवाचें एक पुस्तक लिहिलें. त्यांत त्यानें स्पष्टच म्हटलें आहे, कीं आम्हा जर्मनांना, आम्ही समजतों इतकें इंग्रजांविषयीं नीटसें ज्ञान नाहीं..'तेवढ्यासाठीं इंग्रज माणूस अंतर्यामीं कसा असतो, हें माझ्या देशबांधवाना समजावें, ह्या हेतूनेंच मी येथें माझ्या पुस्तकांत त्याचें चित्रण करीत आहें ! इंग्रजांशीं निकटचा संबंध असणाऱ्या जर्मनांची ही दशा, तर साता समुद्रांपलीकडे राहाणाऱ्या व इंग्रजांच्या अंकित हिंदी माणसाची काय गोष्ट ! परंतु वस्तुतः हिंदी माणसानेंच इंग्रजांचा अभ्यास अधिक सूक्ष्मपणें करावयास हवा. कारण कीं जो आपल्यावर सत्ता गाजवितो तो माणूस आहे तरी कसा हें जाणण्याचें अगत्य त्यालाच अधिक. तूर्त उपरिनिर्दिष्ट जर्मन लेखक इंग्रजांविषयीं काय म्हणतो तें पाहा—

" ह्या इंग्लिश बेटावर राहाणारे लोक मोठे आश्चर्यकारक आहेत. त्यांच्यांत कितीही दिवस राहा, दिवसेंदिवस त्यांच्या ठिकाणचे निरनिराळे गुणच दिसतील. इंग्रज माणसाचें खरें रूप जाणावयाचें असेल तर त्याच्या निकट सहवासावांचून दुसरा मार्ग नाहीं. कारण एरव्हीं इंग्रज माणूस कधींही आपलें रूप प्रगट करणार नाहीं. त्याच्या स्वभावाला तें आवडतच नाहीं. स्वत:विषयीं वाजवीहून अधिक बोलणें हें इंग्रजी शिष्टाचारांत असभ्यपणाचें समजलें जातें. परकी माणसाशीं वागतांना इंग्रज माणसाची वृत्ति कधींही निःसंकोच नसते. तो इतरांशीं मैत्री करील, गप्पा गोष्टी मारील परंतु त्याचें खरें हृद्गत प्रगट होईल तें फक्त स्वतःच्या घरींच ( At Home ). तेथेंच फक्त त्याचा खरा स्वभाव पाहावयास सापडेल. त्या कारणानें परदेशांतील इंग्रजांच्या स्वभावधर्मावरून व नागरिकीवरून मूळच्या इंग्रजाविषयीं कल्पना करणें बहुशः चुकीचें ठरतें. इंग्रज लेखकांनीं काढलेलीं इंग्रजांचीं स्वभावचित्रेंही ह्या कामीं फारशीं उपयोगी नसतात. खरा इंग्रज अगदीं वेगळाच असतो.

" इंग्रजी माणसाला कला, शास्त्रें ह्यांची चाड आहे. लंडन शहरांत मोठमोठीं प्रदर्शनें माणसांनीं नुसतीं फुलून जातात. मोठमोठ्या जलशांना तिकिटें बंद

* Those English—Kurt Von Stutterheim. First Edition 1937, Second Edition 1938.

होतात. लक्षावधि पौंड धर्मार्थ देणाऱ्यांना कवडीचुंबक कोण म्हणेल ? तथापि ह्याच इंग्लंडमध्यें सांपत्तिक भेद किती चमत्कारिक आहेत हें पाहिल्यास आश्चर्य वाटेल. समजा, कीं दोघा सख्ख्या बहिणींपैकीं एक श्रीमंत घरीं पडली व दुसरीच एखाद्या गरिबाशीं लग्न झालें तर श्रीमंत बहीण आपल्या गरीब बहिणीकडे सहसा कधींही फिरकणार नाहीं ! मुक्या प्राण्याच्या रक्षणाकरितां येथें संस्था आहेत तर लहान मुलांना निष्ठुरपणें वागविल्याचे खटलेही चालूच आहेत. इंग्रज लोकसत्तावादी आहेत हें काय आतां सांगावयास हवें ? तथापि मध्ययुगाला शोभतील अशा सरदारअसामदाऱ्या व मानमरातब अखंड टिकूनच आहेत. ह्या परस्पर विरोधाचा सारांश इतकाच, कीं इंग्रजांविषयीं सरसकट सामान्य विधान करणें बरेंच कठीण आहे. प्रांजल मनानें अभ्यास केल्याशिवाय इंग्राजाच्या स्वभावाचा थांगपत्ता लागणार नाहीं. त्याचा स्वभाव शब्दापेक्षां कृतींत जास्त उमटतो. अशा माणसाच्या मनांतून एकेक गोष्ट काढून घेणें ह्याला बरेंच धोरण हवें.

"इंग्रज माणूस स्वतःला पूर्ण सुधारलेला समजतो. आपली अगदीं प्राथमिक अवस्था तो आतां पूर्णपणें विसरला आहे. इंग्रजाच्या स्मरणांत इतिहास असेल तर तो वैभवशाली सम्राज्ञी एलिझाबेथपासूनचा. जुन्या पुराण्या पौराणिक गोष्टी ध्यानांत ठेवण्याच्या व त्यांचा व्यर्थ काथ्याकूट करण्याच्या भानगडींत तो पडत नाहीं. जुनाट दैवतें, आपल्या पितरांचे प्रताप ह्यांच्या विषयींच्या विचारांत तो आपली शक्ति खर्चीत नाहीं. जुन्या लोककथांनीं अंतःकरण भरून यावें, अशा लोककथाही सांठविण्याच्या तो भरीस पडत नाहीं. जर्मन लोकांना व हिंदी लोकांनाही इतिहासाचा प्रांत संपून पुराणांचें नांव निघालें, कीं आनंदाचें भरतें येतें. इंग्रजाला तें सारें मृतवत् वाटतें. नाहीं म्हणावयास केल्ट लोकांना मात्र त्याची थोडी आवड आहे.

"ह्या पुराणप्रियतेमुळें जर्मन लोकांच्या मनांत निसर्गाविषयीं विशेष प्रेम आहे. (जी गोष्ट जर्मनांची तीच हिंदी लोकांची.) दोघांनाही सृष्टीशीं एकजीव व्हावेंसें वाटतें. निसर्ग व मानव ह्या दोघांच्या ठिकाणीं एकात्मकतेचा भास जर्मन लोकांप्रमाणेंच हिंदी लोकांनाही होतो. इंग्रजाचा स्वभावच वेगळा. एखादा इंग्रज कवि सोडा, परंतु साधारण इंग्रजाची निसर्गाविषयीं वृत्ति वेगळी. विस्तृत पटांगण त्याला क्रीडाक्षेत्र म्हणून आवडेल. निरनिराळ्या कुरणांतून

तो आपल्या आवडत्या कुत्र्याला फिरवील. रानांत शिकारीला जाईल. नदींत मासे पकडीत दिवसभर बसेल. सुंदरशा कुरणावर टेनिस खेळेल. त्याची बागेची आवड तेथें फुलें होतात म्हणून. झाडांखोडांनीं घराला शोभा येते म्हणून त्यांविषयीं प्रेम. त्याच्या दृष्टीनें निसर्ग एक कार्यक्षेत्र आहे. भूमीपेक्षां प्राण्यांवर त्याचें जास्त प्रेम असतें. प्राणी हे त्याला आपले स्नेही वाटतात. धरणीमातेच्या अंकावर डोकें टेकावयास तो धजत नाहीं. त्याला तिची भीतीच वाटते. आपल्या बांधवांशींच त्याचें सख्य होऊं शकतें. धरित्रीशीं तो नेहमींच दुजाभाव धरतो. कदाचित समुद्रावरच्या वर्चस्वानेंच सारें जग जिंकणाऱ्या ह्या सागरप्रिय लोकांना समुद्रच आपला पिता वाटत असावा आणि त्याच्याच विषयीं त्यांच्या मनांत प्रेमभाव असावा. (इंग्रजी धर्मांत तरी देवाला आईच्या जागीं बापच म्हटलें आहे ना ? )

"निसर्ग आणि मानव ह्यांच्या एकात्मकतेमुळें जर्मन माणसाच्या (आणि हिंदी माणसाच्याही ) मनांत धर्म आणि निसर्ग ह्यांच्याविषयीं निकट साहचर्य उत्पन्न होतें. इंग्रज माणसाला ही कल्पनाही समजत नाहीं. इंग्रजाच्या मतानें धर्म हा व्यक्तिशः ईश्वर व मानव ह्यांच्या वैयक्तिक संबंधाला अनुलक्षून आहे. ईश्वराचा प्रत्यक्ष साक्षात्कार मनुष्येतर व्यवहारांत त्याला कधींच होत नाहीं. ईश्वरानें बायबलच्या द्वारें सांगितलेला जो संदेश तोच ईश्वराचा अंतिम प्रमाण शब्द. इंग्रज माणसाच्या साऱ्या नैतिक, आध्यात्मिक आकांक्षा तेवढ्या धर्मवचनानें तृप्त होतात. सामान्य इंग्रज माणूस शाश्वत चांगल्या वाईटाच्या विचारांनीं स्वतःला व्यर्थ गोंधळांत टाकीत नाहीं. व्यावहारिक व तात्कालिक चांगल्या वाईटाच्या निर्णयानें आपला चालू व्यवहार उत्कृष्टपणें तो पार पाडूं शकतो. अज्ञेयवाद त्याला भेडसावीत नाहीं, किंवा अज्ञेयवादानें तो नुसता जडवादीही बनत नाहीं. धर्मावरील विश्वास सामान्य इंग्रज जनतेच्या मनांत अद्याप तसाच वसत आहे. अजूनही धर्मसत्ता – चर्चचा अधिकार – मानण्यांत येतोच. इंग्रज हा प्राचीन परंपरेचा अत्यंत अभिमानी असल्यानें प्राचीन श्रेष्ठ परंपरा असलेल्या धर्माविषयीं त्याच्या मनांत आदरच आढळेल. धर्माचें त्यानें एक संस्थानच बनविलें आहे; त्या संस्थानाचा ईश्वर हा राजा आणि बिशप हे त्याचे मंत्री !

"इंग्रज लोकांच्या आचारांत, विचारांत एक प्रकारचा मर्यादितपणा दिसेल. अमर्यादपणें विचार करून अनंतत्वांत विलीन होण्याइतकी प्रखर कल्पनाशक्ति

त्यांची नसते. ह्या मर्यादितपणाच्या बंधनांचा अप्रत्यक्ष भास खुद्द इंग्रजालाही झाल्याविना राहात नाहीं आणि त्यांतूनच सुटण्याचा त्याचा प्रयत्न चाललेला असतो. उलट, विशाल दृष्टीच्या अभावामुळें, त्याच्या चालू कृतीला मात्र अधिक स्थैर्य येतें. त्याची शक्ति सैरावैरा विखुरली जात नाहीं, त्यामुळें कोणत्याही एका कामीं ती संपूर्णत्वानें वापरतां येते. त्याचें जीवितकार्य म्हणजे स्वतःच्या आयुष्याचा प्रश्न सोडविणें व कोठल्याही परिस्थितींत राहतां येईल असें जीवनशास्त्र अभ्यासणें. हिंदी माणसाला जितकी आत्मचिंतनाची स्वाभाविक हौस तितकी इंग्रज माणसाला सुव्यवस्थित जीवनाची हौस. दैनंदिन व्यवहारांतच त्याचें सारें लक्ष गुंतलेलें असतें. ह्याचा अर्थ इतकाच, कीं नित्य व्यवहाराच्या ज्या सांस्कृतिक, कलाविषयक गोष्टी त्यांकडेच तो अधिक अवधान देतो. सामान्य व्यवहारांत अरेरावी सत्तेपेक्षां अनुनयानें काम करून घेण्याकडे त्याची प्रवृत्ति विशेष. आपल्याच आवडीच्या गोष्टी तिऱ्हाइताकडून त्याच्याच तंत्रानें करून घेण्याची हिकमत त्याला साधलेली! जुलमानें झालेलीं कामें फार दिवस टिकत नाहींत, हें तो जाणून असतो. म्हणून दुसऱ्याच्या कलाकलानेंच पण स्वतःच्या मनासारखें घडवून आणण्याचा तो प्रथम प्रयत्न करतो. त्याप्रमाणें नच जमल्यास शेवटीं धाकदपटशा करण्यास तो मागेंपुढें पाहात नाहीं. महत्त्वाच्या वेळीं एका क्षणांत तो कठोर बनूं शकतो. आंतरराष्ट्रीय व्यवहारांतही त्याच्या ह्या स्वभावाचें प्रत्यंतर येतें. एकदा युद्ध पुकारलें, कीं तो सर्व शक्तींचा उपयोग केल्याशिवाय राहाणार नाहीं. परंतु युद्ध संपलें, कीं त्याच्या मनांतील तेढही संपली.

“ इंग्रजी शिक्षणाचा मुख्य गुण म्हणजे आत्मविश्वास उत्पन्न करणें. प्रत्येक सामान्य माणसाच्या ठिकाणींही त्या गुणाचा यथाप्रमाण अंश आढळतो. त्याच्या शिक्षणाची पद्धतीही भिन्न. स्वतःच्या व आपल्या मुलांबाळांच्या डोक्यांत तो निरर्थक गोष्टी कोंबीत नाहीं. निरर्थक गोष्टींच्या माहितीनें माणसाची वारेमाप अवस्था होते, असें त्याला वाटतें. इंग्रज माणूस केव्हांही पृथ्वीवरचे पाय उचलून आकाशांत उड्डाण करायला तयार होणार नाहीं. इतर कित्येक गोष्टी त्याला खपल्या तरी निश्चयाभावाची संशयावस्था त्याला मुळींच खपत नाहीं. कोणत्याही गोष्टींत चटकन निश्चय न करतां येणें त्याला कमीपणाचें वाटतें. त्याला नावीन्याची चटक नसते. निसर्गाप्रमाणें त्याचें सारें काम

धीमेपणानें चालतें. वर्तमान पद्धति वारंवार बदलून नित्य नव्या पद्धतींचा प्रयोग करून पाहाण्याचा त्याला हव्यास नाहीं. असलेल्या पद्धति कटाक्षानें पाळण्याचीच त्याला शिक्षणामुळें सवय जडते. किंबहुना तसाच तो अभ्यास करतो. ह्यामुळें एका बाजूला इंग्रज माणूस आपल्यापुरता व्यक्तिनिष्ठ असला तरी व्यवहारांत परंपराप्रियच आढळतो. त्यामुळेंच साऱ्या इंग्रज लोकांच्या आयुष्यांत एकसूरीपणा आला आहे. त्यांत त्याचे फाजील श्रम वांचतात, हें मात्र खास. खाणेंपिणें, घराची सजावट, कपड्यालत्त्यांचे निर्बंध, सामान्य शिष्टाचार व चालीरीति ह्यांची परंपरा व पद्धत अगदीं अंगवळणीं पडलेली. ती अगदीं गाळीव बनली असून आतां तिजविषयीं कांहीं विचारही करावा लागत नाहीं. आयुष्याच्या बारीक सारीक साऱ्या गोष्टींना आतां अखंड परंपरेनें एक विशिष्ट, निश्चित रूप प्राप्त झालें आहे. फक्त तें रूप तेवढें समजलें कीं झालें. इंग्लंडचे लोक विशिष्ट सवयींच्या संपूर्ण आहारीं गेले आहेत.

" इंग्रज माणसाचें ज्ञान व्यावहारिक स्वरूपाचें असतें, नुसत्या तात्त्विक ज्ञानाच्या मागें तो लागत नाहीं. आयुष्यांत समोरून जें जें येईल त्याला त्याला तो आनंदानें व धैर्यानें तोंड देण्यास सदा तयार असतो. प्रत्यक्ष आयुष्यांत केवळ तर्कशास्त्राचा तो कधींही अवलंब करणार नाहीं. ठाऊक असणाऱ्या कारणांवरून कार्याचें अनुमान करीत बसण्याचा रिकामटेकडा खेळ खेळणें त्याच्या स्वभावाला रुचत नाहीं. तर्कशास्त्र व प्रत्यक्ष व्यवहार ह्या दोहोंमध्यें तो व्यवहारालाच प्राधान्य देतो. आयुष्यांत, दरेक क्षणाक्षणाला, जें जें सहज घडत जातें, तेंच खरें. पुढच्या संशयित गोष्टींचा विचार करीत बसणें किंवा पुढचीं संकटें आजच कल्पनेनें उभीं करून तीं निवारण्याच्या योजना ठरवीत बसणें, त्याला चुकीचें वाटतें. संकटें प्रत्यक्ष उभीं राहिलीं, कीं मग त्यांवर उपाययोजना. प्रत्यक्ष इंग्रजी साम्राज्य सुद्धा पूर्वी योजून झालेलें नाहीं. इंग्रजी साम्राज्य हा एक चमत्कारिक योगायोग आहे, असें स्वतः इंग्रज सुद्धा म्हणतात. हिंदुस्थानांतही आपल्या हातांतील तराजू गळाली कशी आणि केव्हां व आपण तेथेंच सिंहासनावर बसलों कसे व केव्हां हें इंग्रजांचें इंग्रजांनाच नीटसें समजलें नाहीं ! इंग्रजी इतिहासाचें ज्ञान असणाऱ्या कोणाही माणसाला ही गोष्ट मान्य करावी लागेल. धोटापाण्याचाच प्रश्न असल्यामुळें पुष्कळ वेळां इंग्रजी राजनीतीचे धागेदोरे

लांबवर गेलेले क्वचित आढळतातही. माणसाचा स्वतःच्या सामर्थ्यावर अढळ विश्वास असल्याविना त्याला भविष्याविषयीं इतकें निष्काळजी राहातां येणार नाहीं. कोटच्याही परिस्थितींत आपल्याला योग्य तो निर्णय करतां येईल, असेंच त्यास वाटत असतें. आणि समजा, कीं एखाद्या वेळीं चुकलेंच तर आपली चुकी झाली असेंही कबूल करावयास तो लाजणार नाहीं. इंग्रजी स्वभावांत तेवढा प्रांजलपणा असतोच. वृथा गर्विष्ठपणानें आपल्या चुक्यांवरही पांघरूण घालणें, असभ्यपणाचें मानलें जातें. वृथा गर्विष्ठपणानें फजिती होते, हें त्यांना ठाऊक असतें. क्रिया-प्रतिक्रिया न्यायानें गर्विष्ठपणाला तडाखे देणारे निघतातच. ह्यामुळें प्रत्येक वेळीं सावधगिरीची भाषाच त्याच्या तोंडून निघते. कोणतेंही काम अत्यंत यशस्वीपणें पार पडलें तरी, "कां ! कसें झालें !" अशा प्रौढीचे उद्गार तो काढणार नाहीं. तर उलट, "मला वाटतं ह्यांत फारसं कांहीं चुकलं नाहीं," असेंच नम्रतेनें तो म्हणेल. अर्थातच ज्याच्याजवळ हे उद्गार तो काढतो त्याला त्यांतला गूढार्थ समजतोच. एक इंग्रज दुसऱ्या इंग्रजाला चांगल्या तऱ्हेनें ओळखून असतो. एखाद दुसऱ्या शब्दानेंच ते एकमेकांचें इंगित जाणतात. ज्या ठिकाणीं दुसऱ्या माणसांना दहा शब्द बोलावे लागतात तेथें त्यांचें एका शब्दांत काम होतें. जी गोष्ट खाजगी व्यवहाराची तीच सार्वजनिक व्यवहाराची. वर्तमानपत्रांतही अशीच सावधगिरीची भाषा. एक युद्धाचा समय सोडल्यास, एरव्हीं सामान्य व्यवहाराच्या कालांत इंग्रज माणूस तावातावानें बोलतांना किंवा वर्दळीवर आलेला दिसणार नाहीं. शब्दाशब्दी करण्याचा त्याचा कधींच विचार नसतो, तर स्वतःच्या लाघवी भाषेनें आपल्या गिऱ्हाइकांना स्वतःकडे ओढणाऱ्या एखाद्या आर्जवी दुकानदाराप्रमाणें, इंग्रज माणूस दुसऱ्याला आकर्षण्याचा प्रयत्न करील. इंग्लंड व्यापाऱ्यांचें राष्ट्र आहे ना ! तेव्हां ह्या मानसिक सौम्यपणाला लोकव्यवहारांत महत्त्व येणें साहजिकच आहे.

"इंग्रजांच्या राजकीय बुद्धिमत्तेविषयीं विचार करतांना तर विशेषच आश्चर्य वाटतें. जागतिक इतिहासावरून इंग्रज माणसाच्या डोक्यांत राजकारणाचें सदैव थैमान चाललें असेल असें समजणें चुकीचें आहे. दोन जर्मन माणसें एका ठिकाणीं भेटलीं, तर अशा आवेशानें तीं बोलतांना आढळतील, कीं जणूं काय साऱ्या जगाचें राजकारण त्यांच्या राहात्या खेड्याभोंवतींच घुटमळत आहे. परंतु इंग्रज माणसांचें तसें नाहीं. त्यांचें संभाषण हवामान,

सणवार, उद्योगधंदा, मुलांचें शिक्षण ह्या गोष्टींनींच भरलेलें आढळेल. कोठच्याही बिकट परिस्थितींतून इंग्रज माणूस स्वतःला चटकन बाहेर काढील. कोठच्याही राजकारणी-प्रश्नाचा काथ्याकूट करण्यापेक्षां, प्रत्यक्ष क्रियाप्रधान राजकारणामुळेंच इंग्रजांना राजकारणी म्हणावयाचें. इंग्रजी भाषेंतील 'would' 'might' हें शब्दच पाहा कसे सावधगिरीचे, राजकारणी आहेत. इंग्रज माणूस बोलतांना आवाज चढविणार नाहीं, डोळा फार वर उचलणार नाहीं, हातवारे करणार नाहीं, परंतु ह्या त्याच्या बाह्य सौम्यपणांतच सूक्ष्म, अंतस्थ राजकारणाचा वास येतो.

"परस्थ माणसाला इंग्रजाच्या घरांत सर्वत्र परंपरेचा आढळ होईल परंतु इंग्रज माणूस मात्र आपली स्वतंत्र व्यक्तिनिष्ठा दाखविण्याचा प्रयत्न करील. नाहीं म्हणावयास सभ्यता आणि विनय हीं मात्र सर्व व्यक्तींच्या ठिकाणीं नमुन्यालायक आढळतील. पॅरिसपेक्षां इंग्लंड कितीतरी अधिक विनयशील आहे. त्या विनयांत रोमची कृत्रिमता नाहीं किंवा बर्लिनमधील पढिक शिस्त नाहीं. एखाद्या रस्त्यावर तिऱ्हाईत माणूस नांवाच्या पाट्या वाचीत किंवा घरांचे आंकडे शोधीत फिरतांना दिसला तर सहजच जाणारा त्याचा नवखेपणा जाणून "मी दाखवूं का तुमचा पत्ता ?" असें सौम्यपणें विचारील. रस्त्यावरच्या दमल्या भागल्या पांथस्थाला चार पावलें उचलून नेण्यास मोटारी थांबतील. ही दैनंदिन व्यवहारांतील सभ्यता हा इंग्रज माणसाचा मोठा आदरणीय विशेष आहे. ह्या सभ्यतेच्या पोटींच तडजोडीचा जन्म होऊन, इंग्रज माणसाला एकेरीवर येऊन "एक घाव, दोन तुकडे" करून टाकण्यापेक्षां तडजोड करणें अत्यंत रुचतें. मतविरोधाचें पर्यवसान आत्यंतिक प्रक्षोभिक व्यक्तिविरोधांत क्वचितच होतें. ह्यामुळेंच इंग्रज माणसाचें आयुष्य सदैव निष्कंटक असूं शकतें. आणि त्याच्याच जोडीला आयुष्य सुखावह करावयास त्याची विनोदवृत्तीही साहाय्यकच होते.

"मानवी गुणांचे, प्राकृतिक व आनुषंगिक असे भेद केल्यास विनोदवृत्ति हा इंग्रजांचा प्राकृतिक गुण मानतां येईल. विनोद म्हणजे ह्या देशांत नुसती क्षणिक हास्यवृत्ति किंवा पांडित्य नव्हे, तर तो इंग्रजांचा स्वभावच आहे. त्यांचा जीविताचा दृष्टिकोणच विनोदावर उभारलेला असतो. ह्या विनोदवृत्तीमुळेंच कोठच्याही गोष्टी इंग्रज माणूस जिवाला लावून घेत नाहीं आणि त्या कारणानें

थोड्याशा अनासक्तिमुळें जीवित त्याला सह्य व सुखावह होतें. विनोदवृत्ति हेंच सर्व मानसिक रोगावरचें त्याचें औषध. दुसरा कोठचाही माणूस किंवा दुसरें कोठचेंहि राष्ट्र, स्वतःच स्वतःची गंमत करतांना असें आढळणार नाहीं. ज्याच्या आंगीं विनोदवृत्ति नाहीं त्याचा कुयोगच. कोणाच्याही ठिकाणीं शिष्टाचाराचा किंवा विनोदवृत्तीचा अभाव इंग्रज माणसाला खपत नाहीं. ज्याला मोकळेपणीं हसतां येत नाहीं असा माणूस इंग्रजाला रुचत नाहीं. विनोद हें इंग्रजी राष्ट्राचें आराध्य दैवत आहे. क्वचित प्रसंगीं ह्या विनोदाचा अतिरेक होऊन गांभीर्याला दूर लोटलें जात असेल किंवा विनोदाच्या नांवावर उथळपणाला वावही मिळत असेल; परंतु विनोदीवृत्तीचे शुभ परिणाम मात्र अनेक आहेत. ह्या वृत्तीनेंच उत्कृष्ट वाङ्मयाला जन्म दिला, जीवितांत सुख निर्माण केलें. सामाजिक स्नेहसंबंध उभारले व वर्गभिन्नतेचा कडवटपणा कमी केला. ह्या विनोदवृत्तीचें मूळ शोधीतच गेलों तर तें इंग्रजाच्या आशावादीपणांत आढळेल. लक्षावधि इंग्रजांना आयुष्यांतील सामान्य सुखसोयी सुद्धा पुरेशा मिळत नाहींत. परंतु इंग्रजी राष्ट्राच्या भाग्यांत त्यामुळें कांहींच फरक झाला नाहीं. प्राचीन दीर्घ इतिहासानें इंग्रजाला स्वतःच्या सुयोगावर विश्वास ठेवण्यास शिकविलें आहे. फारच थोडीं इंग्रज माणसें निराशेनें खंगलेलीं आढळतील. कितीही अडचणी आल्या, किंवा कितीही प्रयत्न फसले तरी, पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहाण्यास इंग्रज माणूस कधींही मोडणार नाहीं. जर्मन लोकांचें ( व हिंदी लोकांचेंही ) आयुष्यासंबंधीं वैराग्य, किंवा स्लाव्ह लोकांचा निराशावाद, इंग्रजांना अगदीं परका आहे. जेथें इतर लोक हातपाय गाळतात, तेथें इंग्रज माणूस म्हणतो, कीं “ धीर धर, पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहा.” अंतीं यश न मिळालें तरी, इंग्रज देवाला किंवा दैवाला फारसा बोल लावणार नाहीं. आपली असमर्थता जाणून, खांदे उडवीत उडवीत तो दुसऱ्याच्या यशस्वी प्रयत्नाचेंच कौतुक करील. स्वतःपेक्षां इतरांना त्या कामीं अधिक यश आलें, असें तो समजेल. ह्या असूयेच्या अभावामुळेंच मोटमोटीं श्रीमंत माणसें अगदीं दरिद्री वस्तींतून आपल्या उत्कृष्ट मोटार गाडींतून सुखानें संचार करूं शकतात. कामकरी वर्गात येथें असूयेचें बीजारोपण करणें म्हणजे त्याला चांगलाच पद्धतशीर प्रचार हवा—तरीहि तें काम अशक्यच.

“अशा रीतीनें ह्या मर्यादित ब्रिटिश बेटावर राहणाऱ्या लोकांच्या आचारा-विचारांत एक प्रकारच्या मर्यादितपणाचा अंश आला तरीही त्या मर्यादेंत मात्र इंग्रज माणसाला संपूर्ण स्वातंत्र्य हवें असतें. शिस्त व संयम हीं त्याच्या स्वभावाशीं, प्राचीन परंपरेप्रमाणेंच, एकजीव झालीं आहेत.

“‘दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करूं नका’, ‘आपापलें काम चोख करा’, ही इंग्रजाची शिकवण आहे. परंतु ह्याचा अर्थ इंग्रज सहवासप्रिय नाहीं, असा नव्हे. इतरांच्या सहवासाची त्याला फार आवड. आपणाप्रमाणेंच आपल्या सहवासानें इतरांनाही सुख व्हावें, अशी त्याची इच्छा. भांडणापेक्षां तत्त्वबोधाकरितां वाद करण्याकडे त्याची प्रवृत्ति. एखाद्या वेळीं खरडपट्टी काढण्याची पाळीच आली तर त्या वेळीं मात्र मागें पुढें पाहणें नाहीं. परंतु असा प्रसंग क्वचितच यावयाचा. इंग्रजाच्या स्वभावांत थंडपणा फार, त्यामुळें हवामान किंवा खेळ ह्याशिवाय इतर कांहीं चटकदार विषय संभाषणांत झटकन निघणेंच कठीण. सारा समाजच्या समाज असा बौद्धिक थंडपणानें ग्रासलेला. त्यामुळें एखाद्याच प्रखर बुद्धिमानाला अगदीं एकएकट्यासारखें वाटतें.

“राजाशीं इंग्रज माणसाचे संबंध इतर ठिकाणांपेक्षां अगदीं भिन्न आहेत. राजाचा अंश राजाला दिल्यावर, उरलेला स्वतःचा अंश, तो डोळ्यांत तेल घालून जपेल. आपल्या स्वतंत्र व्यक्तिनिष्ठेला बाध येऊं देणार नाहीं. ह्या त्यांच्या एकाकी वृत्तीमुळें त्यांचें एकीकरण करणें फार कठीण होतें. विशेषतः आर्थिक किंवा राजकीय चळवळी जबरदस्तीनें घडवून आणणें इंग्रजांच्या बाबतींत फारसें शक्य नाहीं. त्यांचा स्वतःवरच विश्वास आणि भर अधिक. ह्याप्रमाणें इंग्रज माणसांच्या ठिकाणीं जबाबदारीची जाणीव, सामाजिक कार्याची आवड, प्रकृतीचा कणखरपणा व चिवटपणा हे गुण आढळतात. अशाच माणसांनीं, स्वतःकरितां व आपल्या देशाकरितां खपणाऱ्या ह्याच लोकांनीं, इंग्लंडला वैभव शिखरावर चढविलें.”

ह्या वर्णनावरून हिंदी लोकांना कांहींच बोध घेतां येण्यासारखा नाहीं का? स्वतंत्र, उदयोन्मुख जर्मन राष्ट्राचा एक नागरिक इंग्रजांचा स्वभाव इतक्या बारकाईनें अभ्यासतो व त्यांत त्याला त्यांच्या स्वभावाचे अनेक विशेष आढळतात. इंग्रज जर्मनांना निकटचे, तेजस्वी, प्रबल प्रतिस्पर्धी. स्वतःच्या प्रतिस्पर्ध्याच्या स्वभावाचें व आचारविचारांचें मार्मिक अवलोकन

करणें, हें राजनीतीचें एक महत्त्वाचें अंग आहे. आम्हां हिंदी लोकांना तर अशा अध्ययनाची विशेषच आवश्यकता आहे. इंग्रज व इंग्रजी संस्था ह्यांच्या बाह्य रूपावरच लोभावून तेथेंच स्तब्ध होऊन न बसतां, इंग्रजांच्या अंतरंगाचा ठाव काढणें आम्हांला अत्यंत जरुरीचें आहे. प्रत्यक्ष सहवासानें हा परिचय झाल्यास ठीकच; परंतु तसा योग नच आल्यास, ज्यांनीं तसा परिचय करून घेण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांच्या सांगण्याकडे तरी लक्ष द्यावें. ज्ञानाच्या प्रमाणांत प्रत्यक्षाइतकें—किंबहुना थोडें अधिकच—शब्दप्रमाणाला महत्त्व आहे, हें कोण नाकबूल करील ?

★

## १५ "संगित–रत्न"

'संगीतरत्न' ही त्याची जुनी पदवी होती. गाण्यांत तसा तो पट्टीचा निष्णात होता. त्याच त्याच्या गुणामुळें त्याला संगीत नाटक मंडळींत प्रथम प्रवेश मिळाला. मराठी रंगभूमीच्या उज्ज्वल कारकीर्दीचा तो काल होता. संगीत कंपन्यांची तेव्हां चलती होती. नटांना भरपूर काम असे. उत्कृष्ट अभिनयाला वाव होता. सुरेल संगीताला हवा तेवढा अवसर होता. अद्याप चित्रपट सृष्टि बाल्यांत होती. बोलपटाचा बोलबाला झाला नव्हता. आटोपशीर कालबद्ध संगीत निर्माण झालें नव्हतें. तेव्हां रंगभूमीवरच्या संगीताची मैफल झडे. श्रोते त्या प्रवाहांत यथेच्छ डुंबत. अशा काळांत त्याच्या गायनकलेला रंगभूमीचा भरपूर आश्रय मिळाला. त्याच्या कलेला तेज चढलें. नित्य नव्या नव्लाईनें ती नटूं लागली. त्याचा भरदार आवाज, सुरेल ताना, गाण्यांतील चमक, श्रोत्यांच्या जिवाला जाऊन भिडणारे आलाप, साऱ्यांचा अपूर्व परिणाम होऊन तो साहजिकच मानमान्यतेला चढूं लागला, रंगभूमि गाजवूं लागला. प्रेक्षक त्यावर निहायत संतुष्ट होऊं लागले. कंपनींत त्याचा दर्जा वाढला, नाटकी जगांत त्याचा लौकिक वाढला. त्याच्या चाहात्यांनीं त्याला संगीत-रत्न ही पदवी दिली. काय धन्यता वाटली त्याला! तेव्हांपासून कोणत्याही वेळीं त्याचा उल्लेख संगीत-रत्न म्हणून होऊं लागला. कंपनीच्या फलकावर त्याच्या नांवामागें "संगीत-रत्न" झळकूं लागलें. त्याला मूठभर मांस चढलें. कंपनीच्या प्रतिष्ठेंतही थोडी भरच पडली. आपल्या सुमधुर गायनानें श्रोत्यांना तो गोड धुंदींत ठेवी. श्रोतेही त्या अवीट आनंदाचा भरपूर आस्वाद घेत. गाणारा व ऐकणारे ह्या उभयतांमध्यें समरसता उत्पन्न झाल्यानें आनंदाचा आस्वाद तादात्म्यानें दोघांनाही घेतां येत असे. त्याच्या मुद्रेवर समाधानाचें तेज दिसे. श्रोत्यांचा आनंद टाळ्यांच्या कडकडाटानें प्रसिद्ध होई. सजीवता व सरसता ह्यांचा मधुर संयोग होत असे.

परंतु कालचक्राच्या फेऱ्यांत मराठी रंगभूमि सापडली व तिचें वैभव ओसरत चाललें. चित्रपट पुढें सरकूं लागले व प्रेक्षकांचें लक्ष त्यांकडे वेधलें.

रंगभूमीचा मांड बिघडूं लागला. नटांचें कौतुक कमी झालें. कंपन्या आटोपल्या, नट मोकळे झाले, गायनकला थांबली. अशा स्थितींत 'संगीत-रत्न'ही सापडल्यास नवल काय ? रंगभूमीवरून रिकाम्या झालेल्या ह्या निष्णात गायकाला जीवनाकरितां आपली गायकी आतां कोठें राबवावी, हा विचार पडला. सिनेमा आणि रेडिओ हींच काय तीं आतां लोकप्रिय व द्रव्यदायक ठिकाणें उरलीं. पैकीं सिनेमाचा अनुभव प्रथम घ्यावा असें त्याच्या मनांत आलें. 'संगीत-रत्न' सिनेमा कंपनींत शिरला.

सिनेमाजगाइतकें कृत्रिम व चमत्कारिक जग दुसरें कोणतेंही नसेल. तेथं नटापेक्षां दिग्दर्शकच सर्वनियामक असावयाचा. लहानशा बंदिस्त जागेंत, प्रकाशाच्या प्रखर झोतांत, माणसांच्या हजेरी-गैरहजेरींत नाना प्रकारचे देखावे तयार केले जावयाचे, तुकड्यातुकड्यांनीं त्यांचें चित्रण व्हावयाचें व मग ते एकमेकांना जोडले जावयाचे ! प्रेक्षकांना सबंध चित्रपट सलग व क्रमवार दिसला तर त्याचें प्रत्यक्ष चित्रीकरण मागेंपुढें हेलकावत, खण्डशः अस्वाभविकपणें व अगदीं निर्जीवपणें होणार ! 'संगीत-रत्न' ह्या क्रियेला कंटाळल्यास काय आश्चर्य ? तेथें गाण्याला वाव नाहीं, ऐकणारे श्रोते नाहींत, आनंदाच्या टाळ्या नाहींत, जिवंतपणाचा लवलेश नाहीं. सारा कारभार यांत्रिक. आधीं तालमींनीं जीव अर्धमेला व्हावयाचा, त्यानंतर प्रत्यक्ष पांच मिनिटांच्या देखाव्याची रुपेरी योजना करण्याची तासन् तास खटपट आणि कटकट, दिग्दर्शकानं "चलाव" म्हणतांच यान्त्रिक सुरुवात, मध्येंच कोठें कांहीं खुट्ट झाल्यास एकदम "कट" म्हणून सारा प्रयोग बंद, पुनश्च व्यवस्था, पुनश्च प्रारंभ, एक कीं दोन. ह्या निरर्थक फापट पसाऱ्यानें खऱ्या कलावंताचा जीव हराण होई. शिवाय इतकें करून गाणें तरी मोकळेपणीं आहे म्हणावें, तरी तेंही नाहीं. चाली कोठल्यातरी सामान्य, वेळाचें नियन्त्रण—कारण फिल्मची लांबी मर्यादित. त्यावर कळस म्हणजे अडाणी दिग्दर्शकांचा जाच ! कंटाळला बिचाऱ्याचा जीव ह्या तापत्रयाला आणि एक दिवस तो सिनेमा जगाच्या बाहेर पडला. किती मोकळें वाटलें त्याला त्या वेळीं !

त्याच्या गाण्याच्या गुणामुळें त्याला रेडिओवर गाण्याचेंही आमंत्रण येई. पैसाही मिळे त्याबद्दल, परंतु त्या गाण्यांत त्याचा जीव उमटेना. कांचेच्या बंद खोलींत, निर्जीव यन्त्रासमोर, अज्ञात व अदृष्ट श्रोत्यांकरतां गातांना त्याच्या

मनाला समाधान होत नसे. गाण्याची खरी सजीव रंगत ही सहसंवेदनेविना कशी येणार ? व जिवंत श्रोत्यांशिवाय संवेदना कशी निर्माण होणार ? गायकानें गावें, श्रोते मंत्रमुग्ध नागाप्रमाणें डोलावेत, श्रोत्यांच्या चेहेऱ्यावर आनंद व गायकाच्या मुद्रेवर समाधान खेळावें, तेव्हां गाण्याला खरा रंग चढावयाचा. त्याच्या कलाप्रेमी अंतःकरणाला यन्त्रापुढच्या गाण्यानें काय समाधान वाटावें ? तथापि पोट त्याला तसलें गायन करावयास लावी. गाण्याच्या भरांत येऊन एखादा आलाप अधिक वाढवावा तो तेथच्या नियामकानें वेळ संपल्याची सूचना देऊन कार्यक्रम थांबवावा व त्याला बाजूला करून दुसऱ्या गायक-वादकाला पुढें करावें, असाही प्रकार होई. बिचारा हिरमुसला होऊन आपल्या वाटेला लागे. रेडिओवरच्या गाण्यानें पोट भरे पण मन मरे. रंगभूमीच्या आठवणीनें त्याचें चित्त व्याकुल होई. पुन्हा कधीं रंगभूमि मिळेल का, ह्याचा त्याला ध्यास लागे.

गुर्जर रंगभूमीनें त्याची कीर्ति ऐकली होती. मराठी रंगभूमि पडली पण गुर्जर रंगभूमि अद्याप चांगली शाबूत होती. तिच्या संपन्न चाहात्यांचा तिजवरचा लोभ कमी झाला नव्हता. पैशाच्या पाठबळामुळें तिचे मालक मोठ्या आनंदांत होते. नटांना तनखाही भरपूर मिळे. कित्येक शेंकडे पगाराचे भारी नट गुर्जर रंगभूमि सहज पोसूं शके. आमच्या "संगीत रत्ना"ला अशाच एका संपन्न मालकानें आश्रय दिला. पांच-सहाशेंचा पगार त्याच्या गांवींही नव्हता. मराठी रंगभूमीचा पूर्वीचा एक नामांकित गायक आपल्या पदरीं आहे, हेंच त्याचें मोठें समाधान होतें. त्याच्या गायकीचा त्या रंगभूमीला उपयोग नव्हता, प्रेक्षकांना खेचून आणण्याचें सामर्थ्य त्याचे ठिकाणीं नव्हतें, हें जाणूनही मालकानें त्याला आपल्याजवळ ठेवलें. द्रव्याच्या लोभानें तोही दाखल झाला. निर्जीव यन्त्रापेक्षां पुन्हा सजीव रंगभूमि मिळाली ह्याचाच त्याला आनंद वाटला.

पण काय चमत्कार ! त्याच्या कलेला द्रव्यानें भरतें येई ना. गुर्जर रंगभूमि त्याच्या गायकीला निष्प्राण वाटूं लागली. तो गाऊं लागला, कीं तबलजीला ठेका धरणेंही कठीण होऊं लागलें. पेटीवाल्याला कधीं कधीं सूर सापडत नसे. इतर साथीदारांची धांदल विचारूंच नका. शिवाय ज्यांच्याकरितां गावयाचें त्या प्रेक्षक श्रोत्यांना त्याची मुळींच आवड नाहीं. त्याची रागदारी जागच्या जागीं

जिरून जाई. आलाप तोंडांतच घोटाळत. ताना मान मोडून मागच्या मागें नाहींशा होत. केवळ आपल्या अंतरात्म्याची भूक भागविण्याकरितां चार दोन लकेरी तो घेई. समोरच्या प्रेक्षकांच्या अनास्थेचा त्याला उद्वेग वाटे. त्याची सारी मानसिक व्यथा त्याच्या मुद्रेवर दिसूं लागे. आपल्या बंडखोर मनाला आंतल्या आंत आवरून तो आपली हौस आपली आपणच भागवून घेई. त्याच्या कलेला काल आणि ताल दोन्हीही मिळेनात. बेचैन मनानें रंगभूमीवर रेंगाळतांना त्याचीं पावलें जड होत. परंतु तें सर्व दुःख गिळून तो आपलें काम कसेंतरी पार पाडी. अजूनही त्याच्या नांवाचा उल्लेख 'संगीत-रत्न' ह्या पदवीनें होत असे. पण आतां त्या पदवींत प्राण राहिला नव्हता. त्या शृंगारांत सजीवपणा नव्हता. त्याच्या [illegible]ों ती पदवीही आतां केवळ नाटकी होती! गुर्जर मालकाच्या प्रौढीचा तो एक विषय होता. मराठी रंगभूमीचा हा "संगीत-रत्न" गुर्जर रंगभूमीवर जेव्हां स्वरालाप काढी तेव्हां त्याच्या सुरांत एक करुण विषादाचा स्वर तरंगे—आणि तो त्या गायकाप्रमाणेंच जाणत्यांचें अंतःकरण कापीत जाई!

★

## १६ पोऱ्या

त्याचें खरें नांव होतें महादेव. त्याची आई त्याला हाका मारी म्हाद्या. लोक त्याला म्हणत पोऱ्या. त्याचें कारण असें, कीं तो एका हॉटेलांत नोकरीला होता. त्याचें वय नोकरी करण्याचें नव्हतें खरें, परंतु त्याला नोकरी करण्या-खेरीज चालण्यासारखेंच नव्हतें. गरिबांच्या बाबतींत वयापेक्षां पोटाचाच विचार नोकरीच्या बाबतींत महत्त्वाचा असतो. तसें म्हटलें तर शाळेंत शिकण्याचेंच त्याचें वय होतें. त्याचें शाळेंत नांवही होतें. परंतु मनावर विद्येचा संस्कार नाहीं, भोवतीं शिक्षणाची आवड उत्पन्न करणारें वातावरण नाहीं, स्वस्थपणें पुस्तकी अभ्यास करण्यास घरांत अनुकूल स्वास्थ्य नाहीं, तेव्हां शाळेचा व त्याचा संबंध केवळ नांवापुरताच राहिला तर नवल काय ? महाद्या ( त्याचे शाळासोबती त्याला महाद्याच म्हणत ) शाळेंत गेलाच तर कधीं वेळेवर जात नसे. त्याच्या पाटीपुस्तकांचा पत्ता नसायचा. त्याच्या डोक्यांत ज्ञान नसल्यामुळें मास्तरांच्या प्रश्नांचीं उत्तरें त्याला येत नसत. मास्तरांचें सर्व शिक्षण त्याच्या पाठीलाच मिळत असे. त्या तालमींत तयार झाल्यानें बरोबरीच्यांशीं गुंडगिरीनें वागण्यांत महाद्या कोणालाच हार जात नसे. आपल्या शक्तीची जाणीव तो रोज एखाददुसऱ्या सोबत्याला देई. रोज त्याच्या कांहीं ना कांहीं खोड्या आईच्या कानांवर जात. उरलेसुरले धपाटे आई त्याला देत असे. शेवटीं, झालें तेवढें शिक्षण बस्स झालें. असें समजून आईनें एक दिवस त्याला एका हॉटेलवाल्याच्या स्वाधीन केला आणि तेव्हांपासून तो "पोऱ्या" झाला. आईनें तरी काय करावें ? घरांत दारिद्र्य, कर्ता पुरुष कोणी नाहीं, सारा संसाराचा भार डोक्यावर, घरांत चार कच्चींबच्चीं, मुलगा हा असा अवखळ. कोठेंतरी त्याला डांबून तर टाकावयास हवें ? चार घरचीं चार कामें करावयास बिचारी बाई जाणार ! पोरावर लक्ष तरी कोण ठेवतो ? तेवढाच गुंतलेला असला तर बरा. शिवाय कांहीं चार-पांच रुपये मिळविल्यास तेवढाच संसाराला हातभार ! त्यांतही हॉटेलसारख्या खाण्यापिण्याचे जागीं राहिला तर तेवढेंच त्याचें पोट बाहेर निघावयाचें ! गरीब बिचारी कामकरी बाई ! तिनें मुलाच्या भवितव्याचा अधिक विचार तो किती व कसा करावयाचा ?

शेवटीं म्हाद्या हॉटेलांत "पोऱ्या" बनला. प्रथम त्याची योजना कपबशा विसळण्याच्या कामावर झाली. सकाळीं रामप्रहरीं म्हाद्या कामावर दाखल होई. कळकट, फाटका पोशाख चढविलेली म्हादबांची स्वारी पाहून बाहेर कोणीही त्याला हॉटेलपोऱ्या म्हणून ओळखूं शके. खांद्यावर तितकेंच एक कळकट फडकें टाकून महाद्या आपल्या कामावर बसे. उष्ट्या कपबश्यांच्या चळतीच्या चळतीं त्याच्या जवळ येऊन पडत. त्या धुण्याचें काम त्याचें असे. धुणें हें मोठें नांव व्यर्थच होतें. दोन लाकडी पिपांत भरलेल्या पाण्यांतून त्या कपबशा फक्त बुचकळून काढावयाच्या असत. दोन्ही पाण्यांचा रंग अगदीं काळवंडून त्याच्या आंगावरील काळ्या कपड्याशीं बरोबरी करीत होता. त्याच पाण्यांत शेकडों कपबशा बुचकळून निघत होत्या. उलट्या निथळून पालथ्या टाकल्या कीं म्हाद्याचें धुण्याचें काम पुरें होई. सारखे त्या घाणेरड्या पाण्यांत बुचकळून राहिल्यानें त्याच्या हाताचे पंजेही खराब झाले होते. पण त्याचें कपबशा धुण्याचें काम चालूच होतें. मधून मधून पिपांतील पाणी बदलणें, कपाळावरचा घाम आंगावरच्या घामट आंगरख्यानें पुसणें, मध्येंच तलफ आल्यास व मालकाचें लक्ष नसल्यास कोणाकडून तरी एखादें विडीचें थोटूक मिळवून त्याचे दोन झुरके घेणें, हेही त्याचे व्यवसाय चालत. तोंडानें शीळ घालावी, हातानें कपबशा खडखडाव्यात, मध्येंच शेजारच्याला एखादी इरसाल शिवी द्यावी, गांवच्या सिनेमाच्या गप्पा माराव्यात – मोठें मजेचें वाटे तें आयुष्य त्याला. मालक सकाळीं नास्तापाणीही देई. बंबांतील चहाचें कळकट पाणी, शिळावलेलीं शंकरपाळीं किंवा चिवडाशेव हींही त्याला अमृताप्रमाणें वाटत. खरेंच आहे, घरीं शिळ्या भाकरीचे तुकडेही मिळण्याची मारामार, तेथें हॉटेलच्या चवीचे पदार्थ महाद्यानें मिटक्या मारीत खाल्ले तर त्यांत नवल वाटण्यासारखें काय आहे ? मध्यरात्रीं पावेतों महादबांचें कपबशा विसळण्याचें काम सतत चालत राही. मध्यरात्र झाली म्हणजे म्हाद्या आपली फाटकी, कळकट गोधडी तेथेंच फळकुटावर पसरी आणि त्यावर पहुडे. झोपेच्या बाबतींत कुंभकर्णाचा त्याच्यावर वरदहस्त होता. शरीराची मुटकुळी करून एकदा महाद्या पडला, कीं कोणीं त्याला उचलून नेला तरी त्याला त्याची दाद लागली नसती. दिवसाचा शीण म्हणा किंवा त्याचें पोरवय म्हणून म्हणा, पण त्याला झोप गाढ लागे इतकें मात्र खास. सूर्यकिरणांनीं सुद्धा म्हाद्या जागा होत नसे. मालक एकदा आंगावर वसकन

ओरडला, त्यानें बकोटें धरून खसकन त्याला ओढलें, म्हणजे म्हाद्याची स्वारी डोळे चोळीत जागी व्हावयाची, मोठ्या कष्टानें आंगाला आळोखे पिळोखे देऊं लागावयाची. पुन्हा एकदा मालकानें त्याच्या नांवाचा उद्धार करावयाचा, एखादा धपाटा पाठीवर चढवावयाचा, तेव्हां मग पोऱ्या आपल्या आंथरुणाच्या चिंध्या खाकोटीला मारून आंत निघून जावयाचा. झालें, दिवस उजाडला, महाद्या आपल्या कामावर रुजू झाला. म्हाद्याच्या आंगवळणीं पडत चाललें होतें हें आयुष्य. मधूनमधून त्याची आईही चौकशी करून जावयाची. महिन्याकांठीं मालकाकडून त्याचा पगारही ती नेई. पगार म्हणजे सारे चार पांच रुपये, पण त्यांचीही तिला धन्य वाटे.

कांहीं दिवसांनीं म्हाद्याला बढती मिळाली. कपबशा विसळण्याच्या कामावरून चहा देण्याच्या कामावर तो चढला. त्याच्या मूळच्या जागीं दुसरा एक मुलगा येऊन दाखल झाला. म्हाद्याच्या आंगीं मोठेपणा दिसूं लागला. नव्या कपविसळया पोऱ्यावर तो संधि सापडेल तेव्हां खेकसूं लागला. गिऱ्हाइकांना चहा देतांना पोऱ्याच्या डोळ्यांत वेगळेंच पाणी खेळूं लागलें. मधूनमधून बाहेरची चहाची 'ऑर्डर' आली, कीं कपबश्यांची उभी चळत घेऊन महादबाची स्वारी एखादा फेरफटकाही करून येई. तेव्हांचा त्याचा थाट मोठा पाहाण्यासारखा असे. कानावर एखादें विडीचें थोटुक झळकत ठेवून तो बाहेर पडे. तोंडानें सिनेमाच्या गाण्याची शीळ घाली. "मेरा बुलबुल–सो रहा है" म्हणून एखादी कर्कश लकेर मारतांना तो असा कांहीं अभिनय करी, कीं जणूं कांहीं त्याची मनोरम प्रेयसीच त्याच्या समोर एखाद्या पर्यंकावर पहुडलेली आहे. सिनेमांतील शृंगार प्रसंग व त्यावेळचीं गाणीं ह्यांचा त्याच्यावर इतका परिणाम होई, कीं त्याला अगदीं बेचैन झाल्यासारखें वाटे. त्याच्या बाह्य रूपांत म्हणण्यासारखा फरक झाला नव्हता पण त्याचें अंतःस्वरूप हळूहळू पालटत चाललें होतें. आपण आतां मोठे होत चाललों आहों, ह्याची त्याला पुसट जाणीव होऊं लागली होती. कप विसळणाऱ्या पोऱ्याचें रूपांतर झालें. आतां हॉटेलांतील वरच्या जागेचा 'चार्ज' आपणाला मिळावा असें त्याला वाटूं लागलें. गिऱ्हाइकांच्या 'ऑर्डरी' घेऊन "एक इसम चार आणे" म्हणून मोठ्या आवाजांत आपण केव्हां फर्मावूं ह्याची तो मनांतल्या मनांत वाट पाहूं लागला. त्याच्या मनानें ती मोठी मानाची जागा होती. झोपेंतही

त्याला तीं सुखस्वपनें पडत व मध्येंच तो "एक इसम चार आणे" म्हणून ओरडे. मालकाच्या हॉटेलविषयींही त्याला आतां थोडी आपुलकी वाटूं लागली. "पोऱ्या" म्हणून हाक मारतांना मालकाच्या आवाजांतही थोडा सौम्यपणा आला. गिऱ्हाइकांच्या "पोऱ्या" म्हणून हाकांना हजर राहातांना मात्र म्हाद्याचा जीव टेकीला येई. टेबलावर खांद्यावरचें फडकें फिरवायचें, गिऱ्हाइकांना चहाची पुरवणी करावयाची, रिकाम्या कपबश्या आंतल्या घरांत पोहोंचवायच्या, बाहेरच्या "ऑर्डरी" मधूनमधून संभाळायच्या, ह्या साऱ्या व्यवसायांत महादूच्या जिवाची लगबग कांहीं विचारूं नका. ह्या साऱ्या दंगलींत घर, शाळा, भावंडें, आई ह्यांचीही त्याची आठवण बुजत चालली. त्याचा पगारही आतां दोन चार रुपयांनीं वाढला. दिवसांतून एखाद्या वेळीं थोडें चहाचें पाणीही त्याला अधिक मिळे. नासत्याच्या वेळीं दोन घास खाद्य स्वतःच्या हातानें अधिक घेतल्यास मालक आतां पूर्वीसारखा त्याच्यावर गुरगुरत नसे. मालकाच्या ओरडण्याची त्याला आतां मागल्यागत भीतीही वाटत नसे. एवंच म्हाद्या आतां त्या जगांत अगदीं रंगून गेला होता. त्या कळकट कपड्यांच्या आंतील पोऱ्याच्या डोक्यांत "चहा, चिवडा, (आणि चिरूट)" ह्याशिवाय वेगळा विचारच येत नव्हता. "पोऱ्या" मोठा होत चालला. असेंच त्याचें सगळें आयुष्य जाणार ! हेंच त्याचें जग आणि हेंच त्याचें जीवित ? ह्याच जगांतील तरी त्याचीं सुखस्वप्नें खरीं होणार कीं जन्मभर तो 'पोऱ्या' च राहाणार ?

★